# भूमिका व प्रास्ताविक

लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य. असे ढोबळमानाने म्हटले जाते. लोकसाहित्य हे जसे लोकांचे असते तसेच संस्कृतीही लोकांचीच असते पण लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्यातील संबंध अभिन्न आहेत असे म्हटले जाते. लोकसाहित्याशिवाय इतरही अनेक आविष्कारातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसंस्कृतीमध्ये मराठी लोकधर्मातील ग्रामदैवते येतात. त्यांच्या पूजा, उपासना, विधी, जत्रा त्यासंबंधी विशिष्ट जातीचे लोक तेथे कलाविष्कार करताना दिसतात. तर परंपरागत लोकजीवनाचा शब्दबद्ध आविष्कार हा लोकसाहित्यात येतो. हा लोकसाहित्याचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपोआप येत असतो. उदा.विशिष्ट समाजजीवनाची गीते, कथा, कहाण्या, कोडी, उखाणे, खेळगीते, श्रमगीते, विधीगीते इत्यादी.

मराठीमधील लोकसाहित्याच्या निर्मितीचा शोध हा बाराव्या शतकापूर्वी अस्तित्वात असावा असे लक्षात येते. याचा अर्थ असा की, मराठी साहित्याच्या निर्मितीची बीजे ही लोकसाहित्यातूनच आल्याचे नाकारता येत नाही.लोकसाहित्याचे संकलन आणि अभ्यास यांचा १८व्या शतकात युरोपमध्ये प्रारंभ झाला असे लोकसाहित्याच्या अभ्यासकांचे मत आहे. 'Folklore'हा शब्द १८४६ साली सर्वप्रथम वापरला गेला. तत्पूर्वी जवळजवळ पाऊण शतक आधीपासून लोकसाहित्याच्या संकलनाला प्रारंभ झाला होता. या संबंधीचे कुतूहल १७ व्या शतकातच अभ्यासकामध्ये निर्माण झाले होते असे म्हणावे लागेल. असे असले तरी लोकसाहित्याचा अभ्यास खऱ्या अर्थाने १९ व्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात सुरू झाल्याचे दिसते.

लोकसाहित्याला मानवी जीवनात किती महत्त्वाचे स्थान आहे हे सांगताना प्रभाकर मांडे म्हणतात की, लोकसाहित्याची अर्थपूर्णता नष्ट झाली किंवा समाजजीवनात लोकसाहित्याकडून जे कार्य घडते त्याची समाजातील व्यक्तींना गरज राहिली नाही तर ते लोकसाहित्य नष्ट तरी होते किंवा लिखित स्वरूपात येऊन पूर्वी जीवन कसे होते हे जाणण्याचे साधन म्हणून तरी शिल्लक राहते. त्यातील जिवंतपणा नष्ट होतो. अशा अवशेषांना सजीवावशेष म्हणता येत नाही. लोकसाहित्य मात्र सजीवावशेषरूप असते. कारण लोकजीवनाची कोणतीतरी गरज त्यामुळे भागविली जाते. यावरून हे सिद्ध होते की लोकगीतांचे जतन होणे आणि त्यांचे योग्य टप्प्यांवर संशोधन होणे किती गरजेचे आहे. म्हणून आदिवासींच्या लोकगीतांचे संकलन करून त्यातून स्त्रीजीवनाचा शोध घेण्याचा येथे मी प्रयत्न केला आहे.

लोकसाहित्यामध्ये 'लोकगीताचे' दालन सर्वाधिक समृद्ध आहे. १९२० साली इतिहासाचार्य राजवाडे यांनी सज्जनगडावरचे एक 'लोकगीत' हा लेख लिहून त्यात 'लोकगीत' हा शब्द प्रथम वापरला. 'लोकगीत' ही संज्ञा वापरून त्याची लक्षणे स्पष्ट करणारा हा मराठीतील पहिला लेख. या लेखात ते म्हणतात, 'हे गाणे अमूक एका व्यक्तीने रचले असे म्हणण्यास पुरावा यत्किंचितही नाही. मला

वाटते ही गाणी लोकस्फूर्तीची जी गाणी, म्हणी, वचने असतात त्यापैकीच आहे. काही म्हणी, वचने, गाणी अशी असतात की ती समाजात एकसमयावच्छेदाने बहुतेक सर्वांना सूचतात. अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्यांच्यात दिसणे शक्य नसते. लोकगीतांमध्ये स्त्रियांच्याबाबतीत विचार केला असता आपल्याला असे दिसून येते की, मराठी लोकसाहित्यात 'लोकगीतांवर' विविध अंगाने अभ्यास आणि संशोधन झाल्याचे दिसून आले आहे. तारा भवाळकर, प्रभाकर मांडे, सरोजिनी बाबर, शांता शेळके, शरद व्यवहारे या लोकसाहित्याच्या काही अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अभ्यास करून समाजापुढे लोकसाहित्याची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसाहित्यविशारदांनी असे गृहीत धरले आहे की, लोकगीतांची निर्मिती करण्यासाठी लोक उत्सवविधीप्रसंगी एकत्र जमतात. त्यावेळी समूहातील घटकव्यक्ती एकाच मानसिक अवस्थेत असतात. यातून काही प्रश्न निर्माण होतात. गीतरचनेला प्रथम प्रारंभ कोणी केला? त्यालाच गीत रचनेची प्रेरणा का मिळाली? ही प्रेरणा मिळण्याचे कारण काय? इत्यादी अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे ग्रीम आणि गुमेरे हे देऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी गीतांच्या उपपत्तीसंबंधी केलेले विवेचन गूढ होते. लोकगीतांच्या संदर्भात ए.डब्लू. श्लेगेल यांची एक उपपत्ती प्रसिद्ध आहे. ती अशी - गीताची निर्मिती कोणत्यातरी व्यक्तीकडून होत असते. एखादी कविता ही जशी कलावंताची किंवा कवीची निर्मिती असते त्याचप्रमाणे लोकांमध्ये प्रचलित असलेल्या लोककथा-गीतांसंबधी म्हणावे लागेल. मग ती समाजामध्ये कितीही लोकप्रिय असो. याचा अर्थ असा नाही की, त्याचा कर्ता कोणी एक व्यक्ती नाही. गीतांच्या लोकप्रचलित रूपांत अनेकांचा सहभाग असण्याची शक्यता असते. असे असले तरी ती मूळात एका व्यक्तीची निर्मिती असते. हे विसरता येत नाही. स्त्रीगीते ही जीवनातूनच फुललेली असल्यामुळे त्यांना वास्तवतेचा आधार असल्यामुळे स्वत:च्या भावनेचा आविष्कार समजून स्त्रिया गातात. लोकगीतात भूप्रदेशानिहाय विविधता येत असते. अनेकवेळा मुख्य गाभा कायम ठेऊन स्थलपरत्वे लोकगीतांची रचना बदलते. विशिष्ट समाजाचा इतिहास, संस्कृती, रूढी, परंपरा यांमुळे त्यात बदल झाल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर विशिष्ट ऋतूतील वातावरणव्यवसायाच्या दृष्टीने तेथील समाजाच्या स्त्रियांच्या मनातील भावतरंग परिणाम करणारे ठरतात.

आदिवासी संस्कृती ही जगाच्या पाठीवर एक आदर्श संस्कृती मानली जाते. तेथील रितीरिवाज, रूढी, परंपरा, सण, उत्सव, देव, श्रद्धा या साऱ्याच बाबतीत इतर समाजाहून ही संस्कृती भिन्न दिसते. आदिवासी हा मूळात जंगल, दऱ्या-खोऱ्यात राहत असल्यामुळे महानगरीय जीवनापासून तो अलिप्त असतो. दिवसभर रानावनात कष्ट करून रात्री तो मनोरंजन करतो. त्यासाठी लोकगीते, लोकनृत्य, नाटय, खेळ यांच्या माध्यमातून तो कलाविष्कार करत असतो. आदिवासी समाजाचे लोकसाहित्य हे देखील वैशिष्टयपूर्ण आहे. पिढयान्‌पिढया अशिक्षित असलेला हा समाज लोककलेची परंपरा जपत आला आहे. मूळात लोकसाहित्याबद्दल असे म्हटले जाते की, 'लोकसाहित्याचा पहिला ध्वनी स्फूरला तो आदिवासीच्या मुखातून.' जातीजमातीचे मूळचे दोन स्तर होते ते म्हणजे आदिवासी किंवा वन्य आणि

अंत्यज किंवा अतिशुद्र होय. लोकसाहित्याचा उद्‌गम याच जाती जमातीत झाला. लोकसाहित्य धनाचे तेच खरे वारसदार होत. लोकसाहित्याच्या या जनकांची प्राचीन जीवनाच्या विशेषांचे आणि संस्कृतीचे अबाधित्व राखले. उदात्त प्रतिके जोपासली. या आदिवासींनी शून्यातून नियतीच्या कालानुसार जीवन आविष्कृत करून ते अलंकृतही केले आहे. त्यांनी ध्वनीला शब्दाचा आकार दिला आणि याच शब्दाला विविध भावरंग चढविले. तरल कल्पकता आणि मधूर जुळवणी करून त्यांनी लोकसाहित्याची सहजस्फूर्त उभारणी केली. त्याचा गंध सर्वत्र दरवळविला.

आदिवासी लोकसाहित्यामध्येही लोकगीतांना विशेष महत्त्व आहे. नृत्य करायचे असेल तर त्यासाठी गीत गायले पाहिजे. त्यानंतर वाद्यांच्या साथीत आदिवासी रात्ररात्र नृत्य करत असतो. लोकगीतांमध्ये स्त्रियांनी रचलेली लोकगीते विपुलप्रमाणात असल्याचे दिसते. ही लोकगीते आदिवासी भागात केव्हापासून निर्माण झाली? अशिक्षित अज्ञानी असलेला हा समाज या गीतांना चाल कसा लावू शकतो? हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. मराठी लोकसाहित्याच्यापूर्वी आदिवासी लोकगीतांची निर्मिती झाली आहे असे संशोधकांचे मत आहे. लोकगीतांवरील पहिला चर्चात्मक लेख 'गोंडी भाषा व गीते' हा १८७७ साली प्रसिद्ध झाला. हा लेख 'विविधज्ञानविस्तारात' लिहून राजाराम शास्त्री भागवत यांनी लोकसाहित्यावरील समाजशास्त्रीय पद्धतीने स्वतंत्रपणे केलेल्या चर्चेचा प्रंरभ आहे. राजाराम शास्त्री भागवत हे महाराष्ट्रातील लोकसाहित्यासंबंधी शास्त्रीयदृष्टीने लिहिणारे पहिले लेखक आहेत असे म्हटले जाते. विशिष्ट जमातीत त्यांच्या बोलीतून ही गीतं प्रकट झाली आहेत. महाराष्ट्रात एकूण ४५ आदिवासी जमाती आहेत. या प्रत्येक जमातीत स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण अशी रचना असल्याची लक्षात येते.

सदरच्या लघुसंशोधन प्रकल्पात महादेव कोळी या आदिवासी जमातीतील लोकगीते आणि तेथील स्त्रीजीवन यांचा अनुबंध या संबंधी संशोधन केले आहे. महाराष्ट्रात असणाऱ्या आदिवासी जमातींमधील महादेव कोळी ही एक प्रमुख जमात आहे. अहमदनगर, पुणे, नाशिक, रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने महादेव कोळी ही जमात दिसून येते. ही जमात महाराष्ट्रात येण्याच्या अगोदर पूर्वीच्या हैद्राबाद संस्थेच्या पश्चिम सरहद्दीवर 'महादेव' किंवा 'बालाघाट' नावाच्या टेकडयांची जी रांग आहे त्या भागात वस्ती करून राहिलेली असावी. महादेव कोळी जमात सह्याद्रीच्या पर्वत रांगांत, घाटमाथ्यावर ज्या भागात राहते त्या भागात शंकराची, महादेवाची अनेक प्रसिद्ध देवस्थाने आहेत. बारा ज्योतिर्लिंगापैकी दोन ज्यातिर्लिंग याच भागात आहेत. ती म्हणजे, भीमाशंकर आणि त्र्यंबकेश्वर. सह्याद्रीच्या डोंगरांवर महादेवाचे देवस्थान असल्यामुळे येथील आदिवासी त्याची मनोभावे पूजा करतो. म्हणून येथील आदिवासींना महादेव कोळी असे म्हटले जाते.

या संशोधनाचे कार्यक्षत्र हे मर्यादित असले तरी प्रदेशनिहाय त्यातही भेद असल्याचे दिसून आले आहे. उदा. एकच लग्नगीत दोन तालुक्यामध्ये वेगवेगळया चालीत म्हटले जाते. महादेव कोळी

आदिवासी हा निसर्गाला सर्वश्रेष्ठ मानतो. निसर्गातील घटकांशी त्यांचे अतूट नाते आहे. धरणीमातेला तो दैवत मानतो म्हणून शेतातील काम करतानाही तो तिला प्रथम वंदन करतो -

पहिले नमन नमू कुणाला, पहिले नमन नमू कुणाला

धरतुरी मातेलान् काय हो...

आदिवासी स्त्री जसेआपले दु:ख वेदना लोकगीतातून व्यक्त करते तसे ती आपल्या आयुष्यातील आनंदी क्षणही मनोमन व्यक्त करताना दिसते. दळण, कांडण, फुगडी, लग्नविधी, शेतात श्रम करताना अत्यंत भावूक होऊन ती गीत गात असते. काही पौराणिक आख्ययिकांमधील पात्रांशी ती कधी कमालीची तादात्म्य पावते तर कधी ती तटस्थ भूमिका स्विकारते.

आदिवासी लोकगीते विपुलप्रमाणत अस्तित्वात आहेत. परंतु या समाजापर्यंत पोहचण्याचे धाडस सहसा कोणी करत नाही. दुर्गम डोंगराळ भागात जाऊन तेथील स्त्रियांचे सामाजिक प्रश्न त्यांचे जीवनमान, तेथील संस्कृती पाहिली असता मुख्य प्रवाहापासून कितीतरी मागासलेला हा समाज पिढयान्पिढया अंधश्रद्धेला कवटाळून बसलेला दिसतो. परंतु येथील स्त्रियांच्या लोकगीतांतून त्यांच्या संस्कृतीचे, नीतीमूल्यांचे अनोखे दर्शन होते. आदिवासी संस्कृती कशी आहे? त्यांचे सण, उत्सव,विधी, प्रथा कशा आहेत? त्या इतर समाजगटाला समजाव्यात म्हणून या जमातीतील लोकगीतांवर संशोधन करण्याचे मला उचित वाटले. महादेव कोळी जमातीतील लोकगीतातून व्यक्त होणारे भाव हे अत्यंत संवेदनशील असल्यामुळे मानवी नात्याची एक घट्ट वीण त्यातून गुंफल्याचे जाणवते. आदिवासी स्त्री ही मुक्त जीवन जगत असते. पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून कष्ट करण्याची तिची वृत्ती असल्यामुळे स्त्री-पुरूष भेदभाव येथे पहावयास मिळत नाही. भलर गीत गाताना ती म्होरकीण होते आणि तिच्यामागे इतर स्त्री-पुरूष गाणी म्हणतात. यावरून स्त्रियांचा मान-सन्मान येथे जपला जातो हे समजते.

आदिवासी लोकगीतातून पूर्वीपेक्षा अलिकडे मोठयाप्रमाणात स्थित्यंतरे घडल्याचे दिसून आले आहे. विसाव्या शतकातील गीत आणि एकविसाव्या शतकातील गीत यात कालपरत्वे काहीसा बदल झाला आहे. आदिवासी स्त्री ही सुशिक्षित होत असतानाच आधुनिकीकरणाचे वारे तिच्या गीतातून दिसू लागले आहे. 'नवं ते हवं' या उक्तीप्रमाणे येथील लोकगीतांच्या रचनाप्रकारात बदल होणे साहजिक आहे. म्हणून येथील स्त्रियांचे आधुनिक विचार व गीतरचनांचे चातुर्य वाखाणण्याजोगे आहे. ही निर्मिती कोणी? कधी केली? याचा शोध लावणे कठीण असले तरी काही चित्रपटातील गीतांच्या कालखंडावरून त्या चालीतील गाण्याची निर्मिती केव्हा झाली असेल याचा अंदाज येतो. अजूनही आदिवासी खेडयात ही संस्कृती टिकवून ठेवलेली आहे. काही नोकरी व्यवसायानिमित्त महानगरात वास्तव्यास असलेल्या आदिवासी स्त्रियांच्या अंत:करणात येथील लोकगीते घर करून असली तरी ती व्यक्त करण्यासाठी त्यांना

शहरात संधी मिळतेच असे नाही. त्यांच्या पुढील पिढीने हा वारसा जतन करावा, संस्कृती टिकून राहावी म्हणून अशाप्रकारच्या लोकगीतांचे संकलन होऊन त्यावर संशोधन होणे गरजेचे वाटते.

पूर्वीच्या पिढीतील काही लोकगीते लोप पावत चालली आहेत. उदा.

खराळाला बारा वाटा, खराळाला बारा वाटा,

दादा लेक झाला मोठा,दादा लेक झाला मोठा...

हे गीत लग्नविधी झाल्यावर नवरा-नवरी घरात प्रवेश करण्यापूर्वी नवऱ्याची बहीण दरवाजात उभी राहून दार अडविते त्यावेळी म्हटले जाते. आज या गीताची जागा खालील गीताने घेतली आहे -

दार धरूनी दारवटी,दार धरूनी दारवटी,

दादा तुझ्या रे लेकीसाठी, दादा तुझ्या रे लेकीसाठी...

सदर गीताचा आशय तोच पण रचना काहीप्रमाणात बदललेली दिसते. पहिले गीत जुन्या पिढीतील महिला म्हणतात तर दुसरे गीत नव तरूणी म्हणतात. त्यामुळे काही गीते ही हळूहळू लोप पावतात की काय असे वाटत आहे. पूर्वी महादेव कोळी समाजात लग्नकार्य हे पाच दिवस चालत असे. लग्न लागल्यावर नवरदेव तेथेच म्हणजे नवरीच्या घरी मुक्कामी राहत असे. त्यावेळी त्याला जे घर मुक्कामासाठी दिले जात असे त्याला 'जानवस' घर असे म्हटले जात असे. हे घर पाहण्यासाठी नवऱ्या मुलाची आई, वडील, भाऊ, बहीण जेव्हा जात असत तेव्हा त्यांच्यासाठी खालील गीत म्हटले जात असे -

चिरेबंदी जानवस, चिरेबंदी जानवस

कोण मागे घाई घाई सखे गं, कोण मागे घाई घाई

नवरदेवा तुझी आई, नवरदेवा तुझी आई...

आज महादेव कोळी समाजात पाच दिवस लग्नकार्य करत नाहीत तर तीन किंवा एक दिवसाचे लग्नकार्य होत आहे. त्यामुळे नवरामुलगा नवरीच्या घरी मुक्कामी जात नाही. पर्यायाने वरील गीत म्हटले जात नाही. म्हणून आपोआपच अशी गीतं लोप पावलेली दिसतात.

लोकगीतांचे स्वरूप मनमोकळे असते. गोष्ट जुनीच पण नव्याने सांगितली जाते. स्त्री संसाराला सर्वस्व मानणारी विचारांपेक्षा आचाराला महत्त्व देणारी, सुख-दु:खे सोसणारी, कौटुंबिक आत्मीयता ओतणारी ही आदिवासी स्त्री लोकगीतांच्या माध्यमातून स्वत:च्या भावना व्यक्त करत असते.

वरील काही गीतांतून जुन्या वळणाची गीतं आदिवासी स्त्रिया नवा साज लेवून गातात. त्यामुळे त्याच्या गाण्यातील परिवर्तन आणि प्रयोगशीलता येथे नकळत आपल्याला पाहावयास मिळते.

संशोधनाच्या दृष्टीने या गीतांना महत्त्व तर आहेच त्याचबरोबर आदिवासी संस्कृतीचे जतन होण्यास मदत देखील होते. आदिवासी जीवनात नृत्याला जेवढे स्थान आहे ते इतर कोणत्याही समाजात नसेल असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बेधुंद होऊन रात्रभर नाच-गाणे करणे आणि त्यातून जीवनाचा आनंद घेणे हे या संस्कृतीचे लक्षण आहे. आदिवासी स्त्री ही हीन, दीन, संसाराने पिचलेली असली तरी लोकगीते गाताना, त्यांच्या ठेक्यावर नाचताना तिला काही क्षण तरी आपल्या दु:खाचा विसर पडत असतो. या समाजात आजही अनेक रूढी, परंपरा टिकून आहेत याचे कारण म्हणजे आपल्या संस्कृतीचा अभिमान.

आदिवासी लोकगीतांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्या संस्कृतीचे दर्शन आपल्याला होणार नाही. कारण या समाजाच्या सर्व आशा आकांक्षा त्यांच्या लोकगीतांतून व्यक्त झाल्याचे दिसून येते. आदिवासी स्त्रियांच्या जीवनाचा जोकाही परमोत्कर्ष झाला आहे तो या गीतांमुळेच. बहुतेक सर्वच प्रसंगांना ही लोकगीते म्हटली जातात. भले त्यांच्या लोकगीतांना शास्त्रीय बाज नसेल पण त्यातून व्यक्त होणाऱ्या भाव-भावना या पराकोटीच्या आणि जीवनाचे सार सांगणाऱ्या असतात. या संशोधनातून गीत रचनेला दुय्यम स्थान देण्यात आले आहे. तर आदिवासी महादेव कोळी जमातीतील स्त्रियांची मानसिक स्थिती आणि त्यांची लोकगीते यांचा अनुबंध हा भाग महत्त्वाचा आहे. येथील स्त्रिया कलासंपन्न तर आहेतच पण लोकगीतांच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास लोकगीते ही त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. लग्नप्रसंगी आपल्या नात्यातील आणि हक्काच्या माणसांवर उपरोधिक गीत गाऊन त्याची मस्करी करण्याचे धाडस फक्त याच स्त्रिया करू शकतात असे मला वाटते. उदा.

'जांभोरी गावच्या पोरींनी लुगडी काय ओ केली

फेटा म्हणूनी डोई बांधीली.

जांभोरी गावच्या पोरींनी आंबाडे काय ओ केले

चेंडू म्हणूनी खेळाया नेले...

दोन गावांमधील स्त्रियांनी उपरोधिकपणे म्हणावयाचे हे गीत नवरीमुलीच्या गावातील स्त्रियांनी अशाप्रकारचे गीत गायल्यानंतर नवऱ्यामुलाच्या गावातील स्त्रिया त्याच्याही पेक्षा जास्त उपरोध साधून गीत म्हणताना दिसतात उदा.

खिंडीच्या तोंडी बाय तांबडी माती गं

नवऱ्याच्या कलवरीवर उडाला हत्ती गं

खिंडीच्या तोडी बाय पांगारा फुलं गं

नवऱ्याच्या कलवरीवर वांदार उडं गं...

अशाप्रकारे गीतातून प्रतिउत्तर दिल्यामुळे कधीकधी भांडणे होण्याची शक्यता निर्माण होत असे पण काही वेळातच पुन्हा दोन्ही गावचे संबंध पूर्ववत होतात. कारण आदिवासी स्त्रियांना माहीत असते की अशी गीते केवळ थट्टेवारी व हसण्यावारी घेतली जातात. रितीरिवाजानुसार असे गाणे म्हटले जाते एवढेच या स्त्रियांना माहीत असते. त्यामुळे अशी गीतं म्हटल्यावर दोन गावातील, दोन नात्यातील नातेसंबंध बिघडण्याऐवजी ते अधिक घट्ट होतात.

महादेव कोळी जमातीतील लोकगीतांची रचना ही प्रामुख्याने नातेसंबंधाशी निगडित असल्याची दिसते. इतर समाजाला त्याची माहिती व्हावी, त्यांच्या संस्कृतीचे ज्ञान व्हावे यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे. एकविसाव्या शतकातही आदिवासींची संस्कृती अद्याप टिकून असल्यामुळे या संस्कृतीचा इतिहास, स्वरूप आणि वैशिष्ट्य आपण जाणून घेण्याची आवश्यकता वाटते. आदिवासी महादेव कोळी समाजातील लोकगीतांचे एक महत्त्वाचे वेशिष्ट्य म्हणजे त्यांची लोकगीतं ही उदरनिर्वाहासाठी किंवा दारोदारी भटकून गायली जात नाहीत. त्यांच्या लोकगीतांना व्यावसायिक स्वरूप येत नाही. केवळ आनंद प्राप्त करण्यासाठी आणि त्यातून लोकसंस्कृतीचे जतन करण्यासाठी ही गीतं गायली जातात. या लोकगीतांचे संशोधन करत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की जसजशी आदिवासी लोकगीतांची रचना झाली आहे तसा आदिवासी स्त्रियांचा जीवनपट, त्यांच्या भावभावनांचे दर्शन होताना दिसते. गीत गात असताना या स्त्रियांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या लोकगीतात पडत असल्यामुळे त्या अधिक समरसून सहभागी होतात. सह्याद्रीच्या पर्वत रांगामधील अनेक गावांतील स्त्रियांना प्रत्यक्ष भेटून खालील प्रकरणांच्या आधारे मी मराठी लोकसाहित्यामध्ये नवीन भर टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

# लोकगीताचे स्वरूप व व्याप्ती

पूर्वीच्या काळी स्त्रिया दळण-कांडण करण्यासाठी उखळ आणि जात्याचा वापर करत असत. त्यावेळी त्या आपले सुख, दु:ख व्यक्त करण्यासाठी गीताच्या माध्यमातून आपल्या सख्यांसोबत गाणं गात असत. कधी कधी या स्त्रिया आपले दु:ख हलके करण्यासाठी देवतांचा आधार घेत. त्यामुळे आपोआपच त्यांच्या गीतांतून देवदेवतांचा गुणगौरव येऊ लागला आणि आपल्या जीवनाला कोणाचातरी आधार आहे अशी त्यांची भावना होऊ लागली. अशाप्रकारची गीतं ही शेतात, सण-उत्सवाप्रसंगी, अनेक विधींमध्ये गायली जाऊ लागली. लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. एक पिढीकडून हा वारसा दुसऱ्या पिढीकडे आपोआप जात असल्यामुळे हा ठेवा चिरंतर आहे असे म्हणावे लागेल.

लोकगीतातून लोकजीवनातीलही लोकभ्रम, विश्वास, श्रद्धा, आचार-विचार, रूढी, प्रथा, विधी आणि त्यांच्या लोकजीवनातील कृती-उक्ती, लोकमानसातून घडणाऱ्या कृती-उक्ती बरोबरच अनेक लोककलांचाही समावेश आदिवासींच्या लोकगीतात होतो. तेव्हा आदिवासी महादेव कोळी लोकमानसाचा, लोकमनाचा, समूहमनाचा आणि व्यक्तीमनातील लोकमानसाचा शोध घेण्याचे कार्य आपल्याला त्यांच्या लोकगीतांच्या आधारे करता येऊ शकते. शिवाय त्यांच्या लोकगीतातील बोली भाषा, त्या गीतातील शब्द, त्या शब्दांना लाभलेला जीवनानुभूतीचा ओलावा त्यांनी रचनेच्या माध्यमातून व्यक्त केले आहे.

लोकगीतांचे स्वरूप समजून घेण्यापूर्वी लोकगीते म्हणजे काय हे प्रथम समजून घेतले पाहिजे. गीत आणि लोकगीत यामध्ये फरक असल्याचे दिसून येते. लोकांनी लोकांसाठी अनामिक स्वरूपात ज्या गीतांची रचना केली त्याला लोकगीते म्हटले जाते. अशी ढोबळमानाने लोकगीताची व्याख्या म्हणावी लागेल . ही लोकगीते कोणी रचली आहेत याचा अंदाज लावता येत नाही. त्यांचा रचना काळही अज्ञात असतो. याव्यतिरिक्त आजपर्यंत अनेक लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकगीतांच्या व्याख्या केल्या आहेत. त्यात पाश्चात्त्य अभ्यासकांनी खालील व्याख्या केल्या आहेत -

### १. स्टॅंडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोर -

'लोकगीत म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत येते त्याचे संगीतमय गीत.' - मायथॉलॉजी ॲंड लिजेंड भाग-२, पृ.१०३२.

**२. अलेक्झांडर कॉप -**

'लोकगीत हे भावगीत असून त्याला चाल असते. त्याचा कर्ता अनामिक असून त्याचा उगम निरक्षरांत झालेला असतो. लोकगीते ही भूतकाळातील निर्मिती असून तिला अनेक शतकांची परंपरा असते. लोकगीत प्रत्येक काळात निर्माण होऊन रूढ होते.'

**३. पॅरी -**

'लोकगीत म्हणजे आदिमानवांचे आल्हाददायी संगीत होय.'

**४. व्ही. विलियम -**

'लोकगीत हे नवेही नसते आणि जुनेही नसते. वनातील वृक्षाप्रमाणे त्यांची मुळे भूतकाळात खोलवर रूजलेली असतात. परंतु तिला नित्यनूतन शाखा पुष्पफळे येत असतात.'

वरील व्याख्यांतून लोकगीतांबद्दल अनेक अंगांनी विचार होत असला तरी लोकगीताची सर्वमान्य व्याख्या करणे कठीण आहे. कारण सर्वच व्याख्यांमधून लोकगीताचे एकएक पदर उलगडताना दिसतात. तरीही आदिवासी लोकगीताच्या बाबतीत पॅरी यांनी केलेली व्याख्या जास्त योग्य वाटते. कारण आदिमानवाने सर्वप्रथम लोकगीताची रचना केली असा उल्लेखही लोकसाहित्याच्या अभ्यासात दिसून आलेला आहे.

मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनीही काही व्याख्या केल्या आहेत -

**१. वि.का. राजवाडे -**

'अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते. लोकगीते, उत्सवप्रसंगी भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. अर्थात कोणत्याही एका व्यक्तीला अशा गीतांवर हक्क सांगता येत नाही.'

**२. दुर्गा भागवत -**

'लोकगीत हे गाणे म्हणजे भावगीत किंवा ललितकृती असून त्याला चाल असते. लोकगीताचा उगम निरक्षरात झालेला असून त्याचा कर्ता अज्ञात, अनामिक असतो. लोकगीत ही भूतकाळातील कृती असून, पुष्कळदा तिला शतकांची परंपरा असते. लोकगीत प्रत्येक काळात निर्माण होते आणि प्रचलित राहते. लोकगीत जुनेही नसते, कारण ते सदैव नवा अवतार धारण करीत असते.'

### ३. डॉ. सरोजिनी बाबर -

'विविध प्रकारच्या जातीवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयान्‌पिढया आपल्या नवन्वोन्मषशालीनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत होय.'

### ४. डॉ.ना.गो.नांदापूरकर -

लोकवाङ्मय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच होय. याचा कर्ता लोकच अर्थात अज्ञात अशी लोकसमाजातील व्यक्ती. यास्तव लोकांनी लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेली वाङ्मयीन संपदा म्हणजे लोकगीत होय.'

लोकसंस्कृती म्हणजे लोकांची संस्कृती. यामध्ये लोकांची भाषा, सण, उत्सव, रूढी, समजुती इत्यादींचा समावेश होतो. लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब ज्यामध्ये पडते त्याला लोकसाहित्य किंवा लोकवाङ्मय म्हटले जाते. हे लोकसाहित्य परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. त्यामध्ये लोकसमूहांच्या जाणिवांचा आविष्कार होतो. म्हणून डॉ.शरद व्यवहारे यांनी लोकवाङ्मयाची व्याख्या करताना म्हटले आहे की, लोकांनी केलेले,लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय.

वरील व्याख्यांवरून आपल्याला एक समान घटक दिसून येतो तो म्हणजे, कोणत्याहीलोकगीताचा कर्ता हा अनामिक आणि अज्ञान असतो. लोकगीत हे विशिष्ट बोलीत रचली गेलेली असतात. लोकगीताचा प्रवास हा एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकडे झालेला असतो. लोकगीते ही प्रामुख्याने श्रमजीवी लोकांनी निर्माण केलेली असतात. सुख-दु:खात्मक परिस्थितीत ही गीते गायली जातात. वरील व्याख्यांच्या अनुषंगाने विचार केला असता आदिवासी लोकगीतात या समान घटकांचा समावेश होताना आपल्या लक्षात येते.

आदिवासी महादेव कोळी समाजात सुख-दु:खाच्या प्रसंगी सर्व समाज एकवटला जातो. एका व्यक्तीच्या वाटयाला आलेले सुख किंवा दु:ख हे त्या एका व्यक्तीचे राहत नाही तर सर्व समाजाचे होते. त्यामुळे शेतात काम करतानाही हा समाज सामूहिक काम करण्यास प्राधान्य देतो. त्यांच्या ह्या समूह जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या प्रत्येक कामातून दिसून येते. लोकगीतांमध्येही या समाजातील सर्व वयोगटातील स्त्री-पुरूष हिरिरीने भाग घेतात. दिवसभरातील भटकंतीमुळे आलेला शीण घालविण्यासाठी मंद-धूसर शेकोटयांच्या प्रकाशात धुंद मैफील सजवली जाते. त्या संगीत मैफीलीत देहभान विसरून आदिवासी स्त्री-पुरूष, मुले-मुली, तरूण-तरूणी व आबालवृद्ध सामूहिकरीत्या नृत्य करतात, गातात व

आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करतात. ही मूल्येच त्यांच्या समूहजीवनाची खास अशी वैशिष्ट्ये आहेत. एक नव्हे तर अशा कित्येक आदिवासी पिढयांचा हा सांस्कृतिक आचार त्यांच्या समूहचेतनेला प्रेरणा देत आला आहे. त्यातूनच त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण जन्माला आले आहे. हे सांस्कृतिक वेगळेपण हेच त्यांच्या समूहजीवनाचे आधारदेठ ठरले आहेत.

मानवी जीवनात लोकगीतांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण लोकजीवनामध्ये ही लोकगीते मनोरंजन असेल, श्रमाधिष्ठित असतील किंवा धार्मिक विधीप्रसंगी म्हणावयाची असतील ही लोकगीते सर्व व्यापी आहेत असे म्हणावे लागेल. स्त्री-गीते अंतरीच्या उमाळयातून, जीवाच्या जिव्हाळयातून, लोकभाषेचा-त्यातल्या त्यात स्त्रियांच्या भाषेचा साज लेऊन आपल्या आगळयावेगळया धाटणीतून जेव्हा स्त्री-मनातील भाव व्यक्त होतो तेव्हा त्याच्या आस्वादातून मिळणारा आनंदाचा प्रत्ययही आगळा-वेगळा असाच असतो. मनातील भाव शब्दांच्या प्रतिमांच्या रूपातून इंद्रियगोचर बनून जेव्हा गीतातून व्यक्त होतो तेव्हा तो जीवनानुभव आणि भावानुभव यांचा एकत्र असा परिणाम मन:पटलावर करतो व एका आगळया-वेगळया संवेदनाची अनुभूती देतो. स्त्रीजीवनाची अबोल पण बोलकी व्यथा जेव्हा व्यक्त होते तेव्हा तर संवेदनाची अनुभूती कितीतरी प्रत्ययकारी बनते.

लोकसाहित्याच्या संशोधनासंबंधी लोकसाहित्याचे अभ्यासक प्रभाकर मांडे यांनी काही महत्त्वाच्या आणि ठळक नोंदी सूचित केल्या आहेत. त्यांच्या या सूचना दुर्लक्षित करून चालणार नाही. ते असे म्हणतात की, लोकसाहित्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाचे विश्लेषण करावयाचे असेल किंवा लोकसाहित्याचे दैनंदिन जीवनातील कार्य पाहावयाचे असेल तर केवळ संकलन करून भागत नाही. तर पुढील बाबी नोंदवाव्या लागतात.

अ. तो वाङ्मयप्रकार कुठे आणि केव्हा म्हटला जातो?

ब. कोणत्या वयाचे स्त्री किंवा पुरूष ते गीत म्हणते याची नोंद घेतली पाहिजे. गाणे एकटयाने म्हणायचे असते की सामूहिक? या नोंदींबरोबरच श्रोत्यांसंबधीही माहिती देणे आवश्यक आहे. जसे श्रोते कोणत्या सामजिक स्तरातील? स्त्री किंवा पुरूष? कोणत्या वयोगटातील? अंदाजे संख्येने किती? इत्यादी संबंधी माहिती. हे श्रोते स्वयंप्रेरणेने एकत्रित आले की निमंत्रित करण्यात आले. हा विधी असल्यास त्याचे स्वरूप काय? वार्षिक विधी आहे की नैमित्तिक आहे? सण, उत्सव इत्यादींशी संबंधित असल्यास त्याचे स्वरूप, नवसाचा एक भाग म्हणून कार्यक्रम असेल तर त्याच्यासंबंधी माहिती अशी कितीतरी मिळवावी लागते.

क. लोकवाङ्मय गाणारा किंवा सांगणारा गाताना किंवा कथन करताना काही हावभाव, अभिनय किंवा नक्कल करतो काय? आपले गायन किंवा कथन प्रभावी व्हावे म्हणून त्यात नाटयात्मकता आणतो काय?

ड. श्रोत्यांचा त्यात सहभाग असेल तर त्याचे स्वरूप काय असते? जसे प्रतिक्रियेच्या स्वरूपाचा म्हणजे विनोद असेल तर हसणे, हुंकार देणे, आश्वर्य व्यक्त करणे इ. त्यातील काही भाग सामूहिक उच्चारणाचा असतो काय?

इ. कथन करणारा किंवा गाणारा तसेच श्रोते समाजाच्या कोणत्या स्तराशी संबंधित असतात? जसे हा समूह एकाच जातीचा, एकाच धर्माचा किंवा एकाच सामाजिक स्तराचा असू शकतो. त्यासंबंधीची विस्तृत माहिती नोंदविणे अगत्याचे असते.

ई. लोकवाङ्मयप्रकार, त्याचे स्वरूप इत्यादीसंबंधीची नोंद.

उ. गाणाऱ्या व्यक्तीसंबंधी ऐकणाऱ्याच्या मनामध्ये कोणता भाव असतो? इत्यादी बाबींचा विचार होणे अत्यंत महत्त्वाचे असते.

लोकगीताचे स्वरूप स्पष्ट करताना आपल्या असे लक्षात येते की, लोकगीतांची परंपरा ही मौखिक परंपरा आहे. त्यामुळे ही परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपोआप हस्तांतरीत होते. हस्तांतर होताना मूळगीतात काही बदलही होऊ शकतात. ही लोकगीते तालासूरात गायली जातात. विशिष्ट ठेका आणि लय त्यांना असते. लोकगीतांची निर्मिती काळ सांगणे कठीण होते कारण त्यांचा रचयिता हा अनभिज्ञ असतो. लोकगीते ही विशिष्ट सणसमारंभ, शेतीची कामे, विधी यांच्यात गायली जातात. परंतु भौगोलिक दृष्टया यामध्येही बदल जाणवतो. म्हणजे एकच गीत दुसऱ्या ठिकाणी वेगळया विधीसाठी किंवा कारणासाठी गायले जाऊ शकते. ही त्यांची रूढ असू शकते. समूहजीवनाचा वेध या लोकगीतांतून होत असल्यामुळे भावनेच्या पातळीवर त्यांना महत्त्वाचे स्थान असते. पूर्वीपासून विधी करण्यासाठी ही गीतं गायली जातात त्यामुळे अशाप्रकारची गीतं गायली नाही तर विधी पूर्ण झाली नाही असा समज समाजगटात होतो. काही लोकगीतांत शारीरिक हालचालींना विशेष महत्त्व असते. त्याशिवाय अशा लोकगीतांना महत्त्व प्राप्त होत नाही. उदा. आदिवासी समाजात शिमग्याच्यावेळी जी लोकगीते म्हटली जातात त्यावेळी नृत्य करावेच लागते. लोकगीतात प्रामुख्याने स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व असते. थोडक्यात लोकगीते आणि स्त्री या एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आधुनिक स्वरूपाचा बाज अलीकडे लोकगीतांत आल्याचे दिसून येते. आदिवासी महादेव कोळी समाजात तर अलीकडे चित्रपटाच्या चालीवर लग्नगीते गायली जातात. हे परिवर्तनाचे एक संचित आहे असे म्हणावे लागेल.

आदिवासी समाजातील लोकगीतांमधून स्त्रीजीवनाचा शोध घेताना या बाबी डोळयासमोर ठेवून सदरचे संशोधन जास्तीत जास्त दर्जेदार करण्याचा मानस आहे. त्याशिवाय संशोधनामध्ये जिवंतपणा येणार नाही हे निश्चित.आदिवासी भागातून महादेव कोळी जमातीची लोकगीतांचे संकलन करणे तसे अवघड काम आहे. कारण हा समाज वाडयावस्त्यांवर दोन-चार घरांच्या समूहाने राहतो त्यामुळे

त्यांच्यापर्यंत पोहचणे आणि त्यांची लोकगीते मिळविणे हेच दिव्य काम आहे. माझ्यादृष्टीने येथेच संशोधनाचा पहिला टप्पा पूर्ण होतो.

वैश्विक मानव जातीच्या प्रारंभिक अवस्थेतील मानवी जीवनसमूह अवशेष म्हणून आदिवासींकडे बघावे लागेल. त्यांची संस्कृती ही सर्व संस्कृतीची मूलस्रोत आहे.म्हणून तर स्त्री-पुरूष समानता, मातृसत्ताक पद्धती, प्राणी प्रेम, सहकार्याची भावना, समूहनिष्ठा, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, अल्पसंतुष्टवृत्ती, माणूसकी, चराचराकडे समदृष्टीने पाहण्याची वृत्ती, निसर्गाशी घट्टपणे टिकवलेले नाते ही मूल्ये आदिवासी संस्कृतीत आजही तितक्याच आत्मीयतेने जपली जातात. म्हणून तर आजही ही मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी आदिवासी समाज आपल्या विधीगीतातून, सण-उत्सवातून, दैवतगीतांतून, श्रमगीतांतून, नृत्यातून, संगीतातून आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

लोकसाहित्याची भाषा ही नित्याची बोलीभाषा असते. ती बदलत नाही असे नाही पण ती बदलत असताना आपले वैशिष्टय अबाधित ठेवून त्यात नवीनतेची भर घालून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत जात असते. त्याचप्रमाणे लोकसाहित्य हे जाणीवपूर्वक केले नसते तर ते सहज विकसित झालेले असते. त्याचा स्विकार हा व्यक्तीकडून होतो. त्यांच्याकडून ते उपयोजिले जाते, त्यात बदल होतात. त्याचे एकाकडून दुसऱ्यापर्यंत संक्रमण होते.

लोकगीतांची निर्मिती सर्वच जमातींमध्ये महिलांनी प्रामुख्याने केली आहे. त्यांचे गायन जोपासना संवर्धन हे ही महिलांच्या पुढाकाराने करतात. या जमातीत महिलांच्या बरोबरीने पुरूषही या लोकगीतांच्या निर्मितीमध्ये त्यांचे गायन जोपासनासंवर्धन या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावतात. याचे कारण असे की स्त्री-पुरूष समतेची बीजे असलेली आदिम समाजव्यवस्थेचे अवशेष अजूनही नाममात्र का होईना शिल्लक आहेत. लोकगीतांच्या निर्मितीवर बदलत्या काळाचा परिस्थितीचा फार मोठा प्रभाव पडतो म्हणून प्रत्यके पिढीतील बदलत्या परिस्थितीतील बदलत्या संस्कृतीच्या, बदलत्या मूल्यांचा आधार घेऊन लोकगीते निर्माण झालेली दिसतात.

आदिवासी समूहात विविध लोकदैवतांच्या उपासनेसाठी अनेक विधिनाटये जन्मास आली. या विधिनाटयातच अनेक लोकनृत्यांचाही समावेश होतो. मुळात आदिवासींच्या नृत्यांचा उगम आदिम श्रद्धायुक्त विधितून , धार्मिक उत्सव, उपासनांतून तसेच निसर्गातील गूढ अज्ञात शक्तींवर नियंत्रण मिळविण्याच्या प्रेरणेतून झालेला आहे. या त्यांच्या श्रद्धेचे प्रतिबिंब त्यांच्या नृत्याच्या हालचालीत किंवा आकृतीबंधातून देखील दिसून येते. याचमुळे आदिवासींची बहुतेक नृत्ये गोलाकार केली जातात. कारण या गोलाकारात एकीचे सामर्थ्य दिसते आणि या मंतरलेल्या गोलामुळे आदिवासींचे संरक्षण होते. अशी त्यांची श्रद्धा आहे. आदिवासी समूह निसर्गपूजक असल्यामुळे अनेकदा काही पशू , पक्षी, मासे

यांनादेखील लोकदैवतांचे स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते. त्यामुळे पशू, पक्षी, मासे यांची गती, चपळता, सामर्थ्य, धूर्तता इ. गुण आत्मसात करण्यासाठी तो त्यांची उपासना करतो.

आदिवासी स्त्रीचे जीवन हे अजूनही निसर्गाला जवळचे वाटते. निसर्गाच्या कुशीत, अंगाखांदयावर वाढणा•या आदिवासी जमातीच्या स्त्रीचा आविष्कार होतो, तो तिच्या लोकगीतातून. या स्त्रियांचे जीवन द•याखोऱ्यातून वाहणाऱ्या निर्झराप्रमाणे निर्मळ व जंगलातून वाहणाऱ्या वाऱ्याप्रमाणे मुक्त आहे. जंगलातील उत्तुंग वृक्षाचा भारदस्तपणा आणि झाडांमधून गुंजन करणाऱ्या पक्ष्यांचा स्वछंदीपणा आदिवासी स्त्रियांच्या जीवनात प्रतित होतो. आदिम स्त्री आपला दिनक्रम निसर्गातल्या घडामोडीनुसार व्यतीत करत असते. भारतीय संस्कृतीत नारीरूपात आढळणाऱ्या सर्व हळूवार भावना आदिम स्त्रीतही प्रकर्षाने जाणवतात. निसर्गातील फुले, फळे, मनी, रंगीबेरंगी माळा अशा आभूषणांच्या माध्यमातून स्त्रीचे रूप अजून खुलून दिसते. नटलेली स्त्री ही आदिम स्त्रीचे स्वरूप असून त्यातून तिचे सौंदर्यखुलते असे आदिवासी मानतात. आदिवासी स्त्री ही मूळातच लाजाळू असते, समाजात विशेषत: पुरूषांच्या समूहात ती कमी वावरते. तिचा वावर असतो तो प्रामुख्याने राना-वनात, शेतात काम करताना आपल्या स्वरचित गीतांतून सुख, दु:खाला वाट मोकळी करून देते. लग्न समारंभात विशेषत्वाने ती आनंदी दिसते.

आदिवासी समूहात लोकगीतेही इतर मानवी समूहाप्रमाणेच विविध उद्दिष्टांच्या समर्थनार्थ गायली जातात. मनोरंजन, श्रमपरिहार, भावाभिव्यक्ती तसेच लोकनृत्याला साथ अशा प्रकारचे एकंदरीत प्रलोभने असतात. या लोकगीतांची भाषा ही सहज संपन्न अभिनयातून साकारली जाते. शब्द कमी व हालचाली जास्त असे स्वरूप आपण पाहतो. यावरून आदिवासी लोकसमूहात लोकगीत मौखिक परंपरेने प्रचलित असते. त्या समूहाच्या माणसाची आणि जीवनविशेषांची त्यात अभिव्यक्ती होते. मानवी जीवनाच्या सर्व अंगाच्या संदर्भासह लोकगीत अवतरते.

लोकगीतांचे अनेक प्रकार आपल्याला ढोबळमानाने पहावयास मिळतात. उदा. धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, निसर्गपर, कौटुंबिक इ. परंतु यामध्ये पुन्हा अनेक उपप्रकार असल्याचे दिसते. स्त्रियांची लोकगीते, पुरूषांची लोकगीते आणि स्त्री-पुरूष एकत्रित होऊन सादर करणारी लोकगीते असे वर्गीकरण करता येईल. सदरच्या शोधनिबंधात केवळ स्त्री हा घटक दृष्टीपथासमोर ठेवून स्त्रियांच्या जीवनानुभूतीचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांची देवतावरील श्रद्धा असणारी गीते, लग्नविधीप्रसंगीची गीते, श्रमावर आधारीत लोकगीते, सण-उत्सवाप्रसंगीची लोकगीते, नातेसंबंध व्यक्त होणारी गीते यांचा समावेश करण्यात आला आहे.

# देवताविषयक लोकगीते

आदिवासी हा प्रामुख्याने निसर्गपूजक आहे. तो निसर्गातील सूर्य, चंद्र, धरती, जल, जंगल यांना देवता मानतो. तरीही काही पौराणिक देवदैवतांचा पगडा आदिवासींच्या मनावर असल्याचे दिसून येते. त्यात प्रामुख्याने राम, सीता, श्रीकृष्ण यांसारख्या रामायण महाभारतातील दैवतांना आदिवासी समाज देव मानू लागला. त्यांचा नामोल्लेख आदिवासी आपल्या लोकगीतांतून करू लागले. महादेव कोळी हा आदिवासी समाज डोंगर, दऱ्यांत राहत असल्यामुळे येथील स्त्री ही पुरूषांप्रमाणेच अत्यंत कष्टाळू आहे. पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून काम करण्याची वृत्ती तिच्यात दिसून येते. त्यामुळे श्रमगीते असोत की विधीगीते, आदिवासी स्त्रीच्या गीतातून स्त्रीसंवेदना आणि देवदेवतांवरचा उदार दृष्टीकोन पहावयास मिळतो. त्यांच्या गीतांतील देवदेवतांची वर्णने ही अत्यंत प्रामाणिक व विश्वास दर्शविणारी आहेत. त्यामुळे त्यांच्यात देवभोळेपणा कमालीचा जाणवतो. आपले जीवन हे केवळ दैवीशक्तीमुळेच चालले आहे असा त्यांचा दृढ विश्वास आहे. हिंदू धर्मात कोणतेही कार्य करताना जसे गणपतीचे नामस्मरण केले जाते तसे आदिवासी लोक शेतात काम करताना सर्वात प्रथम धरणीमातेला वंदन करतात.

पहिले नमन नमो कुणाला

धरतुरी मातेलान् काय ओ

दुसरे नमन नमो कुणाला

बहिरोबा देवालान् काय ओ...

अशाप्रकारे आपल्या परिसरातील सर्व आदिवासी देवदैवतांचा नामोल्लेख करतात. शेतामध्ये काम करताना पुरूषांप्रमाणे स्त्रियांचाही तेवढाच सहभाग असतो. त्यामुळे ते दोघेही बरोबरीने गीत गातात. एक स्त्री आपल्या सखीला शेतात काम करता करता श्रीकृष्णाच्या खोडयांविषयी सांगताना वर्णन करते -

बांधावं लावली बोर, बोर सखे

बोरीला मुरमाची भर.

बोरीला आलाय बार, बार सखे

पाण्याला निघाली नार.

डोईवर चुंबळ माठ, माठ सखे

चढली यमुनेचा घाट.

कृष्णाने आडवली वाट, वाट सखे

कृष्णाला पगार तीनशे साठ...

या गीतातून शेतातील बोर, पाणी आणण्यासाठी निघालेली नार आणि कृष्णाला पगार तीनशे साठ याचा कोठेही सहसंबंध लागत नाही. केवळ एक श्रीकृष्णावरील भक्ती व्यक्त करण्यासाठी ही आदिवासी स्त्री मोठया अभिमानानेआपल्या सख्यांना सांगते की कृष्णाला पगार तीनशे साठ. हा पगाराचा आकडा तिच्यादृष्टीने कमालीचा वाटतो. अशाच प्रकारे एका फुगडीच्या गीतात आदिवासी स्त्री सीतादेवीला नवस बोलते कारण ही स्त्री कष्ट करण्यासाठी, गव्हाचे पीक घेण्यासाठी अत्यंत खडतर ठिकाणी, घाटमाथ्यावर जाते. रोजच्या या खडतर प्रवासातून सुखरूप आपल्या घरी यावे म्हणून ती गीताच्या माध्यमातून सीतादेवीला नवस करते -

कोकणी गहू पिके घाटाला, पिके घाटाला

नवस काय बोले वज्रादेवीला, सीतादेवीला

सोन्याचा पाळणा वाहेल तुला

चांदीचा दोर लावीन त्याला

मोत्याची घुंगरा लावीन त्याला

त्यामध्ये निजवील माझ्या बाळाला हरिश्चंद्राला...

या गीतातील स्त्री ही देवभोळी आहे. ती पाळण्यामध्ये आपल्या बाळाला घालू पाहते. आपल्या बाळाला ती हरिश्चंद्राची उपमा देते. तो दिवसभर सुखी असावा अशी अपेक्षा करते कारण मी डोंगर, दऱ्या पार करून दूरवर शेती करण्यासाठी जात आहे माझ्या पाठीमागे माझ्या बाळाचे संरक्षण कर अशी प्रार्थना ती करते त्यासाठी ती नवस करते की, मी तुला सोन्याचा पाळणा वाहीन, त्याला चांदी,मोत्याची सजावट करीन पण माझ्या बाळाला तू सुखी ठेव. वास्तविक पाहता सोन्याचा पाळणा, चांदीचा दोर आणि मोत्याची घुंगरं लावण्याइतपत या स्त्रीची परिस्थिती नाही, तरीही ती आपल्या पोटच्या गोळयासाठी वाटेल ते करण्यास तयार आहे. येथे या आदिवासी स्त्रीची आपल्या मुलाप्रति दिसून येणारी माया तर दिसतेच त्याचबरोबर देवावरील श्रद्धाही तितकीच दिसून येते. स्त्री-गीतांतील श्रीकृष्णाविषयक गीते आगळी-वेगळी आहेत. यातील बरीच गीते मराठी संतांच्या गौळणीशी साम्य दर्शविणारी आहेत. पण

गौळणीतील शृंगार भाव मात्र या गीतात नाही. तर वत्सल भावाने ओथंबलेली ही गीते मातृहृदयाचा प्रत्यय देणारी अशी आहेत.

आपल्या गावशिवारातील दैवतांविषयी आदिवासी स्त्री नेहमीच गुणगौरव करत असते. जसे श्रीकृष्णाला पगार तीनशे साठ असा उल्लेख करते तसाच ती आपल्या कुलदैवताविषयी म्हणजेच बहिरोबा देवाचे कौतुक करते -

काळीया वावरी रामा फुलला पळस

बहिरोबा देवाचा रामा सोनेरी कळस...

अशाप्रकारे प्रत्येक देवाचे नाव घेऊन ही स्त्री आपल्या परिसरातील देवांचे कळस सोन्याचे असल्याचे सांगते. वास्तविक पाहता आदिवासीभागातील देव दगडाचे आहेत. तरीही कुठेतरी पाहण्यात किंवा ऐकीव माहितीच्या आधारे आपल्याही देवांचा कळस हा सोन्याचा असावा असे या स्त्रीला वाटते. थोडक्यात आपल्या देव-देवतांविषयीचा आदर, मोठेपणाती आपल्या गीतातून मांडण्याचा प्रयत्न करते. चंद्र, सूर्याचे उगवणे-मावळणे तर रोजचेच असते परंतु आदिवासी स्त्रीच्या दारातील त्यांचे आगमन हे एखादया पाहुण्याप्रमाणे असते. त्यांचे आगमन होताच या स्त्रीची तारांबळ उडते आणि या पाहुण्यांचा पाहुणचार कशाप्रकारे करावे हे तिला समजत नाही.

सांज सकाळच्या पहारी गं सांज सकाळच्या पहारी

कुणा पाहुणा आला दारी गं ये नारी

चंद्र सूर्य दोघे भाऊ

येली बसाया काय देऊ गं ये नारी

चंदनाचा पिढी पाट गं

येनी बसूकार केला गं ये नारी...

आपले जीवन देदीप्यमान झाले आहे ते केवळ चंद्र-सूर्यामुळेच. असे या स्त्रीला वाटते. त्यामुळे या गीतातून ती त्यांना बसण्यासाठी चंदनाचा पिढी-पाट देते. तिने केलेला हा आदर पाहून चंद्र-सूर्यही मोठया प्रसन्नतेने तिच्या झोपडीत विराजमान होतात. म्हणून ही स्त्री जरी झोपडीत राहत असली तरी आनंदी आहे, समाधानी आहे.ती आपले आयुष्य हसत खेळत घालवत आहे.

आदिवासी समाजात लग्नसमारंभात देवक बांधण्याची एक प्रथा आहे. देवक म्हणजे नवरा-नवरीच्या आईवडिलांनी जंगलातील काही वनस्पतींच्या डहाळयांची पूजा करून मांडवात एका लाकडाला बांधली जाते. या देवकाच्यावेळी महिला गाणी गातात -

मांडवाच्या दारी,मांडवाच्या दारी

देवक बांधते जुडून, देवक बांधते जुडून

देवा बहिरोबा , देवा बहिरोबा

यावा ठानाक सोडून, यावा ठानाक सोडून...

देवक बांधणे हा विधी लग्नकार्यात सर्वात महत्त्वाचा विधी मानला जातो. पंचकोशीतील देवदेवतांना या निमित्ताने बोलावले जाते. प्रत्येक देवाचा गीताच्या माध्यमातून नामोल्लेख केल्याशिवाय हे कार्य निर्विघ्न पार पडणार नाही असा आदिवासी स्त्रीचा समज असतो.

पहाटेच्यावेळी जात्यावर दळण दळताना ही स्त्री पंढरीच्या विठ्ठलाचे गुणगौरव करते. वास्तविक पाहता पंढरीचा विठ्ठल हा सर्व जातीधर्माचे दैवत आहे. त्यामुळे या विठ्ठलाच्या संपूर्ण देहाचे वर्णन खालील गीतातून आले आहे.

पंढरीला जाया नव्हता माझा मन

देवा विठ्ठलाने चिठ्ठया पाठविल्या दोन.

पंढरीला जाया माझी कालची तयेरी

विठ्ठल मुराळी घोडी चरते नहेरी...

या गीतातील स्त्री विठ्ठलाच्या प्रेमात इतकी एकरूप झाली आहे की, पंढरपूरातील प्रत्येक वस्तू, तेथील परिसर, रखुमाई यांचा गुणगौरव केला आहे. पंढरीची वाट ही इतकी पवित्र आहे की त्या वाटेने चालताना या स्त्रीला कशाचेही भान राहिले नाही. अशाच प्रकारे शंकराची आराधना करणारी ही स्त्री वैशिष्टयपूर्ण शंकरदेवाची पूजा करत आहे. ती गीताच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करते.

हाती तांबीयाची झारी

पाणी दैवाराचं भरी

पूजा शंकराची करी

शंकर देव थोर

यात्रा भरे घनघोर

नारळ फुटे पायरीवर...

हातामध्ये तांब्याची झारी घेऊन दैवाराचं म्हणजे दहिवराचं पाणी भरून ही स्त्री शंकराची पूजा करू पाहते. दहिवाराचं पाणी हे अत्यंत शुद्ध आणि पवित्र मानले जाते त्यामुळे असे पाणी तांब्याच्या भांडयात म्हणजेच झारीने शंकराला आंघोळ घालू इच्छिते. त्याचप्रमाणे शंकर हा देव किती महान आहे हे व्यक्त करताना ती पुढे म्हणते की, शंकर देवाची यात्रा मोठया उत्साहात साजरी केली जाते. येथे आदिवासी महादेव कोळींचे वस्तीस्थान हे सहयाद्रीच्या पर्वतरांगांवर अर्थात मावळ, राजगुरूनगर, आंबेगाव, जुन्नर तालुक्यांच्या पश्चिम पट्टयात मोठयाप्रमाणात विस्तारलेली आहे. बारा ज्योतिर्लींगापैकी सहावे ज्योतिर्लींग हे भीमाशंकर देवस्थान आहे. तर नाशिक येथे त्र्यंबकेश्वर या देवस्थानाच्या जवळपास महादेव कोळी समाज वसलेला असल्यामुळे अर्थातच तेथील समाजाचे श्रद्धास्थान हे शंकर असणारच म्हणून महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर या गीताची निर्मिती झाली असावी.

आदिवासी भागात 'बाया येणे' हा एक आजार मानला जातो. अंगावर पुरळ येणे, ताप येणे ही या आजाराची लक्षणं आहेत. वास्तविक पाहता हा गोवर व कांजिण्याचा प्रकार असतो पण हा देवीचाच काहीतरी चमत्कार आहे असे त्यांना वाटते. त्यामुळे बाया निघालेल्या व्यक्तीला पाच किंवा सात दिवस घराबाहेर पडण्यास परवानगी नसते. त्याचबरोबर विटाळापासून त्याला दूर ठेवले जाते. सात दिवस रोज दही, दूध, तूप, पाच फुले पाण्यात टाकून आंघोळ घातली जाते. आठव्या दिवशी जेथे बायांचे 'ठाणाक' म्हणजे मूळ स्थान असेल तेथे दर्शनाला नेले जाते. या विधीला खरे तर वैज्ञानिक आधार असा आहे की, रोज शुद्ध पाणी आणि दही, दूध, तूप आणि निसर्गातील पाच फुले पाण्यात टाकून आंघोळ केल्यामुळे पाण्याला आपोआपच आयुर्वेदाचा आधार मिळतो आणि अंगावरील पुरळ हळूहळू कमी होते पण देवावरील श्रद्धेपोटी येथील स्त्रिया देवीची गाणी म्हणतात-

थुई थुई पाऊसपडे बाया माझ्या पिकल्या उंबराखाली

पिकल्या उंबराखाली बायांनी डाव जो मांडिला ओ डाव जो मांडिला...

किंवा

उंबराच्या फुला रे तुला बत्तीस पाकळया हो

बत्तीस पाकळया बायांच्या भांगोभांगी खिळल्या हो

भांगोभांगी खिळल्या बायांच्या सैवारी दाटल्या हो

सैवारी दाटल्या बायांचा सैवार घवघव करी हो...

ही गीतं म्हणजे बायांची विनवणी करणे, त्यांची बोळवण करणे. आदिवासी समाजात उंबराच्या झाडाला दैवत मानतात. उंबराचे लाकूड ते कधीच जाळत नाहीत. त्यामुळे या वृक्षाचा विशेष करून आदिवासी लोकगीतांमध्ये वारंवार उल्लेख आल्याचे दिसते. या गीतात 'बाया पिकणे' म्हणजे अंगावर जास्तच पुरळ येणे, ताप येणे. याचा अर्थ असा की, एखादे फळ परिपक्व झाल्यावर त्याला पिकणे म्हटले जाते तसे संपूर्ण अंगाला फोड येणे आणि असहाय्य वेदना होणे म्हणजे बाया पिकल्या. गीतात उंबराच्या झाडाखाली या बायांनी खेळ मांडला आहे आणि त्या अतिशय आनंदाने खेळत आहेत असा उल्लेख आला आहे. याचा अर्थ असा की ज्यांच्या अंगावर या बाया निघाल्या आहेत तो माणूस खऱ्या अर्थाने पवित्र आणि नशिबवान आहे असा समज आदिवासी समाजात आहे. एकप्रकारे बाया निघणे म्हणजे चांगले लक्षण समजले जाते.

ज्यांच्या अंगावर बाया निघाल्या आहेत त्या व्यक्तीचे पुरेपुर लाड केले जातात. बायांच्या भांगामध्ये उंबराच्या फुलाच्या पाकळया खिळल्यामुळे त्या देवीची शोभा वाढलेली आहे. म्हणून ही आदिवासी स्त्री म्हणते देवीचा सैवार घवघव करी. येथे सैवार या शब्दाचा अर्थ शृंगार असा आहे. या गीतात पुढे चंदनाचा पाट, आंघोळीचा घाट असे वर्णन आल्यामुळे या गीतातील स्त्री ही एक दैवत तर असल्याची खात्री पटते पण ती एक सौंदर्यवती देखील आहे. ही देवी किंवा बाया म्हणजे साती आसरा असतात म्हणजेच सात बहिणी असतात असे आदिवासी स्त्रीचे म्हणणे आहे. त्यात मराठी, कोकणी, बामणी, गुजराती... अशा सातजणी बहिणी असून कोणतीही एक बहीण या व्यक्तीच्या अंगात संचार करीत असते अशी श्रद्धा या आदिवासी स्त्रीची असते. म्हणून त्यांचे गोडवे गाताना ही स्त्री म्हणते की,

दहया दुधाने वाट शिंपली गं माऊली माझे,

आम्ही मराठी बाया, कोकणी गाया आम्हाला वाट सांगा...

अशा प्रत्येक बहिणीचे नाव घेऊन हे गीत म्हटले जाते. येथील आदिवासी स्त्री या देवीची मनोभावे सेवा करते. सामान्य स्त्री पेक्षा या देवीची शक्ती अफाट आहे किंबहुना त्यांच्यामुळेच आपले अस्तित्व आहे अशी त्यांची श्रद्धा असते. या बायांचे लाड पुरवताना आदिवासी स्त्री एकाग्र झालेली आहे म्हणून ती गीतातून म्हणते -

आनाडी, कानाडी खेळ गणराया

सोनार आळीला गेल्या होत्या बाया,

सोनारीन बाय,सोनार दादा

बायांच्या आंगठया झाल्यात की नाय ओ?

आता देतो मग देतो उशीर झाला

लाडक्या बायांनी छंद घेतीला...

बायांचे लाड पूर्ण करण्यासाठी त्या बायांना कोणकोणते दागिने आवडले आहेत, कोणत्या दागिन्यांचा त्यांनी छंद घेतला आहे तो छंद पुरविण्यास येथील आदिवासी स्त्री सक्षम आहे. भले ती अडाणी असेल, दिसायला कुरूप असेल पण दागिने घडविण्यासाठी ती कोठेही जाण्यास तयार आहे.

देव-देवतांबद्दल आदिवासींच्या मनात जेवढे प्रेम, श्रद्धा असते तेवढीच भीतीही असते. देव आपल्यावर कोपणार तर नाही ना. देव आपले वाईट तर करणार नाही ना अशी भीती वाटत असते. म्हणून हा समाज देवाला सदैव नतमस्तक होत असतो. स्त्रियांना जसा साज-श्रृंगार असतो तसाच ज्यांना बाया निघाल्या आहेत त्यांनाही साज-श्रृंगार गीतातून कबूल केला जातो -

कान्हा थांबून ऽऽ थांबून

बाया आल्यात लांबूनऽऽ

बाई तुम्ही नाकाला काय ओ लेता

नथीयेचे जोडऽऽ जोडऽऽ जोड ऽऽ

आता दे गाण्याला तोड

नायतर मोडील तुझी खोड.

कान्हा थांबून ऽऽ थांबून

बाया आल्या लांबूनऽऽ

बाई तुम्ही कानाला काय ओ लेता

रिंगायेचे जोडऽऽ जोडऽऽ जोड ऽऽ

आता दे गाण्याला तोड

नायतर मोडील तुझी खोड...

अशाप्रकारे सर्व दागिन्यांचा उल्लेख येथे केला जातो. त्यामुळे या बाया नाराज होत नाही. अंगावरील जखमा कमी होतात व पर्यायाने वेदनाही कमी होतात. अशी समजूत येथील लोकांची आहे. बायांना खूश करण्यासाठी येथील स्त्री-पुरूष गीताच्या माध्यमातून अनेक प्रलोभने देऊ करतात. खालील गीतातून याची आपल्याला प्रचिती येते -

आकाशाला रहाट बाई पाताळाला बावडी

बाई साजने पाताळाला बावडी.

या बावडीचे पाणी ओ जाऊ दे नारळीबागेला

बाई साजने नारळीबागेला.

नारळांचे नारळ येऊ द्या देवीच्या सेवेला

बाई साजने देवीच्या सेवेला.

आकाशाला रहाट बाई पाताळाला बावडी

बाई साजने पाताळाला बावडी

या बावडीचे पाणी ओ जाऊ दे मुसुंबीबागेला

बाई साजने मुसुंबीबागेला.

मुसुंबीच्या मुसुंब्या येऊ द्या देवीच्या सेवेला

बाई साजने देवीच्या सेवेला......

देवदेवतांना फळांचा नैवद्य दिला जातो. कोणत्याही शुभकार्यात पाच फळे देवाला अर्पण केली जातात. त्यामुळे या गीतातून सर्व फळांचा उल्लेख आलेला आहे.

जंगलात मुक्त विहार करणारा, स्वछंद जीवन जगणाऱ्या मानवाला काही गोष्टींचे गूढ व काही गोष्टींचे भय फार वाटत असे. प्रामुख्याने जन्म, मृत्यू, भूकंप, महापूर, वणवा, मुसळधार पाऊस या सारख्या आपत्ती त्यास पूर्णपणे अनाकलनीय नव्हे तर भयावह भीती निर्माण करणाऱ्या होत्या. या कालखंडातील मानवाने या वेळी जंगलात वावरत असणाऱ्या अनेक हिंस्त्र श्वापदांना आपल्या नियंत्रणात आणले. मात्र नैसर्गिक उत्पात पाहताना या आदिमअवस्थेतील मानवाला या कोणी तरी देवता असाव्यात असे वाटले. त्यांचे हे शक्तीशाली विकाळ रूप पाहून त्यांच्याशी आपल्याला सामना करता येणार नाही, याची त्याला पुरेपुर खात्री पटली. निसर्गाच्या या भयकारी रूपाने आपले अहित करू नये यासाठी मानवाने त्याची पूजा केली. म्हणून आदिमानवाचा सर्वात पहिला देव हा निसर्ग आहे.

जल, जंगल आणि जमीन हे आदिवासींचे हक्काचे प्रमुख स्रोत आहेत. त्यामुळे ते जल, जमीन आणि जंगलाला दैवत मानतात. कोणतेही कार्य असो आदिवासी प्रथम त्याची पूजा करतो. लग्न कार्या त नवऱ्या मुलाला जेव्हा आंघोळ घातली जाते तेव्हा तो प्रथम पाच पानांचा विडा करून सर्वात प्रथम पाण्याला अर्पण करतो. त्यानंतर धरतीला अर्पण करतो. हा विडा म्हणजे नागवेलीच्या पानाचा विडा नसतो तर जांभळाच्या पानाचा असतो. त्या नंतर हा नवरदेव आजूबाजूच्या दैवतांना अर्पण करतो. या संबंधीचे गीत आदिवासी स्त्री आपल्या दैवतांना उद्देशून म्हणते -

पाची पानाचा विडा,पाची पानाचा विडा
बाळ कळशामधी सोडी, बाळ कळशामधी सोडी.
आई धरतुरीचा, आई धरतुरीचा
बाळ दरशान करी, बाळ दरशान करी.
चंद्र सूरयाचा, चंद्र सूरयाचा
बाळ दरशान करी,बाळ दरशान करी...

ही सर्व गीतं एक स्त्री प्रथम म्हणते आणि तिच्यामागे बाकीच्या स्त्रिया ताला सुरात म्हणतात. धरणीमातेचे स्मरण प्रथम झाल्यावर पंचकोशीतील इतर देवांचा नामोल्लेख केला जातो.

आदिवासी समाजाच्या देव-देवता या निसर्गातील विविध घटक असतात. धरती, सूर्य, चंद्र, पृथ्वी यांची पूजा केल्याशिवाय आदिवासी कोणतेही काम करण्यास तयार होत नाही. वर्षानुवर्षे निसर्गा

च्या सहवासात राहणाऱ्या या समाजाचा निसर्ग हाच देव आहे. त्यालाच तो मित्र मानतो. म्हणून आपल्या परिसरातील देवतांचा उल्लेख करून कामाला सुरूवात करतात.

ताथवडीचे कांब गाव, गाव लागला आहुपा
देव बहिरूबाबा आहे शिवावर गायखा.
ताथवडीचे कांब गाव, गाव लागला आगाना
सायाची भाकर शिपाई हेरतो रागाना.
ताथवडीचे कांब गाव, गाव लागला पिपारगना
खांदयावं पदर पोरी उडते टनाटना.

ताथवडीचे कांब गाव, गाव लागला डोणी
पाठणीवरी गोण चाले गाढवाच्या वाणी.
ताथवडीचे कांब गाव, गाव लागला तिरपाड
लागले तिरपाड तेथे पाण्याची तरफड.
ताथवडीचे कांब गाव, गाव लागला आसाना
सायची भाकर खातो माशाच्या वासाना.
ताथवडीचे कांब गाव, गाव लागला जांभोरी
नाचणीची भाकर वर खेकड चिंबोरी.

वरील गीतात ताथवडी हे या परिसरातील लोकदैवत आहे. त्याचा नामोल्लेख करून प्रत्येक गावाचे वैशिष्टय येथे सांगितले आहे. या गीतांमध्ये यमक अत्यंत चपखल आल्यामुळे नादमयता येथे आली आहे. गावाच्या यमकाला त्याच्या खाली त्या गावाची सद्यस्थितीचे यथार्थ वर्णन आले आहे.

आपल्या परिसरातील इतर दैवतांचा उल्लेख करून शेतातील काम करण्याची येथे रीत आहे. ज्यावेळी सामूहिक पद्धतीने शेतात काम केले जाते तेव्हा एक विरंगुळा म्हणून एक पुरूष गाणं म्हणतो -

काय चमकीले ओ काय चमकीले
वनाई देवीचा कळस चमकीला
ओ दाजीबा कळस चमकीला.

समया लावूनी देव देवळात बसविला

ओ दाजीबा देवळात बसविला.

अशा पद्धतीने जुन्नर शहरात काय चमकीला, डागोबा डोंगरावं काय चमकीला त्याचे उत्तर शंकर देवाचा कळस चमकीला, मारूती देवाचा कळस चमकीला असा उल्लेख केला जातो.

आदिवासींच्या लग्नामध्ये सर्व देव-देवता कोणत्याना कोणत्या स्वरूपाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे लग्न कार्यात सहभागी होतात अशी त्यांची श्रद्धा असते. याविषयी गंगाधर मोरजे म्हणतात की, जेव्हा या लोकश्रद्धा परिवर्तन नाकारतात किंवा बदलाचे तत्त्व स्विकारत नाहीत तेव्हा त्या अंधश्रद्धा बनण्याची शक्यता असते. नवऱ्या मुलाच्या लग्नात किंवा नवरी मुलीच्या लग्नात ही दैवते वरबाप, वरमाय, करवली (कलवरी) यांच्या रूपात येतात. उदा.

मांडवाच्या पुढल्या दारी चिखल कशानी झाला

असा ...... बाळ नवरा त्याचा वरबाप न्हाला.

देव ना गं मारवती अंगी वरबाप झाला

मांडवाच्या पुढल्या दारी नवरा न्हानाया आला

आई ना गं वरसुबाई अंगी कलवरी झाली...

मानसिक आधारासाठी आदिवासी स्त्री देव-देवतांनालग्नकार्यात सामील करून घेताना दिसते. कुठल्याही प्रकारचे विघ्न येऊ नये आणि संपूर्ण कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा ही तिची इच्छा असते. म्हणून ती वरबाप, वरमाय, करवली यांसारख्या हक्काच्या नात्यात दैवतांना सामावून घेते. त्याचबरोबर देव-देवताही स्वत:हून अशा कार्यात सहभागी होतात असा या स्त्रीचा समज आहे. अंगी वरबाप झाला म्हणजे स्वत:हून वरबाप झाला असा त्याचा अर्थ होतो.जसे लग्नकार्यात प्रत्येक घरी निमंत्रण देऊन सर्व मंडळींना सामावून घेतले जाते तसे आदिवासींच्या लग्नामध्ये देव-देवतांनाही बोलवले जाते.

तळयातल्या गं कापूस येनी

तुझा काजुनी दोरा

वरसुबायला बोलवान करा

नवरा न्हानाया चला...

नवऱ्याला आंघोळ घालताना, देवक बांधताना, आहेर आणताना या सर्व प्रसंगांना देव-देवता बोलवल्या जातात. देवक बांधताना पंचक्रोशीतील देवतांना कशाप्रकारे बोलविले जाते ते पाहा -

मांडवाच्या दारी, मांडवाच्या दारी

देवाक बांधता जुडून, देवाक बांधता जुडून.

देवा वनदेवा,देवा वनदेवा

यावा ठानाक सोडून, यावा ठानाक सोडून...

निसर्ग हाच आदिवासींचा देव त्यामुळे निसर्गातील घटक हेच त्यांचे देव झालेले आहेत. काही विधी करण्यासाठी ते निसर्गातील काही वैशिष्टयपूर्ण वृक्षांच्या लाकडांचा वापर करूनच विधी करतात. उदा. देवकाचा विधी करण्यासाठी काही विशिष्ट जातीच्या वृक्षांचा उल्लेख खालील गीतात आल्याचा दिसते. ही वृक्ष आदिवासींची दैवते आहेत.

मांडवाच्या दारी,मांडवाच्या दारी

देवाक बांधता जुडून, देवाक बांधता जुडून

खैराचा मुसाळ, सागाचा आठवा

तागाचा येठना,दगडाचा दिवा

तिळाचा तेल, कापराच्या वाती...

आदिवासीलोक वरील वस्तुंचा वापर करून देवकाचा कार्यक्रम करतात. या वस्तू आदिवासींच्या दैनंदिन जीवनातील असतात. त्यांचा वापर त्यांना रोजच करावा लागतो त्यामुळे गीताच्या माध्यमातून त्यांना या वस्तू देवासमान भासतात. म्हणून देवकाला या वस्तूंना पर्याय नाही. स्वत:च्या घरात या वस्तू नसतील तर दुसऱ्यांच्या घरी अथवा दुसऱ्या गावातून आणल्या जातात.

# लग्नगीतातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजाणिवा

आदिवासी महादेव कोळी जमातीतील लग्नविधी हा वैशिष्टयपूर्ण आहे. पूर्वी पाच दिवस हा विधी चालत असे. अलीकडे तो तीन दिवसावर आला आहे. आपली मूळ संस्कृती सोडून महानगरात आलेली काही आदिवासी मंडळी एका दिवसाचा लग्नविधी करतात. आदिवासींचे लग्न आणि त्यात म्हटली जाणारी लग्नगीतं ही वैशिष्टयपूर्ण आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या विधीत अनेक उपविधी केले जातात. या प्रत्येक उपविधीसाठी स्वतंत्र गीताची रचना केलेली आहे. उदा. साखरपूडा, मळी काढणे, पाच बोटं लावणे, हळद लावणे, आहेर, देवक, बसकावरील गीत, काकण बाशिंगं सोडणे इत्यादी.

आदिवासी महादेव कोळी समाजामध्ये लग्नाच्या अगोदरच्या दिवशी मांडव डहाळयांचा कार्यक्रम असतो. त्यापूर्वी म्हणजे लग्नाच्या दोन दिवस पूर्वी संध्याकाळी वधू-वराची मळी काढली जाते म्हणजेच आंघोळ घातली जाते. गावातील प्रत्येक घरातील महिला या कार्यक्रमाला उपस्थित असतात. आदिवासी भागात रानावनात भटकून, प्रचंड कष्ट करून येथील माणसांचे शरीर घामाने आणि धूळ, मातीने मलीन झालेले असते. लग्नाची हळद लावण्यापूर्वी शरीर स्वच्छ करण्यासाठी ही मळी काढली जाते. थोडक्यात लग्नाचे तीन किंवा पाच दिवस या वधू-वरांचे जास्तीत जास्त सौंदर्य खुलविण्याचा येथे प्रयत्न केला जातो. त्याची सुरूवात ही मळी काढण्यापासून होते त्यामुळे लग्नाची हळद चांगली लागते असे त्यांना वाटते. रात्रीचे जेवण उरकून गावातील महिला एकत्र जमतात आणि मळी काढण्याचा कार्यक्रम सुरू होतो. त्यावेळी गीत गायले जाते -

चंदनाचा सारीपाट त्याला मोत्याचा थाट

......नवरी तिला उटण्याचा उल्हास

उटण्याच्या उल्हासाने तिला झालाय उकाडा

बाप तिचा चतुर घाली अंजनी वारा...

अशाप्रकारे वधूच्या घरी आणि वराच्या घरी त्यांच्या नात्यातील प्रत्येक व्यक्तीचे नाव घेऊन हे गीत गायले जातात.

लग्नसोहळा तसा आनंदाचा, उत्साहाचा दिवस. यावेळी नवरा-नवरीला बसायला चंदनाचा पाट दिला जातो असे गीतात म्हटले जाते. वास्तवात तो चंदनाचा नसतो पण येथील महिला या गीतातून अतिशयोक्तीपूर्ण वर्णन करतात. त्यामुळे कार्यक्रमाचे महत्त्व अधिकच वाढताना दिसते. आदिवासी समाजाच्या वास्तव जीवनामध्ये आंघोळीला सावण मिळणे दुरापास्त तर उटणे त्यांना कुठून मिळणार? तरीही उटण्याची आंघोळ ही पवित्र व सर्वात चांगली म्हणून गीताच्या माध्यमातून या महिला आपल्या भावना शब्दरूपी व्यक्त करतात. या गीतात उटणे लावल्यामुळे नवरीला किंवा नवऱ्याला प्रचंड उकाडा झाला आहे अशावेळी तिचा बाप तिला वारा घालत आहे म्हणजेच आपल्या मुलीचे लाड हा बाप करताना दिसतो.

लग्नाच्या दिवशी मुलीच्या घरी सकाळी मांडव डहाळयांचा कार्यक्रम असतो. उंबर, जांभळ, आंबा या झाडांच्या डहाळया या मांडवाला लावून मांडव सजविला जातो. निसर्गातील या वनस्पती आदिवासींना अत्यंत पवित्र आणि शुभ वाटत असतात. त्यामुळे लग्नघरी या झाडांच्या डहाळयांनी मांडव सजविला जातो. त्यावेळी सर्वत्रच धावपळ होत असते. अशावेळी गावातील महिला गाणी गातात -

मांडव घातीला डांबा डिंबाचा

वर काय पासूड बहूत रंगाचा

नवरीची आई कशाला रूसली ग

मान घियाला सांधीला बसली ग...

असे बाप, भाऊ, बहीण यांचा उल्लेख करून हे गीत गायले जाते. वास्तविक पाहता. येथे कोणीही रूसत नाही पण कामाच्या धावपळीत गावातील स्त्रियांना घरातील माणसं दिसली नाही तर उपरोधिकपणे अशाप्रकारचे गीत गातात.आदिवासींचा हा मांडव म्हणजे मोठा प्रतिष्ठेचा असतो म्हणून त्याला डांबा डिंबाचा हे विशेषण लावले आहे.

महादेव कोळी समाजात नवरीला किंवा नवऱ्याला अंगणात सर्वासमोर आंघोळ घातली जाते. ही अंघोळ सर्वमहिलांनी घालण्याचा रिवाज असतो. त्यावेळी खालील गीत म्हटले जाते -

काशेची न्हानी देवा गुलाबाचं रे पाणी

पाणी ठिवा रे नवऱ्या बाईला

काशेची न्हानी देवा गुलाबाचं रे पाणी

पाणी उतरा गं नवऱ्या बाईला...

ही आंघोळ साधीसुधी नसून अत्यंत पवित्र मानली जाते. म्हणून अंगणातील जागा यांना काशेची वाटते तर पाणी हे गुलाबाचे वाटते.

हळद लावल्यानंतर नवरीला मुंडावळया बांधल्या जातात. या मुंडावळया निसर्गातील काही वनस्पतींपासून बनवलेल्या असतात. निसर्गातील घटक हे आदिवासीना पूजनीय आहेत. त्यामुळे त्यांचा उल्लेख खालील गीतातून आलेला आहे.

पयली मुंडोळी कशाची, पयली मुंडोळी कशाची

पयली मुंडोळी चाफ्याची, पयली मुंडोळी चाफ्याची

नवऱ्याबाईच्या बापाची, नवऱ्याबाईच्या बापाची

दुसरी मुंडोळी कशाची, दुसरी मुंडोळी कशाची

एवढी हाऊस पुरवा,एवढी हाऊस पुरवा

दुसरी मुंडोळी जाईची, तिसरी मुंडोळी रूईची

एवढी हाऊस पुरवा,एवढी हाऊस पुरवा

नवऱ्याबाईच्या फुईची, नवऱ्याबाईच्या फुईची ...

वरील गीतातून हळदीनंतर मुंडावळया नवरीला बांधल्या जातात. पहिली मुंडावळी चाफ्याच्या फुलाची असते ,वडील म्हणजे चाफ्याचे फूल. सर्वांगाने सतत सुहास दरवळणाऱ्या फुलाची उपमा नवरीच्या वडिलांना दिलेली आहे. तिची प्रथम हौस पुरवायला पाहिजे. दुसऱ्या मुंडावळीत जाईच्या फुलाची उपमा नवरीमुलीच्या आईला दिली आहे, आई जाई तर बापचाफा. अशा संपन्न फुलांच्या उपमा नवरीमुलीच्या आई-बापाला दिल्या जातात. त्यांची हौस पुरवावी लागते. वरील गीत अहमदनगर जिह्यातील अकोले तालुक्यात म्हटले जाते. याच आशयाचे गीत पुणे जिह्यात आंबेगाव तालुक्यात अशाप्रकारे म्हटले जाते -

हळदी कुंकाची वाटी, चौक भरीला गाठी

हळद लावितो चाफा, नवरदेवाचा बाप

हळदी कुंकाची वाटी, चौक भरीला गाठी
हळद लाविते आई, नवरदेवाची आई...

या गीतातूनही आई ही जाईच्या रूपात आहे तर बाप हा चाफा आहे. निसर्गातील या वृक्षांना लग्नकार्यात खूप महत्त्व असते. काही वृक्षांवर आदिवासींचे एवढे प्रेम असते की जणूकाही शुभकार्यात त्यांना ते आपलेच गणगोत मानतात.

मुलीचे लग्न झाल्यावर तिला दुसऱ्या घरी जावे लागते. तेथे गेल्यावर तिला सासरचे रितीरिवाज, तेथील माणसांच्या आवडीनिवडी जपाव्या लागतात. आदिवासी स्त्री लग्नाच्या कार्यक्रमातच गीताच्या माध्यमातून नवऱ्यामुलीला सासरच्या लोकांबद्दल काही समजुतीची शिकवण देते. तिथे कसे राहावे, वागावे या संबंधी मार्गदर्शन करताना म्हणते -

तळा भरलाय फुल
तळयात पाणी डुलं
......तुझ्या साठी
सासरा फिरला किती
जरा सासरा बोले
जरा मानून घ्यावे
नाही मानून घेणार
शब्द उलटून देणार...

आपले अनुभव कथन करताना नवरी मुलीला एक स्त्री सबुरीने घेण्याचे सांगते पण ही मुलगी तिचे म्हणणं ऐकण्याच्या मन:स्थतीत नाही. ती उलट सासऱ्याला बोलण्याचे संकेत देते. कारण तिच्या माहेरचे संबंध आज तुटणार आहेत. त्यामुळे तिच्या मनात दु:खद भावना निर्माण झाल्या आहेत. वरील गीतातील 'तळे' हे नवरी मुलीच्या डोळयांना संबोधले आहे. भरल्या डोळयाने सासरी जाणारी मुलगी अस्वस्थ झालेली आहे. जरीही तिचा सासरा तिच्यासाठी अनेक गावोगावी फिरला असला तरी आतापर्यंचे आयुष्य आपल्या आईबापाच्या घरी आनंदाने घालविले, याची जाणीव या मुलीला होते म्हणून ती या क्षणी कुणाचेही उपदेश ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही.

आदिवासी स्त्री आपल्या मुलीला जास्तीत जास्त दागदागिन्यांनी मढविण्याचा प्रयत्न करते. तिच्या गळयात मणी-मंगळसूत्र  आणि नाकात एक नथ असली तरीही तिला दागिन्यांनी मढवली असे म्हटले जाते. एखादयाची परिस्थिती गरीब असेल आणि तेवढेही दागिने करण्याची त्यांची परिस्थिती नसेल तर गीताच्या माध्यमातून तिची अशी समजूत घातली जाते -

काळया तुळशीचा हिरवा पाला, हिरवा पाला गं

...... सोना लय महाग झाला, महाग झाला गं.

तुझ्या गाठल्याला कमी आला, कमी आला गं...

या गीतातून सोनं महाग झाल्यामुळे एक स्त्री आपल्या मुलीला मनसोक्त सोन्याचा हार करू शकत नाही ही खंत व्यक्त करते. अशाप्रकारे प्रत्येक दागिन्यावरून हे गीत पुढे पुढे सरकत जाते. शेवटी चांदीच्या दागिन्यांचाही उल्लेख येतो. यावरून असे दिसते की अत्यंत दारिद्रयात दिवस काढणाऱ्या या आदिवासी स्त्रीची दागिन्यांची इच्छा असूनही केवळ महागाईमुळे आणि आपली आर्थिक परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे ती आपल्या मुलीला सोन्या-चांदीचे दागिने घेऊ शकत नाही. तशाही परिस्थितीत ही स्त्री आपल्या मुला-मुलीच्या लग्नात त्यांची हौस पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. अत्यंत गरीब परिस्थिती असतानाही लग्नामध्ये ती आपल्या मुलाने लग्नघरी जाण्यासाठी आगीनगाडी,एस.टी, रिक्षा, टॅक्सी अशा वाहनांनी जावे असे तिला मनोमन वाटते. म्हणून ती म्हणते -

दर्या तारू, तारू फुलाचा

झुनकार सुटायला

आगीन गाडी आणा बाळाला

लगनी जायाला......

दर्या तारू म्हणजे समुद्रातील नैाका. ही नौका सजवून नवऱ्या मुलाच्या लग्नाला नेण्यासाठी सज्ज झाली आहे. विविध फुलांनी सजवलेल्या या नौकाचा सुगंध सर्वत्र पसरला आहे. अशी अनेकप्रकारची वाहने लग्नाला जाण्यासाठी असावीत असे त्यांना वाटते.

मुलाच्या लग्नासाठी आदिवासी भागात नवरदेवाला घेऊन काही तासांची पायपीट करावी लागते. नवरीमुलीच्या गावात नवरदेव गेल्यावर एखादया झाडाखाली नवऱ्यामुलाला बसविले जाते. त्या

जागेला 'बसकावर बसणे' असे म्हटले जाते. कितीही दूर अंतर चालत गेलेल्या या महिला बसकावर बसल्यावर त्यांच्या गाण्याला एक प्रकारे उधान येते. नवरदेव बसकावर बसल्यावर नवरीकडील महिला खास गाणं म्हणण्यासाठी तेथे येतात आणि दोन गटांत गाण्यांची एकप्रकारे स्पर्धा होते. नवऱ्याकडील महिला म्हणतात-

आगीन गाडी बिगीन गाडी

बाळा हीच काय रे सासूरवाडी, बाळा हीच काय रे सासूरवाडी.

सभा भरली मुलांची

बाळा तुझ्याच रे सोयऱ्यांची, बाळा तुझ्याच रे सोयऱ्यांची...

वरील गीतात 'आगीन' आणि बिगीन' या साधर्म्यसूचक शब्दांमुळे एकप्रकारे लय प्राप्त झाली आहे. आगगाडी ही बिगीनं म्हणजे वेगात येते ती लग्नासाठी या मुलाच्या सासरवाडीला येते असे वाटते. थोडक्यात सारीच मंडळी इकडे येण्यास उतावीळ झाली आहेत. ही मंडळी येथे आल्याबरोबर प्रातिनिधिक स्वरूपात एक महिला जणूकाही नवऱ्याला प्रश्न विचारते. इथे अनेक मुले जमली आहेत हे सर्व तुझे सोयरे आहेत असा अंदाज ही स्त्री व्यक्त करते. अशाप्रकारे त्या गावातील सर्व माणसं ही या नवऱ्यामुलाची कोणी ना कोणीतरी नातेवाईक असल्याचा या गीतात उल्लेख येतो.

आदिवासी समाज हा जंगलात,दऱ्याखोऱ्यांत राहत असल्यामुळे गाडी, आगीनगाडी, रिक्षा, विमान ही वाहतुकीची साधने त्यांना कौतुकाची वाटतात. त्यामुळे या साधनांचा वारंवार उल्लेख या लोकगीतांत आल्याचे आपल्या लक्षात येते. वास्तव जीवनात नवऱ्यामुलाला या साधनांचा आस्वाद आयुष्यात कधीच घेता आला नसला तरी गीतामध्ये ही वाहतुकीची साधने त्याच्या मालकीची होतात.

ही रिक्षा कुणाची,रिक्षाला लाल झेंडा

त्यात बसलाय कोण? ......सारखा मुलगा हाय.

जोडीला घेतलय कोण? ...... सारखी मुलगी हाय.

या गीतातून नवऱ्यामुलाचे मोठेपण व्यक्त होत असले तरी त्याच्यावरोबर त्याच्या शेजारी त्याची बायको बसलेली असल्यामुळे तिलाही सन्मान प्राप्त होतो.

निरनिराळया ठिकाणी आदिवासी महादेव कोळी समाजातील लोकगीतांचे संकलन करीत असताना त्यांच्या जीवनविशेषांबद्दल वेगळेपण जाणवून आले. पुणे जिल्ह्यातील आणि नगर जिल्ह्यातील मावळी बोली आणि डांगाणी बोली यांच्यात काही भिन्नता दिसून आली. विधी एकच पण वेळ वेगळी आणि गीत गाण्याची पद्धतही निराळी असल्याचे दिसून आले. यावरून एकच गीत समाजाच्या निरनिराळया स्तरांत कोणत्या स्वरूपात येते हे महत्त्वाचे आहे. त्यातूनच सांस्कृतिक विशेषांची माहिती होते. त्याचबरोबर दोन समूहगटांची संस्कृती समजून येते. उदा. नगर जिल्ह्यात लग्नकार्यामध्ये हळद दळण्याचा कार्यक्रम हा रात्री असतो तर पुणे जिल्ह्यामध्ये हाच कार्यक्रम सकाळी असतो. या प्रसंगी नगर जिल्ह्यात खालील गीत म्हटले जाते -

दळण दळीते गं सई बाई गं बाई
एक्या मांडी सवा खंडी बाई खंडी ग खंडी बाई खंडी
तान्हीया बाळाची गं सई बाई गं बाई
हळद आली पयल्या तोंडी बाई तोंडी गं तोंडी बाई तोंडी.

तर पुणे जिल्ह्यात याच विधीप्रसंगी खालील गीत म्हटले जाते ते देवाचे स्मरणकरून -

देव मारवती, देव मारवती
आगराची गेला, आगराची गेला
हाळदीच्या गोणी, हाळदीच्या गोणी
घेऊणी आला, घेऊणी आला
आणून लोटल्या मांडवी, आणून लोटल्या मांडवी
तू गं वरमायी सुंदरी, तू गं वरमायी सुंदरी
नेऊन साठवी मंजीरी...

महादेव कोळी समाजातील स्त्रियांनी जाते आणि उखळ ह्या साधनांना आपला सोबती मानला आहे. कारण या साधनांशी त्यांचा संबंध नित्याचा असतो. म्हणून लग्न कार्यात या स्त्रिया यांचे प्रथम पूजन करतात. हळद दळताना जात्याला एका कापडात सुपारी, हळकुंड आणि पैशाचे नाणं बांधून त्याची पूजा

केली जाते त्यावेळी जात्यात प्रथम करवलीने हळद टाकण्याचा मान असतो त्यानंतर खालील गीत म्हटले जाते -

जात्या ईसवरा तुला सुपारीचा डाव
सुपारीचा डाव गं सईबाई,तुला सुपारीचा डाव,बाई डाव.
एकीया मांडई नवरदेव दोघं भाऊ,नवरदेव दोघं भाऊ,
नवरदेव दोघं भाऊ, गं सई बाई
जात्या ईसवरा तुला सुपारी बांधली, तुला सुपारी बांधली
माझीया बाळाला आज हळदायी लागली, आज हळदायी लागली
आज हळदायी लागली गं सईबाई...

वरील गीतात या स्त्रीने जाते आणि नवरा मुलगा यांना दोघे भाऊ म्हटले आहे. त्यामुळे दगडासारख्या निर्जीव वस्तुमध्येही सजीवपण पाहण्याची वृत्ती या महिलांमध्ये दिसून येते. हळद दळून झाल्यावर न चुकता या महिला त्याचे दर्शन घेतात.

'त्यालवान' हा एक विधी पूर्वी महादेव कोळी समाजाच्या लग्नकार्यात होता. उखळात तांदूळ टाकल्यानंतर नवरदेवाला त्याच्या समोर बसवून एका जांभळीच्या पानात गोडे तेलाचे पाच-सात थेंब घेऊन त्याच्यावर आंबाडीची काडी उभी केली जाते आणि त्या काडीला सर्व महिलांनी हात लावून हे गीत म्हटले जात असे -

त्यालवान पाडू, त्यालवान पाडू
जात्या उखळावरी, जात्या उखळावरी
त्यालवान पाडू, त्यालवान पाडू
चुली भानवशी, चुली भानवशी
त्यालवान पाडू, त्यालवान पाडू
आई धरतुरी वरी, आई धरतुरी वरी
त्यालवान पाडू, त्यालवान पाडू
चांद सूर्यावरी, चांद सूर्यावरी

त्यालवान पाडू,  त्यालवान पाडू

काकणा बाशिंगावरी, काकणा बाशींगावरी...

त्यानंतर नवऱ्या मुलाला बाशिंगं बांधली जात असत. त्यानंतर देवकाचा विधी होत असे.

अशाप्रकारे विधीप्रसंगी गायली जाणारी गाणी विधीतील निरनिराळया कियांशी संलग्न असतात. लग्नात वर-वधूंना हळद लावताना, देवक आणताना, त्यालवानाला, फेर धरताना, वरात काढताना, रूखवत देताना गाणी गायली जातात. त्यामुळे ती किया अर्थपूर्ण होते आणि आनंददायी होते.

आदिवासी महादेव कोळी जमातीतील लग्नगीतात नवऱ्याबरोबर नवरीचाही उल्लेख केला जातो. नवरीकडील स्त्रिया गाणी गात असतील तर त्या नवऱ्याचाही उल्लेख करतात. दोघांचेही हळदीचे कार्य कम वेगवेगळया ठिकाणी होत असले तरी गीतात मात्र दोघांचाही नामोल्लेख केला जातो. हळद लावण्यापूर्वी या दोघांनाही आपापल्या मांडवात संपूर्ण गावाच्या साक्षीने आंघोळ घातली जाते. त्यावेळी त्या आंघोळीचा धाट काही औरच असतो. त्यावेळी हे गीत म्हटले जाते-

फिरू फिरूया भवऱ्या

एकही फेरा, ...... बाळ नवरा

मेरूचा मान,...... बाई नवरी

या गीतात नवरीमुलीला मेरूचा मान दिलेला आहे. एकप्रकारे तिला आदराचे स्थान दिले आहे. पुढील आयुष्यात ही मुलगी आपल्या नवऱ्याचा आधारस्तंभ होणार असल्याचे म्हटले जाते.

महादेव कोळी समाज हा प्रामुख्याने डोंगर दऱ्यात वसला आहे. रानावनातून कष्ट करून त्याची काया ओबडधोबड झालेली असते. अशा अवस्थेत तो नवरदेव म्हणून जेव्हा हळदीसाठी उभा राहतो तेव्हा त्याचा रूबाब, त्याच्या सौंदर्याचे वर्णन करताना आदिवासी स्त्री म्हणते -

चाफियाची कळी, सुरत सावळी की

रंगीत पिवळी, की गोविंदाची

शिंगी शिंगी वाजे, की कोकणी नाद चढे

नवऱ्यावर लेणं चढे हळदीचे...

वरील गीतातून नवऱ्याच्या बाहय रूपाचे गोडवे गायले आहेत. हा नवरामुलगा चाफ्याच्या कळीप्रमाणे तजेलदार असून तो जरी सावळा असला तरी त्याला हळद लावल्यामुळे तो जणूकाही श्रीकृष्णासारखा दिसत आहे. त्याने हळदीच्या रूपाने एकाप्रकारे लेणं म्हणजे दागिना घातला आहे. हा दागिना त्याला शोभून दिसत आहे.

महादेव कोळी समाजात इतर जमातींच्या तुलनेत आहेराला जास्त महत्त्व दिले जाते. हा आहेर पैशांच्या स्वरूपातील असतो. त्याचप्रमाणे वस्तूरूपी आहेरालाही या समाजात जास्त महत्त्व असते. लग्नापूर्वी या आहेरकरूंना एकत्र बसवून त्यांना वाजत गाजत, त्यांच्या डोक्यावर कापडाचा मंडप धरून सन्मानपूर्वक मांडवात आणले जाते. त्यावेळी जी गीतं म्हटली जातात त्यात प्रामुख्याने संबंधित नातेवाई कांचा नामोल्लेख केला जातो.

या गं मांडवाच्या दारी, आहेराची ठेला ठेली
माझ्या बंधूचा आहेर, मी तर वरच्यावर झेली सखे गं
वरच्यावरी झेली...

या गीतातील स्त्री ही आपल्या भावाने आणलेला आहेर हा नक्कीच सर्वात मोठा आहे असे म्हणते. मांडवात आहेरांची गर्दी झाली असली तरी माझ्या भावाने आणलेला आहेर हाच सर्वश्रेष्ठ आहे असे तिला वाटते. त्याने आणलेल्या आहेरातील साडीवर माझाच पहिला हक्क आहे असे ती म्हणते. लग्न म्हणजे दोन कुटुंब एकत्र जोडणे, नवीन ऋणानुबंध निर्माण करणे. महादेव कोळी समाजात तर या दोन्ही कुटुंबात कमालीचा मान राखला जातो.लग्न लागल्यानंतर नवरदेव नवरीमुलीच्या घरी मुक्कामी गेल्यावर तेथे सन्मानपूर्वक नवऱ्यामुलाच्या आईला रूखवत दिला जातोतिचे पाय धुतले जातात त्यावेळी गीत म्हटले जाते -

पाय तुम्ही घासा व चौरंगी बसा
भरून आला, भरून आला खोबऱ्याचा गाडा
की येहणी राग मनातील सोडा...

विहीण बाईने कुठल्याही गोष्टीचा राग न धरता लग्नात चूक भूल झाली असेल तर सांभाळून घेणे. त्याचबरोबर या गीतातून दोन कुटुंबांतील एकमेकांविषयाचे आदरातिथ्य दिसून आले आहे. माझी मुलगी

यापुढे मी तुमच्या स्वाधीन केली आहे तिला प्रेमाने वागवा या हेतूने ती आपल्या विहीणीला विनंती करते.

गावातील नात्यातील महिला किंवा एक विहिण दुसऱ्या विहिणीला टोमणेपर गीत गात असते. अशाप्रकारचे गीत हे केवळ मनोरंजनात्मक असते. खालील गीतातून एका विहिणीला कसा टोमणा दिला ते पाहा -

चहात पडलाय गुळं

या ...मुळं

... वरमाय डुलं

या साडीमुळं

वरमाईचे नाव घेऊन तिची थट्टा येथे केली आहे. पदाच्या शेवटी व्याह्याचे नाव घेऊन त्याच्यामुळेच तिने चहात गुळ टाकला आहे असे म्हटले गेले आहे. अशाच प्रकारचे गीत की जेथे एक विहीण आपल्या व्याह्याला उपरोधिक टोमणा मारते -

बारीक वडं व उतरंडी पापुड

बारीक वडं व उतरंडी पापुड

दुबळया येही माझा कशाला रडं ओ

दुबळया येही माझा देजाला रडं ओ

उतरंडी पापुडबारीक वडं ओ

दुबळया येही माझा कशाला रडं ओ

दुबळया येही माझा पैशाला रडं ओ

उतरंडी पापुडबारीक वडं ओ

दुबळया येही माझा कशाला रडं ओ

महादेव कोळी समाजामध्ये लग्नाला जेवणामध्ये वडे (सांडगे) आणि पापड असतातच. त्यामुळे हे वडे इतके छोटे का? तसेच हे पापट असे उतरंडीला लागल्यासारखे का? असा उपरोध साधून हे गीत म्हटले जाते. व्याही आमच्यावर नाराज झाले की काय अशी शंकाही येथे व्यक्त केली जाते. आदिवासी

जमातीत हुंडा पद्धत नसते तर दयाज दयावा लागतो. म्हणून व्याह्याला हे दयाज कमी झाले की काय असा मिश्कील टोमणा दिला आहे.

लग्न म्हणजे आनंद, विरह, उत्साह,धावपळ इत्यादी भावभावनांचा संगम. महोदव कोळी समाजातील लग्न तर तीन दिवस चालते त्यामुळे या तीन दिवसांत अनेक गीतांच्या माध्यमातून दोन्ही कुटुंबातील, नातेवाईक, समाजातील संमिश्र भावभावनांचे दर्शन घडते. पूर्वी पाच दिवस चालणाऱ्या या विधीत रात्रभर गाणी म्हटली जात असत. अनेक प्रसंगाला साजेशी गीतं म्हटली जातात. त्याचबरोबर लग्नकार्यात एक गमतीशीर भाग म्हणजे थट्टामस्करीची काही गीतं म्हटली जातात. या थट्टामस्करीतून कोणाच्या भावना दुखविण्याचा मुळीच हेतू नसतो. केवळ मनोरंजनासाठी एकमेकांवर गीत रचना केलेली असते. गीतातून उपरोध साधून मेहुणा-मेहुणी दीर-भावजय, एक विहीण दुसऱ्या विहीणीला, नणंद-भावजय अशा नात्यातून ही थट्टा चालते. एरवी एकमेकांना समोरासमोर बोलता येत नसल्यामुळे लग्नाची संधी साधून त्यात एकमेकांची चांगलीच थट्टा केली जाते. या गीतांमध्ये मनोरंजनाचा भाग तर येतोच त्याचबरोबर विनोद निर्मितीही साधली जाते.

सफरचंदावरील मला मयुरी पाहूदे

...... मेहुणा म्हणतो मला नाचायला जाऊदे

...... मेहुणा म्हणतो मला सोंगाडया होऊदे...

अशाप्रकारे मेहुणी-मेहुण्यामध्ये जुगलबंदी चालते. या गीताचे वैशिष्टय म्हणजे यात नवरा-नवरीचे नाव येत नाही पण त्यांच्या बहिणी, भाऊ यांचा उल्लेख येतो. या गीतात पुढे प्रत्येक मेहुणा-मेहुणीचे नाव घेऊन सोंगाडया होऊदे,ड्रेसची चेन लावायाची राहूदे, साडीला पीन लावायची राहूदे, शर्टची बटणं लावायची राहूदे, पॅटची चेन लावायची राहूदे अशी थट्टा चालते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ही गीतं म्हटली जातात. त्यामुळे कोणाला राग येत नाही उलट ज्यांच्यावर हे गीत म्हटले जाते ते प्रत्युत्तर म्हणून त्याच प्रकारे गीत म्हटले जाते.

...... मेहुणी मांडवात दिसलीच नाय,

मला वाटलं घोडेगावला गेली की काय?

तिच्या डोक्यावर पाटी, फिरे गलोगल्ली,

मला वाटलं माशावाली आली की काय?...

आयुष्यभर कष्ट उपसणाऱ्या या स्त्रियांना अशा कार्यक्रमातूनच आपल्या हक्काच्या नातेवाईकांची थट्टा मस्करी करण्याची संधी मिळते. ही गीतं ऐकण्यासाठी गावातील स्त्रिया, पुरूष, मुलं यांची प्रचंड गर्दी झालेली असते. कित्येक दिवसांतून एकत्र जमत असलेले नातेवाईक या गाण्यांत रममाण होत असतात. सवाल जवाबाच्या धर्तीवर या गीतांची निर्मिती केलेली असल्यामुळे जसजशी ही गीतं गायली जातात तसा ऐकणाऱ्याचा व गाणाऱ्याचाही उत्साह व्दिगुणीत होतो. असेच एक गीत दोन मेहुण्या एकमेकींना उद्देशून म्हणतात -

काजू कण्याच्या बिया मी वेचीत होते गं,
...... मेहुणी तुला मी शोधत होते गं.
बसली होती चुलीच्या कोपऱ्याला गं,
चाटीत होती मटणाचे पातेलं गं...

वरील गीतात क्रमश: मटणाचे, माशाचे, खेकडाचे पातेले चाटण्याचा उल्लेख येत असल्यामुळे या गीतात विनोद अधिक बहरत जातो. मटण, मासे, खेकडे हे आदिवासींचे आवडते खाद्य असल्यामुळे यात आदिवासींची पारंपरिकता दिसून येते. हे पदार्थ जास्त प्रिय असल्यामुळे या गीतातील स्त्री ही लग्नात जास्त न मिरवता मटण, मासे खाण्यात दंग झाली आहे असा उपरोध साधला आहे. अशाच प्रकारे एक मेहुणी आपल्या मेहुण्याला उद्देशून म्हणते -

पन्नास पैशाला माचीस पेटी, माचीस पेटी गं,
...... मेहुण्याची शायनिंग मोठी, शायनिंग मोठी गं...

या गीतातील स्त्रीचे जेवढे मेहुणे आणि मेहुण्या असतील त्यांची नावे घेऊन हे गीत म्हटले जाते.

'वरमाई' शब्दाचा अर्थ नवऱ्याची आई पण महादेव कोळी समाजात नवरीच्या आईलाही वरमाई म्हणतात. लग्नाच्या दिवशी या दोघींची विशेष धावपळ असते. त्यामुळे त्यांच्या नणंदा उपरोधाने त्यांना म्हणतात -

चुलीवर तवा वाजतो सना सना
...... वरमाय उडते टना टना...

असे चुलत, मावस वरमायांचा नामोल्लेख करून हे गीत गायले जाते. येथे केवळ उपरोध किंवा थट्टा करणे हा उद्देश न राहता त्यांच्या नात्यासंबधीची ओळखही समाजाला होत असते. पण कधी कधी हे नातेसंबंध इतके उग्र रूप धारण करते की समोरच्या विहीणबाईची पुरेपुर विडंबना केली जाते. उदा.

लग्न ठरलं घाई घाई, लग्न ठरलं घाई घाई

...... वरमाईला माहीत नाही

साडी लावली घाई घाई, साडी लावली घाई घाई

झंपर घालायचे ध्यानात नाही...

वरील गीत हे एखादया स्त्रीच्या भावना दुखावल्याप्रमाणे आहे. पण महादेव कोळी समाजात अशाप्रकारच्या गीताला गांभीर्याने घेतले जात नाही. कारण आपल्या नणंदबाईला असे बोलण्याचा अधिकार आहे असे तिला वाटते किंबहुना तो एक रिवाज पडलेला आहे. सदरच्या गीतात एक वरमाय झाल्यानंतर दुसरीचे नाव घेतले जाते आणि तिच्यासाठी वेगळी कोटी केली जाते. 'परकर घातला घाई घाई, नाडी बांधायचे ध्यानात नाही.' किंवा 'झंपर घातला घाई घाई, बटणं लावायचे ध्यानात नाही.' असा उल्लेख केला जातो.

अशाप्रकारची मनोरंजनात्मक गीतं ही शक्यतो लग्नाच्या अगोदरच्या दिवशी म्हटली जातात. दिवसभरातील सर्व कार्य उरकून रात्रीच्यावेळी ही गीतं म्हटली जातात. अत्यंत निकोप आणि खेळीमेळीच्या वातावरणात ही गीतं गायली जातात हे या जमातीचे वैशिष्ट्य आहे. आदिवासी समाजामध्ये ज्या रूढी प्रचलित असतात त्यांची उत्पत्ती कशी झाली यासंबंधी निश्चित सिद्धांत मांडता येत नाही. कोणतीही रूढी ही वैयक्तिक बाब नसते तर एक सामाजिक घटना असते. माणसाच्या वागण्यातील काही सवयी या समाजाने मान्य केलेल्या असतात. त्या समाजोपयोगी असल्यामुळे त्यांचा स्विकार केलेला असतो. अशा सवयींतूनच या रूढी निर्माण होतात. पूर्वी आदिवासी भागात पाच दिवसांच्या लग्नाची रूढ होती ती आता बदलून तीन किंवा एक दिवसावर आली आहे. हा बदल सर्व समाजाने स्विकारला आहे. तरीही लग्नगीतं म्हणण्याचा रिवाज कमी झाला नाही. वरमाईवर रचलेले हे विडंबनपर गीत येथील आदिवासी संस्कृतीबद्दल खूप काही सांगून जाते.

गावा खालती गव्हाळी, गावा खालती गव्हाळी

नांगराने नांगरली सखे गं, नांगराने नांगरली .
त्याच्यात पेरले बक्षी गहू, त्याच्यात पेरले बक्षी गहू,
त्याच्या पोळया केल्या नऊ, सखे गं, पोळया केल्या नऊ .
घाला वरमाईला जेऊ सखे गं, घाला वरमाईला जेऊ
वरमाईचा तान्हा बाळ, वरमाईचा तान्हा बाळ,
वरमाय पलंगावर लोळं सखे गं, वरमाय पलंगावर लोळं...

येथे वरमाई असूनही तिला तान्ह बाळ असणं हे हास्यास्पद आहे . या गीतात गव्हाळी नांगरण्यापासून ते गहू पिकविणे आणि त्याच्या पोळया करून वरमाईला खाऊ घालणे हा संपूर्ण आशय केवळ पाच ओळीमध्ये सामावला आहे त्यामुळे गाण्यात कुठलाही संदिग्धता आढळत नाही .

लाडू जिलेबीची गोडी
...... वरमाय तोंड मोडी .
तू चल गं पुढे पुणे गाडीला
...... येही आहे जोडीला...

हे गीत वरबाप आणि वरमाई या दोघांसाठी रचले आहे . या गीताची रचना साधी असली तरी त्यातून नकळत वरमाईची थट्टा केली आहे . किंवा

काळया तुळशीचा हिरवा पाला, हिरवा पाला गं,
...... वरमायला कणगीत घाला, झाकण लावा गं .
आता लग्नाची वेळ आली, बाहेर काढा गं...

एका गीतात वरमाईची खूप धावपळ होत असल्यामुळे ती टणाटणा उडते असे म्हटले आहे तर दुसऱ्या गीतात याच वरमाईला कणगीत घालून ठेवा म्हणजे ती जास्त तोऱ्यात मिरवणार नाही अशी कोटी ही नणंद करत आहे . या गीताची सुरूवातीची ओळ अजूनही एका गीतासाठी वापरली आहे . थोडक्यात यमक जुळावे या उद्देशाने ती ओळ दोन गीतात घेतली असली तरी ती दोन्ही गीताला अनुरूप अशी आहे .

लग्नाच्या दिवशी सर्वजण नटूनथटून वऱ्हाडी निघतात. याला वरमाई आणि वरबापही अपवाद नसतात म्हणून त्यांच्या या नटण्याथटण्यावर त्यांच्या मेहुण्या गाणं गातात -

मांडवाच्या दारी, मांडवाच्या दारी

थाळा धरा नीट, थाळा धरा नीट

होईल वरबापाला दीट, होईल वरबापाला दीट...

वरबापाला किंवा वरमाईला दृष्ट लागणे तसे हास्यास्पद आहे. परंतु लग्न कार्य हे निर्विघ्न पार पाडण्यासाठी सर्व कामं व्यवस्थित झाली पाहिजेत या अर्थाने ही स्त्री थाळा नीट धरण्यास सांगते. नाहीतर या दोघांना दृष्ट लागली तर संपूर्ण कार्यात व्यत्यय येईल असाही येथे अर्थ अभिप्रेत होतो.

कधी कधी लोकगीतातून जो अर्थबोध होतो तो त्या प्रसंगाशी तंतोतंत जुळणारा असतोच असे नाही. केवळ गाण्याच्या माध्यमातून तो प्रसंग उभा करणे हाच त्याच्या मागचा उद्देश असतो. उदा.

पुनवेला पडे चांदणे ग ...... तुला आले मागणे

बापाचे तुला सांगणे ग सासऱ्यासंगे नीट वागणे

पुनवेला पडे चांदणे ग ...... तुला आले मागणे

आईचे तुला सांगणे ग सासूसंगे नीट वागणे.

पुनवेला पडे चांदणे ग ...... तुला आले मागणे

भावाचे तुला सांगणे ग दिरासंगे नीट वागणे...

या गीतातून मुलीला मागणे आल्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा की मुलीला पाहण्यासाठी मुलाचे घरचे आल्यावर हे गीत म्हटले पाहिजे. परंतु वास्तवात तसे होत नाही. तर नवरदेव बसकावर बसल्यावर हे गीत म्हटले जाते किंवा मांडवाच्या रात्री फावल्यावेळेत हे गीत म्हटले जाते. केवळ मागणं आले म्हणजे तू आता नीट वागली पाहिजे असा मौलिक सल्ला या गीतातून नवरीच्या घरची माणसे देतात.

अशाचप्रकारे साखरपुडयाचा उल्लेख असलेल्या खालील गीतातून प्रत्यक्ष साखरपुडयाच्या विधीच्यावेळी हे गीत म्हटले जात नाही. परंतु नवरीच्या मैत्रिणी तिला गीताच्या माध्यमातून विचारणा करतात की,

हाती भरला ग हिरवा चुडा

कधी झाला गं साखरपुडा

...... चालली सासरला

बाप रडतो ग धायी-धायी

नको रडू रे माझ्या बाबा

आज जाईन उद्या येईन

तुमच्या घराला शोभा देईन.

वरील गीताचा संबंध हा साखरपुडयाचा फक्त हिरव्या चुडयाशी आला आहे. हातात मुलीने हिरवा चुडा भरणे म्हणजे तिचे लग्न ठरले असा त्याचा अर्थ होतो. पण खऱ्या अर्थाने तेव्हा पासूनच नवरी मुलीच्या लग्नाची तयारी सुरू होत असते. त्यामुळे घरात एकीकडे आनंदाचे तर दुसरीकडे विरहाचे वातावरण निर्माण होत असते.

# शारीरिक श्रमाशी निगडित असलेली लोकगीते

आदिवासी महादेव कोळी ही जमात प्रामुख्याने सह्याद्री पर्वत रांगेत वास्तव्य करून आहे. हा भूभाग विस्तारीत स्वरूपाचा असला तरी या जमातीतील चालीरिती, जीवनव्यवहारात समानता आढळते. काही लोकगीतांमध्ये मात्र काही प्रमाणात बदल जाणवतो. पण त्यांची रचना आणि त्यांतून होणारा अर्थ बोध सारख्याप्रमाणत असतो. डोंगर, दऱ्यांत, निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा हा समाज कोणत्याही कार्याची सुरूवात करताना प्रथम तो निसर्गाची पूजा करतो. आपल्या दैवतांना वंदन करतो. घरात, रानात शेतात या स्त्रिया जेव्हा कष्ट करतात तेव्हा त्या आपल्या संस्कृतीचे, जंगलवैभवाचे गोडवे गातात. शेतात काम करताना ताला-सुरात गीत गातात. त्याचबरोबर दळण, कांडण करताना देखील त्या गीत गातात.

जात्यावर दळण दळताना स्त्रियांचा एकप्रकारे भावनाविष्कार होत असतो. पहाटेच्यावेळी जातं ओढताना त्या आपल्या भावभावना त्या जात्याच्या साक्षीने व त्याच्या आवाजाच्या साथीने व्यक्त करत असतात. जातंच त्यांचा रोजचा साथीदार होत असतो. त्याच्याशी त्या एकप्रकारे हितगूज करत असतात. दळण दळताना किंवा कांडण करताना साधारणपणे पौराणिक देवदेवतांचा नामोल्लेख आलेला असतो किंवा सासूरवाशीन स्त्री आपल्या माहेरच्या आठवणी शब्दातून व्यक्त करत असतात. कधीकधी गीतातून मिश्कील विनोदही साधला जातो. जात्यावरील गीत हे साधारण कथागीताचा प्रकार असतो. काही गीतं पुढीलप्रमाणे -

बांधवानी धरमाच्या बांधवानी, देऊळ बांधिला शंकराचा
देवळाभोवती जाईजुई, मधी पाण्याचा कुंडलिक
साधू येती आंघोळीला, बेल वाहती शंकराला
दूर्वा वाहती पार्वतीला, विठ्ठलाची झाली चोरी
आळ आला विजनावरी, जाना सूर्याला हात जोडी
आळ आला हो माझ्यावरी......
रामाच्या शेतात कोण बेनी गं दोघी बाया
सजना बंधू माझा, निंदे रे भाऊराया

भाऊ गं राया बोले दे गं बाईला बसायला
भाऊजय गं लय खोटी पाया येनी गं पिढी लोटी
भाऊ गं राया बोले घाल बाई गं इला भात
भाऊजय गं लई बोले साळी पडली गं पेवात
भाऊ गं राया बोले ठिव बाई गं ईला पानी
भाऊजय गं लई बोले हंडा वाण्याच्या गं दुकानी
भाऊ गं राया बोले घाल बाई गं ईची वेणी
भाऊजय गं लई बोले उंदराने नेली फणी.

आदिवासींची संस्कृती ही श्रमसंस्कृती आहे. त्यामुळे महादेव कोळी जमातीत श्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या जमातीत लग्नामध्ये वराला वधुपित्यास वधुमूल्य द्यावे लागते त्यास 'दयाज' असे म्हणतात. हे वधुमूल्य वेगवेगळया स्वरूपात असते. श्रमधिष्ठित अशा संस्कृतीत मुलीचे लग्न केल्याने घरातील एक श्रमिक कमी होतो. त्याची फेड म्हणून वधुमूल्य देण्यात येते. वधुमूल्य देण्यास ऐपत नसेल तर ते फिटेपर्यंत मुलास सासऱ्याकडे काम करावे लागते. अशा या संस्कृतीमुळे मुलींना सासरी मानाने वागवले जाते.

आदिवासी समाज हा जसा समूहाने राहतो तसाच तो समूहाने काम करत असतो. सर्वांचा हातभार लागल्यामुळे कष्टाचे काम हलके होते, हसत खेळत काम केल्याने त्यातून आनंद मिळतो म्हणून प्रत्येक घरातील एक माणूस असे २५ ते ३० माणसांचा समूह एकाचवेळी शेतात राबत असतो. लावणी असो अथवा बेणणी (निदणी) असो किंवा पिक काढणी असो सर्व माणसे एकत्र काम करतात. त्यात स्त्रिया आणि पुरूष बरोबरीनेच काम करतात. या समाजात पिकाची निदणी करण्यासाठी अर्थात अनावश्यक तण काढण्यासाठी ज्यावेळी एकत्र येतात त्याला 'भलर' असे म्हणतात. लोकसाहित्यात मूळ शब्द 'भलेरी' असा असला तरी आदिवासी मावळी बोलीत त्याला 'भलर' असेच म्हणतात. प्रत्येक भलरीत एक ढोलकरी (ढोल वाजविणारा) आणि एक टाळकरी (टाळ वाजविणारा) असतोच. त्यांनी फक्त दिवसभर ढोल आणि टाळ वाजविण्याचेच काम करायचे असते. त्यामुळे ढोल आणि टाळ यांच्या तालात आदिवासी महिला अत्यंत आनंदाने शेतात काम करतात.

सकाळच्या प्रहरी ढोलावर टिपरू पडले आणि टाळाने ठेका धरला की या कष्टकरी स्त्रियांच्या अंगात जणूकाही वीज संचारते. त्यांचा उत्साह व्दिगुणीत होतो. भलरीची प्रत्येक दिवसाची सुरूवात नमनाने होते. हे नमन आदिवासींच्या दैवतांसाठी आणि धरणीमातेला असते -

पहिले नमन नमो कुणाला

धरतुरी मातेलान् काय हो...

यावरून असे स्पष्ट होते की आदिवासींचे पहिले प्रेम हे धरणीमातेवर आहे. त्यानंतर ते सालोबा, वनदेव, वरसूबाई, कणसारी या देवांना गाण्याच्या माध्यमातून वंदन करतात. खेडयातील माणसांचे शेतीशी अत्यंत जिव्हाळयाचे नाते असते. तो शेतीला आई मानतो, तिला तो भूमाता मानतो. संस्कृतीविकासाच्या एका टप्प्यावर त्याला भूमिचे मोठेपण ध्यानात आले आणि जमिनीला त्याने देवता मानले. पृथ्वीमातेची प्रतिकात्मक पूजा अस्तित्वात आली. स्त्रीच्या ठिकाणी असणारी सर्जनशीलता त्याला माहीत होती पृथ्वी देखील स्त्री प्रमाणे सर्जनशील आहे हे त्याला समजले म्हणून कामधंदा करताना तो मनोभावे या धरतीला वंदन करत असतो.

भलरीत स्त्री आणि पुरूष एकत्र असल्यामुळे त्यांच्यात कोणताच भेदभाव राहत नाही. दोघेही एकमेकांना प्रोत्साहन देण्यासाठी गाणं म्हणतात -

बाय भल्या दादा, दादा भलरे

रामा भलऱ्या तू रे बाय भल्या दादा

त्यावर पुरूष मंडळी स्त्रियांना उद्देशून म्हणतात -

भलरे बाय माझे गं, भलरे बाय माझे

तुझ्या वेणीला फुलगोंडा, भलरे बाय माझे...

असे गाण्याच्या माध्यमातून एकमेकांचे कौतुक केले जाते. त्यामुळे काम करण्यासाठी त्यांना उत्साह मिळतो. त्याचप्रमाणे या गीतातून 'दादा' आणि 'बाय' ही बहीण भावाच्या नात्याची गुंफण केल्यामुळे त्यात अधिक आपुलकी निर्माण होते.

भलर गीतातील स्त्री ही आपल्या बाळाला फसवून कामाला येत असते. त्यासाठी ती गीताच्या माध्यमातून अनेक प्रलोभने देत असते तर कधी त्याचे कौतुक करत असते.

हातात देते मूठभर लाया

बाळ सभेत पडे पाया पाखरू माझा .

हातात देते मूठभर शेंगा

बाळ सभेत घाली पिंगा पाखरू माझा .

हातात देते मूठभर ओंब्या

बाळ सभेत खेळे झोंब्या पाखरू माझा .

भलर गीतात श्रीकृष्णाच्या चरित्रपर गौळणींचा प्रभाव जास्तप्रमाणात पडलेला दिसून येतो . महादेव कोळी समाजातील स्त्री ही स्वत:च्या बाळाला श्रीकृष्णाच्या रूपात पाहते त्यामुळे ती त्याचे हट्ट पुरविते, त्याला त्याच्या आवडीचे खाऊ-पिऊ घालते . दैनंदिन कामाच्या धावपळीतही ही स्त्री आपल्या बाळाचे लाड करताना म्हणते -

सोन्याचा पाट मी बसाया देते

रडू नको कृष्णा मी पाण्याला जाते

चांदीचे ताट मी जेवायला देते

रडू नको कृष्णा मी पाण्याला जाते...

वास्तविक पाहता सोन्याचा पाट आणि चांदीचे ताट ही भूषणावह वस्तू देऊन या गीताच्या माध्यमातून आपल्या बाळाचे लाड पुरविण्याचा प्रयत्न करते . त्यामुळे एक प्रकारचे समाधान तिला वाटते . प्रत्यक्षात या स्त्रीने कधी सोने-चांदी पाहिलीही नसते तरी गीताच्या माध्यमातून ती आपल्या मुलाबरोबर स्वत:चेही समाधान करून घेते . शरीरक्रियेची अनेकविध रूपे लोकगीतांशी संबंधित आहेत . दळण, कांडण, कापणी करणे, पेरणी करणे, गुरे चारणे, झोका देणे या क्रिया श्रमाशी निगडित आहेत . या श्रमाशी निगडित असलेल्या लोकगीतांना श्रमगीते असे म्हणतात . या क्रियांचा आणि गीतातील आशयाचा संबंध असतोच असे नाही . तर या क्रियांना आपली सखी समजून तिच्या जवळ जीवनातील येणारे सुखदु:खाचे अनुभव स्त्रिया व्यक्त करतात .

श्रीकृष्णाची खोडकर वृत्ती, त्याच्या बालपणातील रासक्रीडा यांचे वर्णनही श्रमगीतांतून येते . त्यामुळे कामात विरंगुळा मिळतो . दिवसभर आपल्या बाळाला घरात एकटे सोडून ही स्त्री कामाला येत

असते त्यामुळे तिचे चित्त कामावर लागत नाही. त्याच्या बालपणीची आठवण ती आपल्या सख्यांना सांगते -

बाळ सगुण गुणाचा तान्हा गं
बाळ सगुण गुणाचा तान्हा
बाळ दिसतोय गोजीरवाणा गं गोकुळच्या नारी.
कोणी लपवून याचा चेंडू गं
कोणी लपवून याच्या गोटया गं
कोणी लपवून याचा भोवरा गं
आळ घेता सारंगधारा गं गोकुळच्या नारी.

भलर गीत हे श्रमगीत असले तरी अनेकवेळा त्यातून भक्तीमार्ग दिसून येतो कारण भक्तीभावाने केलेले कष्ट हेच आपल्या आयुष्याचे मोल असते असे आदिवासी स्त्रीला वाटते. प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करून त्यात देवदेवतांची नावे घेऊन त्या श्रमाला अधिक आध्यात्मिक स्वरूप दिले जाते त्यामुळे शेतामधील पिकही अधिक सकस येते अशी आदिवासींची श्रद्धा आहे. शेतातील कोणतेही काम करताना ती आपल्या कुलदैवताच्या नावाने काही ना काही गुणगुणत असते. शेतीच्या कामासाठी नटून थटून निघालेली आदिवासी स्त्री ही स्वत:ला गौळण समजते. त्यामुळे एक गौळण दुसऱ्या गौळणीला संवादाच्या रूपात आपल्या राहत्या ठिकाणाची ओळख अशा प्रकारे करून देते -

कोण हौसेची, हौसेची चालली नार ओ जी
तिची वाऱ्यानं हले कंबर, कंबर ओ जी.

भिवंडी बाजार घर माझं नाक्यावर
सांगते खुण बेलाचे झाड दोन
मागच्या दारी तुळशीचे वृंदावन...

वरील गीतातील स्त्री ही अत्यंत चपळ आहे. तिच्या कामाचा आवाका प्रचंड आहे. ती वाऱ्याच्या वेगाने काम करताना दिसते. महादेव कोळी जमातीतील स्त्री ही मूळातच काटक आणि चपळ असते. कारण ती घरातील काम उरकून दिवसभर शेतातही राबते. डोंगर दऱ्या चढून ती कोसोदूर कष्ट करण्यासाठी

रानावनात भटकते. म्हणून ही आदिवासी नार उपरोधाने म्हणते, 'भिवंडी बाजार घर माझं नाक्यावर.' याचा अर्थ सर्वांच्या नजरेत भरेल अशा ठिकाणी तिचे घर आहे. ही स्त्री काहीशी आध्यात्मिक वळणाची आहे कारण तिच्या दारी तुळशीचे वृंदावन आहे. त्याचबरोबर बेलाचे झाड आहे. ती निसर्गपूजक असली तरी महादेवाला पवित्र असलेल्या या वृक्षाचा ती आवर्जून उल्लेख करते. म्हणून आदिवासींच्या श्रमातही भक्तीभाव प्रकट होताना दिसतो.

घनदाट जंगलात कायम वास्तव्य करणाऱ्या या समाजाची खरी संपत्ती जंगल व त्यातील घटक. जितके घनदाट जंगल तितके त्याचे वैभव अधिक असे मानले जाते. महानगरात मात्र बागेच्या स्वरूपात वृक्षांची लागवड करावी लागते म्हणून या पुढारलेल्या व कृत्रिम जंगलाची निर्मिती करणाऱ्या व्यक्तीला येथील आदिवासी स्त्री उपरोधाने म्हणते -

माळीयाने बाय केली हवा
निघून गेला गावा.
माळी गेला बाय गोव्याला
नारळ आणायला.

नारळ लावले बाय हरोहरी
बाग नानापरी...

ज्या प्रदेशात ते फळ प्रसिद्ध आहे त्याचे नाव घेऊन हे गीत गायले जाते. दिवसभर काम करताना संपूर्ण शरीराची सतत हालचाल होत असते. त्याचवेळी प्रत्येक स्त्री आपल्या सुरेल आवाजाने गीत गात असते. त्यामुळे या हालचाली सुलभ होण्यास मदत होते. हाताने काम, तोंडाने गाणे आणि डोक्यात दैवताचे नाव अशी अवस्था शारीरिक कष्टाची कामे करताना महादेव कोळी स्त्रीची असते म्हणून ती दळण- कांडण, शेतात राबताना आनंदाने गीत गाते. आपल्या पंचक्रोशीतील दैवतांच्या नावाने गीत गाताना त्यांची थोरवी गायली जाते.

काळीया वावरी रामा फुलला पळस
बहिरोबा देवाचा रामा सोन्याचा कळस...

अशा सर्व देवतांची नावे घेऊन हे गीत गायले जाते.दिवसभरात अधूनमधून अशाप्रकारे दैवतांच्या नावाची  गाणी म्हटली जातात. याचे कारण म्हणजे, काम करताना विंचू, सर्प कुणाच्या नजरेस पडू नये, कुणाला बाधा होऊ नये, त्याचप्रमाणे काम करताना कुणालाही इजा होऊ नये म्हणून सर्वस्वी देवावर भरवसा ठेऊन त्याचा नाम महिमा गायला जातो. त्यामुळे सर्व कष्टकऱ्यांना आत्मिक समाधान मिळते. प्रसिद्ध लेखक चि.वि.जोशी लोकगीते ही लोकजीवनाचा आरसा आहे हे सांगताना म्हणतात, 'दळताना, कांडताना व कापणी, पेरणी करताना खेडयातील वातावरण या गीतांनी दरवळलेले दिसते.'

पौराणिक काळातील आख्यायिकांचा आदिवासी जीवनावर मोठयाप्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यात ज्या घटना प्रसंग घडले त्यांचा सहसंबंध ते वास्तव रूपाने आपल्या जीवनातही पाहतात. त्यामुळे सीतेसारखी प्रांजळ आणि शीलवान स्त्री हे आदिवासींच्या गीतांतील आदर्श आहे. वास्तविक पाहता हा समाज अशिक्षित, अज्ञानी असल्यामुळे त्याला वास्तव आणि काल्पनिक यातील फरक कळत नाही. रामायणासारख्या प्रख्यात काव्यातील सीतेचे रावणाने हरण केले त्याचा उत्कट प्रसंग कथात्मक पद्धतीने आदिवासी स्त्री खालीलप्रमाणे वर्णन करते -

पाणी पाऊस पडतो
दारी मिरूग चरतो

धरली मिरगाने साया
आला बाय जातीचा गोसाया
भिक्षा मागत मागत
गेला सीताच्या आळीला
सीताबाई सत्वाची नारी
भिक्षा येऊदे लवकरी
भिक्षा वाढू कोणाची
आडवी प्रित रामाची
भिक्षा वाढाया गेली
सीतामाय झोळीत नेली

ठेवली आशोकाच्या वनी

सीता शोधायला जाताय कोण कोण

राम लक्ष्मण अंजनीचा हनुमान

वरील गीतातील पाऊस हा रावणासारखा क्रूर आहे. तो कुणाचीही परवा करत नाही. या अर्थाने मृगाच्या पावसाचे वर्णन येते. हा पाऊस भिक्षा मागत येतो म्हणजेच सर्व डोंगर, दऱ्यांना व्यापून टाकतो. सर्वत्र थैमान घालतो अशा अर्थाने या गीताची रचना झालेली असावी. परंतु या गीतात रामायणातील धावते वर्णन आलेले आहे. त्यामुळे रचनेच्यादृष्टीने ते जरी भिन्न वाटत असले तरी ओघवत्या शैलीमुळे या गीतातून एकप्रकारे संक्षेपाने कथाभाग सांगितला आहे. मराठी स्त्री-गीतात पुराणातील अनेक व्यक्तिचित्रे जी स्त्री-मनाला भावली. त्यांचे अंत्यंत उत्कट चित्रण स्त्रियांनी केलेले आहे. या पात्रांना स्त्री-मनात आणि स्त्री-जीवनात अत्यंत श्रद्धेचे स्थान आहे. पुराणातील या स्त्रियांनी जीवन जगताना अनुभवलेली सुख-दु:खे, जोपासलेली जीवनमूल्ये मराठी स्त्रीमनाला भावली आणि त्यांच्याच गीतांतून अभिव्यक्त झाली. मराठी स्त्री-गीताला लाभलेले पौराणिक संदर्भ त्यामागील मनाचे भव्य आणि उदात्त दर्शन घडविते. वरील गीतातील 'दारी मिरूग चरतो' असे म्हटले आहे याचा अर्थ येथे मिरगाचा पाऊस पडतो असे न म्हणता 'मिरूग चरतो' अशी प्रतिमा वापरल्यामुळे गीताला गोडवा निर्माण झाला आहे. त्याचबरोबर 'सावली' ऐवजी 'साया', आणि 'गोसावी' ऐवजी 'गोसाया' अशा चपखल शब्दांचा वापर केल्यामुळे गीताला नैसर्गिकपणा आलेला आहे. अशाच प्रकारचे रामायणावर आधारित खालील गीत पाहा -

जुन्नर मधला खांब आदळला

त्याही खांबळयाला, खांबळयाला बाय

टांगला पाळणा.

त्याही पाळण्यात, पाळण्यात बाय

सीताची फडकी.

त्याही फडक्यात, फडक्यात बाय

निजे लहू बाळ.

हे गीत ज्या ठिकाणी भलर चालू आहे त्या गावाचे, तालुक्याचे नाव घेऊन गायले जाते. त्यामुळे कष्टकऱ्यांमध्ये आपुकीची भावना निर्माण होते. थोडक्यात रामायणातील घटना प्रसंग हे आपल्या गावातच घडत आहेत अशी त्यांची भावना होते. फडक्यात लहू बाळाच्या रूपात आदिवासी स्त्री स्वत:च्या बाळाचे रूप पाहते. देवदेवतांना फडक्यात लोळण्याची कल्पनाच येथे खटकते पण आपल्या विचाराच्या कक्षेप्रमाणे ही स्त्री गीताच्या माध्यमातून वर्णन करते. महादेव कोळी जमातीतील लोकगीते ही वरवरची साधी, केवळ यमकांनी नटलेली दिसत असली तरी त्यातून मानवी जीवनाचा शोध टिपला आहे. त्यातून बोधात्मक रचना असल्याचेही पहावयास मिळते. मानवाच्या विचारांना प्रवृत्त करणाऱ्या रचनाही खालील ओळींतून पहावयास मिळतात. उदा.

खडकी पेरला डवना

माया रूजेल का? नाय ओ.
आमचे गेले वसई बंदरा
येतील का? नाय ओ.
नथीचा जोड मला आणतील का? नाय ओ.
नथ संभाळ पोरी, नथ संबाळ
नथीच्या झोकानी जाशी गं...

एखादया खडकावर, दगडावर धान्य पेरले आणि त्याला कितीही खतपाणी घातले तरी ते रूजेल का? असा सवाल ही स्त्री करते. या गीतातून ही स्त्री समाजातील प्रश्न तीच निर्माण करते आणि उत्तरही तीच देते. स्वत:च्या पतीबद्दल तिला शाश्वती नाही. तरीही येताना तिला नथीचा जोड आणावा अशी तिची इच्छा आहे. तिची ही इच्छा पूर्ण झाली तर बाकीच्या स्त्रिया तिला हिणवतील की, 'तू नथीच्या झोकात जाशील.' म्हणजे नथीशिवाय तुला दुसरं काहीच सूचणार नाही. पण तुझ्या या दारूडया नवऱ्यावरचा भरोसा नाही असे मिश्कील वर्णन येथे आले आहे.

काम वेळेवर होण्यासाठी शेतात काम करणाऱ्या स्त्रिया एकमेकींना प्रोत्साहन देत असतात. त्यामुळे काम करण्यास हात भरभर चालतात. उदा.

नदीच्या कडला पेरीला राळ

निदून टिपून काढलाय सयांनी

त्याला लोंबट आली सयांनो, त्याला लोंबट आली

कोणीया देसाचा कावळा आला बाय

शेलका लोंबीट खुडून नेला

सईच्या अंगणी टाकून दिला .

सईने उचलला बाय घरात नेला

चोळून मोळून राळ केलं बाय

चोळून मोळून राळ केलं ...

भलरीमध्ये कधीकधी गौळणी म्हटल्या जातात. परंतु गौळण गाताना ढोलाचा ठेका आणि गीताचा ताल जुळला पाहिजे. उदा.

चौघेजण भाऊ, एकली तानू

कशी घालू वेणी या गौळणीची

सोन्याचा पाळणा, रेशमी दोर

दूर गेला झोका या बहिरोबाचा...

या गौळणीत चार भावांच्या पाठीवर या लाडक्या बहिणीचा जन्म झाला आहे. त्यामुळे आपल्या ग्रामदैवतांना स्मरून ही स्त्री अत्यंत भावूक होऊन लडिवाळपणे हे गीत गाते. सदरच्या गीतात गावशिवारात जेवढी ग्रामदैवते असतील त्यांचा नामोल्लेख केला जातो. अशाचप्रकारची दुसरी एक पौराणिक कथा सांगणारी गौळण पाहा -

गावा खालती एक होती माडी, तिला खिडक्या व बारी

तिला रंग ओ दिला दिलाय गुलचारी.

कुण्या सावकाराची कामिनी का, विक्री करतेय बैसोनी

धुणं धुवाया निघून गेली सुंदरी.

राजाचा लेक प्रधान आला काय शिकार कारणी

आला आला गरूड पाखरू का हार काय नेला झडपूनी

या कळंबाखाली रडते सुंदरी.

का हो रडते बाई आवाज मंजूळ

आहो आहो राजेश्री की एवढा हार दया गवसून

माझ्या पतीच्या आधी तुम्हाला ओवाळीन.

दिला हातावरी हात की वचन काय झालाय जंगलात

नार निघून गेली आपल्या महालात.

वरील गीत हे कथागीत आहे. त्यामुळे ते ऐकण्यास उत्कंठावर्धक आहे. एक प्रसंग हुबेहुब यातून उभे राहतो. एका सावकाराच्या नारीची झालेली फजिती आणि हार मिळविण्यासाठी तिने राजपुत्राकडे केलेली याचना हे मनोरंजक वर्णन आले आहे. अलंकार हा स्त्रियांचा आवडता आणि जिव्हाळयाचा विषय असतो. धुणं धुताना या कामिनीचा हार चुकून पाण्यात पडू नये म्हणून तो एका जंबू बेटावर ठेवला जातो परंतु दुर्दैव असे की तो एका गरूडाने झडप मारून नेला. त्यानंतर तिच्या मनाची झालेली जी घालमेल आणि हार मिळविण्यासाठी ती आपल्या पतीच्या आधी या राजपुत्राला मान देण्याचे आश्वासन देते हे एका स्त्रीच्या भावस्थितीचे वर्णन आले आहे. अशा गीतांमुळे आदिवासी स्त्रियांचे मनोरंजन होते त्याचबरोबर काम करताना एकप्रकारची ऊर्जा मिळते.

महादेव कोळी समाज मूळातच अत्यंत खडतर परिस्थितीत राहत असला तरी निसर्गाचा सहवास त्यांना मिळाल्यामुळे जणूकाही निसर्ग त्यांच्याशी हितगूज करत असतो. तेथील पशू-पक्षी त्यांना साद घालत असतात. अशा निसर्गातील काही घटकांचेही भलर गीतात वर्णन आले आहे -

आवती-भवतानी डोंगर

दिवस निघूनआलाय वर

रान दिसतं हिरवं गारान्

गुरं चरती माळावर...

आदिवासी भागातील हे निसर्ग सौंदर्याचे वर्णन आदिवासी स्त्री आनंदाने गाते. निसर्गातील प्रत्येक घटकावर आदिवासी जीवापाड प्रेम करतो. पशू-पक्षी तर त्यांचे सवंगडीच असतात या अर्थाने येथील आदिवासी स्त्री अत्यंत देखण्या मोरासंबधी गाणं गाते -

सवर्णाचा कुचा माझा मोर गं
कोणी मारीला गं, कोणी मारीला .
गुंजावाणी डोळं याचे लाल गं
कोणी मारीला गं, कोणी मारीला .

कोकणच्या बावडीवरी पाणी पिया
गेला माझा मोर गं...

मोराची पीसं म्हणजे सोन्याचा कुंचला अशी उपमा या गीतातील स्त्री देते . त्याला मारल्यामुळे ही स्त्री अत्यंत दु:खी कष्टी झाली आहे . पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळ करणारी आणि त्याचे गुणगौरव करणाऱ्या या आदिवासी स्त्रीच्या मनाची संवेदनशीलता येथे प्रकट होते .

भलरीची निर्मिती ही प्रामुख्याने हसत-खेळत कामकरण्यासाठी झालेली असते . त्यामुळे भलरीची सर्वच गीतं ही निसर्ग, पौराणिक, गौळणी किंवा बोधपर नसतात तर कधी कधी भलरीत विनोदी गीतंही आढळतात . त्यामुळे काम करताना अधिक खेळीमेळीचे वातावरण निर्माण होते . उदा . नवरा बायको एकमेकांशी विनोदाने कसे संवाद साधतात ते पाहा -

चल गं नारी डोंगरी घर बांधू
नाय रे मेल्या संसारी चित माझं .
डोंगरी शेतात तामकुडी भातं
देवा मी एकली किती कांडू
पायातल्या पटया देतो मी तुला
जा मला सवतुली पाहायला
हिंडलो हिंडलो मुंबई शहरा, भरबाजारा
नाय मिळाली तुला गं सवतुली
गळयातला गाठला देते मी तुला...

कष्ट करून थकलेली ही स्त्री आपल्या पतीला सवत आणण्याची विनंती करते . त्यासाठी ती स्वत:चे दागिने देण्यास तयार आहे . पती डोंगरावर घर बांधण्याचे सूचवतो परंतु त्याच्या पत्नीला ते मान्य नाही

म्हणून ती लटक्या रागाने त्याला 'मेल्या' म्हणते. सवत आल्यावर तिला कामात मदत होईल अशी भाबडी आशा ती एकीकडे व्यक्त करते पण दुसरीकडे ती आपल्या नवऱ्याला नाराजही करत नाही. ती आपल्या नवऱ्याला सांगते की, मी तुझ्याबरोबर डोंगरावर येऊ शकत नही म्हणून तू मला सवत घेऊन ये. म्हणून या स्त्रीचा पती अनेक शहरे फिरतो. शेवटी पुण्यातून तो दुसरी बायको आणतो पण काही दिवसांत त्यांच्यातही भांडणं सुरू होतात आणि विंचू डसून सवतीचा नाश व्हावा अशी ती गीतात पुढे इच्छा व्यक्त करते. या गीतातून नवराबायकोचा उपरोधिक संवाद मजेशीर साधला आहे. अशाचप्रकारचे दोघी सवतींची भांडणे कशी होतात यासंबंधी खालील गीत पाहा -

काळी अन् गोरी भांडू लागली
तमाम दोघीजणी गं, तमाम दोघी जणीन्
तमाशा बघतोय घरचा धनी गं, बघतोय घरचा धनी.

गोऱ्या बायकोला साडया घेतोय एकाचड एक
अन् काळीला म्हणतो थिगळ जड.

गोऱ्या बायकोला जेवाया घेतो दहया दुधाचे ताट गं
काळीला म्हणतो खरखटं चाट.

गोऱ्या बायकोला घेतो सुवर्णाची खाट गं
काळीला म्हणतो भुईवर लोट.

दोन बायकांमुळे नवऱ्याची झालेली फजिती त्याचबरोबर काळया बायकोवर झालेला अन्याय आणि गोऱ्या बायकोचे लाड होत असल्यामुळे घरात भांडण होते असा विनोद या गीतात साधला आहे. शेतात काम करताना अशाप्रकारे गीतांत वैविध्यता असेल तर भलर अधिक रंजक होते व काम करताना उत्साह वाढतो.

स्त्री-पुरूषांच्या तारूण्यातील आणि प्रेमाने वेडापिसा झालेला तरूण जेव्हा आपल्या बायकोकडे दुर्लक्ष करतो तेव्हाचे उपरोधिक बोल भलर गीतातून बोलले जातात. येथे फक्त गंमत म्हणून या गीताकडे पाहिले जाते. त्यामुळे कामाला आलेल्या स्त्री-पुरूषांचे चांगलेच मनोरंजन होत असते.उदा-

बागेमध्ये लाविले पेरू आल्यात भराला

आल्यात भराला

तोडू दे गं माझे मला बागे चालला

नको गं नारी टाकून बोलू

छंद लागला

खावना गं आन पानी झुरते मनाला.

बागेमध्ये लाविले चिकू आल्यात भराला

आल्यात भराला

तोडू दे गं माझे मला बागे चालला

नको गं नारी टाकून बोलू

छंद लागला

खावना गं आन पानी झुरते मनाला.

अशाप्रकारे फळांची नावे घेऊन हे गीत म्हटले जाते. अशाप्रकारच्या गीतांमधून नेमका काय अर्थ निघतो हे काही वेळेला या लोकांना माहीतही नसते. केवळ कामासाठी गीत या भावनेने ते गाणे गातात. कधी कधी विनोदी गीते म्हटली जातात. उदा-

भलरे बाय सारंगी गं,

सारंगी एक नारंगी गं.

मडक्यात भातन् सुनेला लाथ

तवलीत कांजीन् सुनेला गांजी...

वरील गीतात एकप्रकारची लयबद्धता दिसून येते. लोकगीतांच्या क्रियासंबंद्धतेचा विचार केल्यानंतर असे स्पष्ट होते की, लोकगीतांतील स्वररचनेत अशी काही तत्त्वे असतात की, ज्यामुळे या क्रियांना सुकरता येते. त्या क्रियामध्येही लयबद्धता येते. वरील गीत गाताना याची अनुभूती येते. अशी गीत रचना करूनही कामात विरंगुळा साधला जातो. वरील गीत हे खूप जुन्या विचाराचे आहे. जुन्या रूढीचे आहे. कारण पूर्वी आदिवासी समाजात धातूची भांडी नव्हती तर मातीच्या मडक्यात किंवा तवलीत

जेवण बनवत असत् त्यामुळे येथील स्त्रीच्या वाटयाला आलेले भोग, तिचा होणारा सासूपासून छळ मौखिक परंपरेने पुढे तसेच आले आहे.

अशाप्रकारे शारीरिक कष्ट करताना साामूहिक पद्धतीने अशी गीतं गायली जातात. भलरीमध्ये स्त्री-पुरूष दोघेही सहभागी होत असल्यामुळे एकमेकांच्या सूरात सूर मिसळवून ही गीतं गायली जातात. त्यामुळे त्यांच्यात एकोप्याची भावना दिसून येते. शेतात काम करताना ढोल आणि टाळ या वाद्यांचा वापर केल्यामुळे संपूर्ण शिवारातच नव्हे तर पंचकोशीतील वातावरण भारावून जाते. वरील विवेचनातून असे स्पष्ट होते की आदिवासी स्त्री भोळीभाबडी असली तरी ती शहरी मध्यमवर्गीय स्त्रीसारखी संवेदनहीन नाही. या आदिवासी स्त्रीला ज्ञानाचा व शिक्षणाचा वारसा नसला तरी शुद्ध मानवी मनाची करूणायुक्त सखोलता त्यांच्यात जाणवते. दुसऱ्याच्या मनाच्या खोल जखमा समजून घेण्याची त्यांच्या ठायी असलेली अनुकंपा आणि भावनांचा ओलावा त्यात आपल्याला आढळतो.

या संबंधी डॉ.अमोल वाघमारे म्हणतात की, भलर या लोकगीतांतून ठरावीक विषयांवरच गीते म्हटली जातात. त्यात प्रामुख्याने देवदेवतांवर त्यातही पौराणिक काळातील काही देवांचा उल्लेख आलेला असतो उदा. राम, कृष्ण, हनुमान, शंकर, पार्वती, सीता यांचा उल्लेख असतो. त्याचबरोबर आदिवासी भागातील जे कुलदैवत आहेत त्याला आदिवासी कुळसाया म्हणतात उदा. बहिरोबा, वरसुबाई , ताथवडी, मारूती, वनदेव यांचाही आवर्जून उल्लेख या गीतांमध्ये केला आहे. त्याचबरोबर कधीकधी भलरीमध्ये मिश्कील विनोद, तारूण्याचे चित्रण, उपरोधिक प्रेमकहाण्या, प्रियकराच्या आठवणीने झुरणारी तरूणी इ. भावभावनांवर गीतं म्हटली जातात.तसेच स्त्री ही नातेसंबंध टिकविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असते. त्यामुळे सासर-माहेर अशा दोन्ही ठिकाणच्या लोकांचे प्रेम ही स्त्री आत्मसात करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेच इतर शारीरिक कामातील लोकगीतांत आणि भलर गीतांत फरक असल्याचे आपल्या लक्षात येते.

# सण-उत्सवाप्रसंगीची गीते

सर्वच जाती-धर्मातील लोकांना सण-उत्सव प्रिय असतात.या उत्सवाप्रसंगी आनंद व्यक्त करण्यासाठी आपापल्या परंपरेनुसार, रीतौ रिवाजानुसार नृत्य, गाणे, संगीत कलांची जोपासना केली जाते. आदिवासी समाज तर कलेचे उपभोक्ते आहेत. विशिष्ट ताल, सूर व संगीताच्या ठेक्यावर आदिवासी स्त्री नृत्य करत असते. महादेव कोळी जमातीत आपल्या पारंपरिक सणांच्या दिवसी शेतातील, जंगलातील कामे सोडून गायन, नृत्य, संगीताचा पुरेपुर आनंद घेतात. विशेषत: होळीच्या दिवशी येथील स्त्रिया रात्रभर नाचगाण्याचा कार्यक्रम करतात. आदिवासी भागात होळीला शिमगा म्हणतात. हा सण पाच दिवसांचा असतो. सलग पाच दिवस येथील स्त्रिया शेतात कोणत्याही प्रकारचे काम करताना दिसत नाहीत. वर्षभर शारीरिक कष्ट केल्यामुळे विसावा म्हणून या पाच दिवसांत अनेक खेळ खेळले जातात. होळी हा आदिवासींच्या दृष्टीने केवळ उत्सव नसतो तर होळीला ते दैवत मानतात. आपली देवी आहे, ती आपली आई आहे अशी भावना होळीप्रती आदिवासींची असते. म्हणूनच ते गाण्यामधून ‘होळीआई‘ असा आदरयुक्त शब्द वापरतात.

गावच्या पाटला

निजला कारे जागा रे

होळीआई आलेयी आपल्या मंजिरी ओ

होळीआय मागते

पाच पुरणाच्या पोळया ओ

होळीआय मागते

पाच पुरणाच्या पोळया...

होळीच्या दिवशी कोणी झोपायचे नसते अशी येथील रीत आहे. रात्रभर खेळ गाणी म्हणणे हा रिवाज आदिवासी आजपर्यंत जपत आला आहे. म्हणून गावचा पाटील असो किंवा सामान्य माणूस असो येथे सर्वांना समान न्याय दिला जातो. मुळात शिमग्याच्या महिन्यामध्ये येथील स्त्री-पुरूष कामधंदा करत

नाही. आनंद आणि उत्साहाचा महिना म्हणजे शिमग्याचा महिना अशी येथील परंपरा असते म्हणून या महिन्यावर खालील गीत म्हटले जाते -

महिन्या मंदी गं महिना शिमगा उगविला
महिन्या मंदी गं महिना शिमगा उगविला,
सरस्वती बंधू माझा कोण्या वाटे गेला
सरस्वती बंधू माझा कोण्या वाटे गेला,
भीमाशंकरच्या कुंडावरी गं बंधू आंघोळीला गेला
भीमाशंकरच्या कुंडावरी गं बंधू आंघोळीला गेला...

या महिन्यामध्ये आदिवासींना मोकळीक मिळते त्यामुळे विविध ठिकाणांना भेटी देणे, एखादे शुभकार्य असेल तर ते करणे इत्यादी कामे येथे पार पाडली जातात. वरील गीतातून स्त्री आपल्या भावाला एक प्रकारचा शीलवान समजत असे ही त्याला बुद्धिमान समजते. त्यामुळे आपला भाऊ हा कोणी ऐरागैरा नाही तर तो मोठा बुद्धिमान आहे. तो कुठे भटकंती करण्यासाठी गेला नाही तर भीमाशंकरच्या कुंडावर स्नान करण्यासाठी गेला आहे. पुढील कडव्यामध्ये तो भीमाशंकरचे दर्शन घेण्यासाठी जातो असा उल्लेख आला आहे.

फुगडया, फेर धरून नाचणे, गाण्याच्या माध्यमातून थट्टा मस्करी करणे असे मनोरंजनाचे कार्यक्रम चालतात तसे पौर्णिमेच्या टिपूर चांदण्यात या महिलांचे खेळ चालू असतात. मुलींपासून ते म्हाताऱ्या स्त्रियांपर्यंत या नाच गाण्यात Ÿया उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. ज्या पारंपरिक फुगडया खेळल्या जातात तशाच आदिवासी भागातही फुगडया खेळल्या जातात फक्त त्यात थोडाफार बदल जाणवतो उदा. रिंगण फुगडी, काठवट, बैठी फुगडी, घुमा, पिंगा इत्यादी प्रकार काही फरकाने खेळले जातात.

दैनंदिन कामातून विरंगुळा मिळावा म्हणून उन्हाळयाच्या दिवसांत आदिवासी पाडयांवर हे खेळ खेळले जातात. त्यांचा सराव येथील स्त्रिया पंधरा ते वीस दिवस आगोदरपासूनच करतात. विशिष्ट ताल, पदन्यास व आवाजातील माधुर्य यांचा सुरेख मिलाफ या गीतांमधून पाहवयास मिळतो. एक प्रमुख स्त्री पुढे गाणे म्हणते आणि तिच्या मागे बाकीच्या स्त्रिया गाणं म्हणतात असा येथील रिवाज असतो. ही गाणी गाताना नृत्याच्या हालचालींवर गायली जातात त्यामुळे त्यांच्या टाळयांचा आवाज आणि पायांची

एकसारखी हालचाल यामुळे ही गीतं अतिशय विलोभनीय दिसतात.फुगडी, झिम्मा इत्यादी खेळांच्या तुलनेत फेरगीताच्या संदर्भातील शारीरिक हालचाली अधिक संथ असतात. त्यांची गती मंदावलेली असते. त्यामुळेच या नृत्यखेळगीतात अर्थाकडे लक्ष देण्यास वेळ मिळून अर्थवाही शब्दरचना आणि त्यातून व्यक्त होणारा सुसंगत अर्थ फेरगीतांतून व्यक्त होतो. दृकश्राव्यस्वरूपाच्या या गीतांची सुरूवात प्रामुख्याने आदिवासींच्या परंपरागत दैवतांच्या नामस्मरणाने होते.

हाती तांबियाची झारी

पाणी दहिवाराचं भरी

पूजा वनदेवाची करी...

असे सुरूवातीला सर्व देवतांची नावं घेऊन खेळाला सुरूवात केली जाते. जसजसा खेळ रंगत जातो तशी या खेळात वैविध्यता वाढत जाते. मुळात फुगडी हा खेळ आनंदासाठी खेळला जात असल्यामुळे त्यात थट्टा मस्करी मोठयाप्रमाणात चालते. याच्या उलट काही गीतं ही अत्यंत गंभीर आणि उद्‌बोधक असतात. सीतामाई ही सत्वाची आहे. सीतामाईचे आदर्श वर्तन कसे होते हे सांगण्यासाठी ती म्हणते -

सई तुझा नवरा गं नवरा गिरणीवाला

त्यानी घेतला गं घेतला चंद्रावळा

एका धुण्यानी गं धुण्यानी झालाय गोळा

त्याचे रूपये गं रूपये दिलेत सोळा

तुझ्या मामाचा गं मामाचा जंबू मळा

त्यानी लाविल्या गं लाविल्या मखमली

पाणी घालीतो गं घालीतो वेळोवेळी

फुलं तोडीतो गं तोडीतो घडोघडी

गजरे गुंफितो गं गुंफितो हरोहरी

एक वाय फुलाची गं फुलाची झालेय नास

नाशिक शहराला गं शहराला गेलाय वास

नाशिक शहर गं शहर मोठे गाव

कोणत्या पेठेला गं पेठेला उभी राहू
सीता माईच्या गं माईच्या गुंफा पाहू
सीता माईच्या गं माईच्या रूपा मंदी
दिवा जळतो गं जळतो तुपामंदी.

वरील गीत हे केवळ मनोरंजनात्मक आहे. त्यातील एका ओळीचा संदर्भ दुसऱ्या ओळीशी आलेला आहे. त्यामुळे संपूर्ण गीतातून योग्य बोध होत नाही. असे असले तरी या गीतातील यमक कोठेच ढळलेले दिसत नाही. त्यामुळे आपोआपच ताल व लय निर्माण झाली आहे. नवरा गिरणीवाला, जंबू मळा, फुलांचा वास, नाशिक शहर आणि सीतामाई यांचा एकमेकांशी काहीही संबंध लागत नाही. फक्त नाशिक शहरात सीतामाईची गुंफा असल्याचा संदर्भ सापडतो बाकी केवळ यमक हव्यासापोटी ही रचना झाल्याची दिसते. तरीही हे कथात्मक गीत ऐकणाऱ्याचे चित्त खिळवून ठेवण्यास यशस्वी झाले आहे.

आदिवासी स्त्री ही स्वत:ला गौळणीच्या रूपात पाहते. खालील गीतातील गौळण ही पुराणातील असली तरी गीत गाताना, नृत्य करताना ती स्वत: एका गौळणीच्या रूपात आहे असा भास तिला होतो म्हणून ती आपल्या सखीशी संवाद साधते -

गौळण बोलते गौळणीला, गौळणीला
यशोदेला गं पुत्र झाला, गं पुत्र झाला
कृष्णा गेलाय गं मुंबईला, गं मुंबईला
तिकडून आणली गं गोल साडी, गं गोल साडी
नेसून गेले मी बावडीवरी, गं बावडीवरी
नंदा जावा त्या डोळे मोडी, गं डोळे मोडी.

वरील गीतातून कृष्णा हा श्रीकृष्ण तर नसेल? यशोदाचा उल्लेख आल्यामुळे कृष्णाचा उल्लेख आपोआप आल्याचे दिसते. पण श्रीकृष्ण हा मुंबईला कसा जाऊ शकेल? हा ही प्रश्न येथे उपस्थित होतो. थोडक्यात काय आशयानुरूप गीताची रचना येथे केल्याचे दिसते. वास्तवाचा विचार न करता केवळ मनोरंजन साधण्याचा येथे प्रयत्न केला आहे. श्रीकृष्ण, विठ्ठल, राम, शंकर ही पौराणिक दैवते आदिवासींच्या जीवनाचाच एक भाग होऊन गेल्याचे दिसते. ही दैवते सदैव आपल्याबरोबर असतात

अशी त्यांची श्रद्धा असते म्हणून त्यांना या आदिवासी स्त्रिया आपल्या सुख, दु:खात सामावून घेतात. वरील गीतात कृष्णाने सहावारी साडी आणणे म्हणजे या स्त्रीचे आणि कृष्णाचे किती जवळचे नाते आहे हे स्पष्ट होते. त्याच्याही पुढे जाऊन कृष्णाने आणलेली साडी नेसल्यामुळे तिच्या नंदा, जावांचा कसा जळफळाट होतो याचे सुंदर वर्णन केले आहे. त्यामुळे या स्त्रीला एकप्रकारे मोठेपण मिळाले आहे.

आदिवासी समाजातील काही वास्तव घटना कधीकधी फुगडी गीतात पहावयास मिळतात. नातेसंबंधातील दुरावा कसा निर्माण होतो व त्यातून सामाजिक तेढ कशी निर्माण होते याचा प्रत्यय या गीतातून येतो.

गुलाबा, गुलाबा तुझी हवा
सोनार देणार गेले गावा,
कधी येतील, येतील सांग देवा
बहिणीच्या चोळीसाठी मी वाट विसरलो बाजाराची
नारीच्या नथीसाठी मी अंगठी मोडली हजाराची...

वर्षानुवर्षे बहीण-भावाच्या पवित्र या नात्यात लग्न झाल्यावर कसे अंतर पडते याचे हे उदाहरण आहे. वरील गीतातील प्रत्येक कडव्यात या नारीची हौस पूर्ण करण्यासाठी हा भाऊ स्वत:चा एक-एक दागिणा मोडतो आणि बहिणीच्या चोळीसाठी मात्र तो बाजारालाही जाऊ शकत नाही ही समाजाची वास्तव परिस्थिती येथे दिसून येते. याच्या उलट एक बहीण आपल्या भावावर किती प्रेम करते याचे भावस्पर्शी चित्रण खालील गीतातून आले आहे.

चिंचवाच्या बांधाखाली, चिंचवाच्या बांधाखाली
बंधू माझा गं दारू गाळी
कोण गं मेला वादी झाला
बंधू माझा गं धरून दिला
मागे पुढे पोलीस झाले
बंधू माझा मधी चाले
गळयातला गं गाठला मोडील

बंधू माझा गं सोडवून आणील.

आदिवासी समाजात दारूचे व्यसन मोठयाप्रमाणात असते. त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे दिवसभर कष्ट केल्यामुळे शांत झोप लागावी म्हणून पुरूष दारू पितात. दुसरे म्हणजे ज्यावेळी उदरनिर्वाहाचे सर्व मार्ग बंद होतात तेव्हा आदिवासी दारू विकून पोट भरण्याचा प्रयत्न करतो. वरील गीतातील या स्त्रीचा भाऊ अवैद्य दारूविकी करत असल्यामुळे समाजातील कोणीतरी फितूर होऊन पोलिसात याविषयी माहिती दिली आहे आणि त्याला पोलीसांनी पकडून नेले आहे. तरीही या स्त्रीला आपल्या भावाचा प्रचंड अभिमान वाटतो. दारू गाळणे म्हणजे या स्त्रीला भूषणावह वाटते तसेच मागे आणि पुढे पोलीस आणि तिचा भाऊ मधी म्हणजे एक प्रकारे त्याने काहीतरी शौर्य गाजवले आहे असा समज ती व्यक्त करते. पण आपल्या भावावरचे प्रेम ती व्यक्त करताना मागचापुढचा विचार न करता आपल्या भावाला सोडवून आणण्याचा निर्धार करते. त्यासाठी ती आपल्या अंगावरील दागिने मोडायला तयार आहे.

पहिल्या गीतातील पुरूष हा आपल्या पत्नीच्या प्रेमासाठी स्वत:च्या बहिणीला विसरतो आणि स्वत:चे दागिने मोडून पत्नीला दागिने घडवितो तर या गीतातील स्त्री स्वत:च्या नवऱ्याचे सौभाग्याचे लेणे जे मंगळसूत्र ते मोडून भावाच्या मदतीला धावून जाते. हा नैतिक बोध या गीताच्या माध्यमातून समाजाला होतो.

बहीण भावाच्या प्रेमाचा ओलावा जाणवणारी गीतं, पती पत्नीच्या प्रेमाची गीतं, सासू-सून यांच्या संवादातून निर्माण झालेली गीतं अशी गीतांची रचना झाल्यामुळे नात्यातील दृढ संबंध असल्याचे लक्षात येते तर कधी त्यांतील व्यंगही असल्याचे दिसून येते. बहीण भावाच्या नात्यातील एक अतूट नातं अशाच एका गीतातून व्यक्त झाले आहे.

माडीला शिडया मी लावीते
प्रकाराच्या करंज्या काढीते
बंधुला जेवाया वाढीते
सर्व कामाची याद नाय मला
बाळाला दूध मी पाजीते

प्रकाराच्या पोळया मी करीते...

खूप दिवसांतून भाऊ आपल्या बहिणीच्या घरी पाहुणा म्हणून गेल्यावर बहिणीला होणारा जो आनंद आहे तो या गीतातून व्यक्त झाला आहे. या गीतातील ही स्त्री माडीवर जपून ठेवलेले पदार्थ खास आपल्या भावाला वाढत आहे. एवढेच नव्हे तर आपला भाऊ खूप दिवसांतून आला आहे त्यामुळे या बहिणीला विशेष आनंद झाला आहे. या आनंदाच्या भरात काय करू आणि काय नाही अशी तिची अवस्था झाली आहे. त्यासाठी ती विविध प्रकारचे पदार्थ बनवू पाहत आहे. असे पदार्थ बनवताना तिला कशाचेच भान राहत नही.

आदिवासी लोकगीतांतून नातेसंबंध, निसर्ग, ग्राम दैवत, प्रादेशिकता यांचा नेहमीच सहसंबंध असतो. काही गीते ही रचनाबंधाच्या दृष्टीने थोडी कमी असली तरी ती श्रवणीय असतात. त्यातील आशय आणि विषय हा सामान्य माणसाच्या कक्षेतील असतो. उदा.

माझ्या गुलावाच्या फुला रे

घोडेगाव पुणे जिल्हा रे

जेवण करते घरला चला रे

चहा करते घरला चला रे...

या गीतातील एक प्रेयसी आपल्या प्रियकराला घरी येण्यासाठी कसा आग्रह करते याचा उत्तम नमुना आहे. ती आपल्या प्रियकराला ती गुलाबाच्या फुलाची उपमा देते यावरून तिचे त्याच्यावर किती प्रेम आहे हे लक्षात येते. वास्तविक पाहता अर्थाच्या दृष्टीने हे गीत बाळबोध वाटत असले तरी चाल आणि ठेका उत्तम जमत असल्यामुळे नाच गाण्यास हे उपयुक्त ठरते. अशाप्रकारच्या स्त्रीगीतांबद्दल डॉ.शरद व्यवहारे असे म्हणतात की, ‘लोकवाङ्मयाचा बराचसा भाग कलेच्या साथीने विकसित होत असतो असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. लोकवाङ्मयातील बरीच लोकगीते लोकनृत्याशी संबंधित असतात. स्त्रियांची सण, उत्सव, विधीप्रसंगी म्हटली जाणारी गाणी, विशेषत: नागपंचमीची फेराची गाणी, मंगळागौरीची गाणी, घागरी फुंकण्याच्या प्रसंगाची आणि पिंगा, फुगडी इत्यादी प्रकारच्या खेळांची गाणी आणि नृत्य यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो.’ आदिवासी स्त्रियांच्या खेळामध्ये अशा प्रकारची गीतं फारशी नसली तरी त्यांची गीत आणि नृत्य यांचा सहसंबंध नक्कीच आहे असे येथे नमूद करावे लागेल.

नागपंचमीला आदिवासी भागात फुगडया खेळल्या जातात. या फुगडयांमधून नातेसंबंध, देवतांचे वर्णन आलेले आहे. महादेव कोळी जमातीचा नागपंचमी हा पहिला सण. या सणाच्या आगमनाने आदिवासी भागात उत्साह संचारतो म्हणून आदिवासी महिला या सणापासून पुढील प्रत्येक सणावर हे गीत रचले आहे.

नागपंचमीचा डोळा बाय डोळा
पुढं सवास आला पोळा बाय पोळा
पोळेची निवडीत होते डाळ बाय डाळ
पुढे नवचंडीची माळ बाय माळ
माळंची वाजे घाटी बाय घाटी
दिवाळीने केली दाटी बाय दाटी
दिवाळीचा पुजला दिवा बाय दिवा
वांगंसट घेती धावा बाय धावा
वांगंसटीचा वांगा बाय वांगा
पुढे सक्रात बामण सांगं बाय सांगं
सक्रातीचा पुजला सुगाड बाय सुगाड
पुढे बीज आली दुगाड बाय दुगाड
बीजंचा पुजला ठम बाय ठम
शिवरात टाकू देईना दम बाय दम
शिवरात्रीची सोडली पारणा बाय पारणा
शिमग्याना घेतलौ धरणा बाय धरणा
शिमग्याची सोजीभोजी  बाय भोजी
पुढं पाडवा झाला राजी बाय राजी
पाडव्याची उभारीत होते गुढी बाय गुढी
आखेदीना मारली उडी बाय उडी

आखेदीची कराकेळी बाय केळी

पुढी जत्रा आली खेळी बाय खेळी

जत्रेत उधळीत होते शेरणी बाय शेरणी

पुढे खुरासणेची पेरणी बाय पेरणी

खुरासण्यातला काढीत होते डवणा बाय डवणा

पुढे पाऊस आला पाव्हणाा बाय पाव्हणा.

या गीताचे एक विशेष असे आहे की वर्षातील सर्व सण एकापाठोपाठ एक येत असतात. त्याचे वर्णन तर आले आहेच त्याचबरोबर त्या सणांचे वैशिष्टयही त्यातून जाणवते. पावसाळयातनुकतीच शेतातील लावणीची कामे पूर्ण झालेली असतात नागपंचमीच्या सणाला गावातील नवविवाहीत तरूणी एकत्र जमतात त्यावेळी फेर धरून  गीत म्हणतात -

नागाची पंचमी वहीण भावाची, चंद्राची रूईनी झाल्या गं बाय

आज मला सासरी जायाचं हाय.

आई गं रूक्मिणी जैसी, तिच्या संगं मला बोलायचं हाय

आज मला सासरी जायाचं हाय.

बाप माझा ऐसा गं विठोबा जैसा गं, त्याच्यासंगं मला बोलायचं हाय

आज मला सासरी जायाचं हाय...

सासरी निघालेल्या मुलीच्या मनाची झालेली द्विधा अवस्था या गीतातून नमूद होते. माहेरच्या माणसांपासून दुरावा निर्माण होत असल्यामुळे या मुलीला आपले आईबाप हे पंढरीच्या विठ्ठल-रखुमाईसारखे भासतात. त्यांच्याशी तिला मनसोक्त बोलायचे आहे. एकदा सासरी गेल्यावर त्यांच्याशी ती बोलणार नाही म्हणून आपल्या आईबाबांच्या विरहावस्थेचे हे गीत आहे.

आदिवासी भागात फुगडयांचे अनेक प्रकार खेळले जातात. लांडगा हा त्यातलाच एक गमतीशीर प्रकार. एक महिला पुरूषाचा वेश धारण करून येते. त्याला लांडगा म्हणतात. बाकीच्या स्त्रिया एकमेकींच्या कमरेला धरून एक लांबलचक साखळी तयार करतात. सर्वांत पुढे असलेल्या महिलेच्या हातात कापडाला पीळ देऊन तयार केलेला एक चाबूक असतो. लांडगा बनून आलेली स्त्री

साखळीतील महिलांच्या अंगावर तुटून पडण्याचा प्रयत्न करते त्यावेळी लांडगा म्हणतो, 'एक शेळी खाव का?' त्यावर साखळीच्या सर्वांत पुढची स्त्री लांडग्याला चकवा देत उत्तर देते, 'नको रे लांडग्या.'

'लय सय झाली.'

'होऊ दे जाव दे.'

'तवली जळाली वास आला.'

'जावदे जळू दे.'

अशाप्रकारे लांडग्याच्या हाती एकही स्त्री लागू दयायची नाही हा उद्देश असतो. कधी कधी लांडगा जास्तच आक्रमक झाला तर त्याला कापडाच्या चावकाचा मार मिळतो तर कधी सर्वांना हुलकावणी देऊन तो एखाद्या महिलेला पकडून बाजूला नेत असतो. या खेळामुळे आदिवासी महिलांना निखळ आनंद तर मिळतोच त्याचबरोबर त्यांच्यात एक प्रकारे ऐक्याची भावना आणि स्वसंरक्षण याची जाणीव होते. रात्रभर खेळल्या जाणाऱ्या या गीतांमुळे शारीरिक हालचालींना विशेष महत्त्व असते. नाटयात्मक खेळल्या जाणाऱ्या या फुगडी गीतातून त्यांच्या कलागुणांचा विकास झालेला दिसतो. आदिवासींच्या अंगी निसर्ग त: कलागुण अवगत असतात. कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय ते अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक अशा कला सादर करीत असतात. आदिवासी कलांचा गौरव करताना पंडित नेहरूंनी लिहिले आहे, "आमच्यामधून त्यांच्याभागात जाणारे लोक या रानटी लोकांना सुधारावयास आलेल्या सुधारकांचा आव आणून स्वत:कडे उपदेशकाची भूमिका घेतात. असे हे उपदेशक त्यांच्याकडे जातात आणि त्यांच्या पद्धतीसंबंधाने कपाळास आठया घालून तिरस्कार दाखवून सुधारणांच्या नावाखाली त्यांना त्यांची जीवनपद्धती गाडून टाकण्याचा उपदेश करतात.परिणामत: क्षुल्लक सुधारणांच्या मोबदल्यात आदिवासी जीवनानंदाला पारखे होतात. या चुकीमुळे आदिवासी माणसाला आपण निरूत्साही, जिव्हाळाशून्य आणि बेचव जीवनाकडे वाटचाल करावयास लावतो आहोत."

जोडीची फुगडी हा एक वैशिष्टयपूर्ण खेळ खेळला जातो.दोन स्त्रिया एकमेकींचे हात हातात घेऊन गाण्याच्या तालावर विशिष्ट ठेक्यावर नाचतात.

आम्ही दोघी बहिणी सारखाल्या, सारखाल्या

हातात बांगडया बारकाल्या, बारकाल्या

आम्ही दोघी बहिणी छंद करू, छंद करू
चहा पियाचा बंद करू, बंद करू
आम्ही दोघी बहिणी जिण्यात गं, जिण्यात गं
फोटो काढू पुण्यात गं, पुण्यात गं
आम्ही दोघी बहिणी दादरावं, दादरावं
फोटो काढू पदरावं, पदरावं.

असे गाणं म्हणून एकमेकींच्या हाताला घट्ट पकडून फूऽऽ फूऽऽ असा आवाज करत गोल फिरतात. हे गीत ऐकण्यास जेवढे चांगले वाटते तेवढेच ते पाहण्यासही चांगले वाटते. फुगडीमध्ये पायाचा तालबद्ध पदन्यास आणि संपूर्ण शरीराला गिरकी असे काहीसे स्वरूप या नृत्यखेळगीतात असते. फुगडीत ठेका, नाद आणि लय सांभाळण्यासाठी त्यातील शब्दरचना झालेली असते. महाराष्ट्रात फुगडीचे अनेक प्रकार स्त्रियांच्या खेळात प्रचलित आहेत. त्यात दोन हातांची फुगडी, दंड फुगडी, एका हाताची फुगडी, बसफुगडी इत्यादी. वरील फुगडी ही दोन हाताची फुगडी असल्यामुळे या गीतातील ठेका आणि नाद हा शरीराला आपोआप नृत्य करण्यास भाग पाडणारा आहे.

बैठी फुगडीमध्ये एकमेकींवर विनोद निर्माण केले जातात. या लोकगीतांमधून पायांची विशिष्ट हालचाल केली जाते. आणि तोंडाने आवाज काढून एकप्रकारची लय प्राप्त केली जाते. मनोरंजन करणारी ही गीते अबालवृद्धांना मजेशीर वाटतात. हा फुगडीचा लघुप्रकार आहे. कारण बसून तालावर नाचणे कठीण असल्यामुळे या गीतांतून एकच प्रसंग चित्रित होतो.उदा.

एक भूई सारवू सारवू, शेंगा वाळत घालू घालू
एक श्यांग बुडाली बुडाली, खिडकीत जाऊन दडाली दडाली
खिडकीला आला लोंढा लोंढा, भिजला माझा गोंडा गोंडा
गोंडयाच्या हाती रूपया रूपया, भाव माझा शिपाया शिपाया
शिपायाच्या बायल्या बायल्या, लाथा बुक्क्या खाल्ल्या खाल्ल्या
लाथा बुक्क्या सोसना सोसना, दारचा पाव्हणा उठना उठना
त्याने आणली म्हैस गं म्हैस गं, म्हशीला झाली पाच पिल्लं पाच पिल्लं

एक पिल्लू मेला मेला, घोडीवं घालून नेला नेला

घोडा पडला उताना उताना, सवत नेली भूताना भूताना.

फेराची फुगडी खेळून कंटाळा आला की अशाप्रकारच्या मनोरंजनपर फुगडया खेळल्या जातात. विशिष्ट शारीरिक हालचाल या गीताला आवश्यक असते. कधी कधी दोघी मिळून तर कधी गोलाकार पाच-सहा महिला बसून ही फुगडी खेळतात. या गीतांचा वास्तवाचा काहीही संबंध नसतो किंवा एका ओळीचा दुसऱ्या ओळीशी काहीही संबंध नसतो. उदा. खालील गीत पाहा -

फू बाई फू लुगडया गू

धूवलातं धूव नायतर शिमग्याला ठिव.

किस बाई किस दोडका किस

दोडक्याची फोड लागली गोड

आणिक तोड बाय आणिक तोड.

बैठी फुगडी मध्ये स्त्रिया गुडघ्यात एक पाय दुमडून त्याच्यावर दोन्ही हात ठेवून गीत गायले जाते. रिंगणामध्ये ही फुगडी खेळली जाते. गाणे म्हणून झाल्यावर सर्व एकाचवेळी फूऽऽ फूऽऽ असा आवाज करून नाचतात -

राही बाईचा कोंबडा

पाटी खाली म्या डालला

पाटी गेली उडून

कोंबडा आलया चरून

कोंबडयाच्या गळयात साखळी

माझी बहीण धाकली

पाना खायाला शिकली

तांबोळयाला हिकली

तांबोळीदादा भामटा

शेंडीला धरून आपटा

शेंडी आली हातातं

बैल गेले शेतातं

शेतकऱ्याचं शात

फुगडीवाल्याचं गोत.

आदिवासी भागाला कोकण प्रदेशाचे मोठे कौतुक वाटत असते. म्हणूनच अनेक लोकगीतांतून कोकणचा उल्लेख आलेला आहे. तसे पाहिले तर कोकण प्रदेश येथील स्त्रियांनी पाहिलाही नसतो पण कोकण म्हणजे कोठे तरी दूरचा प्रदेश अशी या स्त्रियांची समजूत झालेली असते. म्हणून कोकणात जायचे आहे म्हणजे खूप दूर जायचे आहे. आंबेगाव तालुक्याच्या पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वत रांगांच्या पलीकडे कोकण भाग लागतो. त्यामुळे त्याला कोकणकडा असे म्हटले जाते या अर्थाने एक कौतुकाची बाब या कोकण प्रदेशाकडे पाहिली जाते. शिमग्याच्यावेळी या प्रदेशावर खालील गीत म्हटले जाते.

आगं कोकणे भात भोकणे

तांदूळ सड गं दना दना

आणलय खारिक, केलंय बारीक

मला जायाचय कोकणला

आगं कोकणे भात भोकणे

तांदूळ सड गं दना दना

आणलाय माव्हरान् केलाय चेव्हरा

मला जायाचय कोकणला

आगं कोकणे भात भोकणे

तांदूळ सड गं दना दना

आणलेय सुकट अन् केलेय तिखट

मला जायाचय कोकणला

आगं कोकणे भात भोकणे

तांदूळ सड गं दना दना

आणलाय मासा अन् केलाय रसा
मला जायचय कोकणला.

कोकणातील पदार्थ म्हणजे भात, माव्हरा, सुकट, मासे यांचा या गीतामधून उल्लेख आला आहे. ही आदिवासी स्त्री कोकणी स्त्रीला उद्देशून म्हणते की, तू हे पदार्थ आणलेत पण मला घाई झाली आहे. कारण मला कोकणलाच जायाचे आहे. यातून येथील स्त्रियांना कोकणचे आकर्षण असल्याचे दिसून येते.

आदिवासींच्या सण-उत्सवांमध्ये तेथील स्त्रीमध्ये चैतन्याची भावना आणि ओसांडून वाहणारा तिचा उत्साह पाहून डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात, "रंगीबेरंगी पानाफुलांच्या नेत्रदीपक झुपक्यांची मनोहरी नि देखणी सजावट अंगाअंगावर धारण करणाऱ्या महावस्त्रांची राजीखुशीने पेललेल्या दऱ्याखोऱ्यातील दुनिया म्हणजे आदिवासींची दुनिया. शहरापासून लांब, दूरवर असलेल्या या दुनियेतील माणसं हौसेमौजेने ऐसपैस मैदानात येऊन नाचायला व गायाला लागली म्हणजे धरित्रीच्या अंगावर समाधानाचे रोमांच फुलू लागतात. अशावेळी पहाडी मुलुखातील मंद शीतल वारा शीळ घालीत धावून पुढे येतो. पानाफुलांमधील सळसळ पार्श्वसंगीत उभं करते!... मग निजायला धरित्री, उशीला धोंडा अन् पांघरायला आभाळ घेत निसर्गाच्या कुशीत वावरताना ही मंडळी एवढी आनंदी कशी यातलं गणित काही केल्या सुटत नाही... आदिवासींची ही दुनिया अद्भुताचे पंख ल्यालेली गंधर्वकन्या आहे. ती देखणी तशीच मोहमयी आहे." असा गौरोद्गार करून आदिवासी स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू लेखिकेने येथे उलगडला आहे. खरोखरच आदिवासी स्त्री ही निसर्गातील वेलीफुलांचा साज चढवून आपल्या सौंदर्यात भर घालत असते. सण-उत्सवाप्रसंगी ती आपल्या अंगचे कलागुण दाखवण्याचा प्रयत्न करत असते.

शिमगा हा आदिवासींचा सर्वात मोठा सण. पाच दिवस या सणामध्ये स्त्रिया खेळ गाणी गातात. त्यामुळे ही खेळ गाणी विपुलप्रमाणात दिसतात. यात बरीच गाणी ही कथा गीते असतात. कारण कथागीत हे दीर्घ स्वरूपाचे असते. कथानक उलगडताना सर्व महिला एकत्र मन लावून ऐकत असतात. या कथा कधी विनोदी तर कधी गंभीर स्वरूपाच्या असतात. आंबेगाव तालुक्यातील महादेवकोळी जमातीच्या स्त्रिया खालील कथागीत गातात -

सासू सुनेचा भांडान झाला

सासू उठली दणक्यानं
गेली भाकरी घेऊन
लेक औताला गेला
अरे अरे तू लेक दादा
ये रं भाकरी कुठं ठेवू?
ठेव काळया आंब्या खाली.
येथे  काळीया आंब्याखाली
एक निघाला ढवळा नाग
तिने धरिला मारिला
त्याला रूमाली बांधीला
घेऊनी घरवासी आली
तिने खांडिला खुंडिला
तिने शिजत घातीला
तो ही शिजला भिजला
तो ही उचलून ठेवीला
उठ ...... जेवायाला
मला नका ओ अत्याबाई
माझं डोकं दुखताई
पहिला घास जो घेतला
तो ही घास का हो कडू?
कोण्या देशाची माळीन आली
कडू भाजी देऊन गेली
दुसरा घास का हो कडू?

कोण्या देशाचा तेली आला
कडू त्यालही देऊन गेला
तिसरा घास जो घेतला
तो ही घास का हो कडू?
कोण्या देशाचा वाणी आला
कडू खोबरं देऊन गेला
पाचवा घास जो घेतला
...... धरणीला पडली
गेली शेजारणीच्या घरी
अगं अगं गं शेजारीणबाई
खोरं कुदळ दे गं मला
खोरं कुदळीचं काय काम?
माझ्या ...... बाळंतीन
खोरं कुदळ आणिली
चुली भानवस खणीली
...... भानवस घातली
दारी पलंग टाकीला
लेक औतावरूनी आला
त्याला निद्रा लागून गेला
...... सपनात गेली
अगं अगं माझ्या आई
चारी मुरवती आहेत
एक मुरवती नाही
गेली असेल पाण्याला

चारी बारवं धुंडील्या
अगं अगं माझ्या आई
चारी मुरवती आहेत
एक मुरवत नाही
गेली असंल फटीयेला
चारी रानं धुंडियेली
अगं अगं माझ्या आई
चारी मुरवती आहेत
एक मुरवत नाही
गेली असंल गवरेली
त्यानं माळही धुंडला
अगं अगं माझ्या आई
चारी मुरवती आहेत
एक मुरवत नाही
गेली असंल माहेराला
गेला सासूरवाडीला
त्याची सासू बोलती झाली
दिली पाटं न बसाया
सासू लागली पुसायला
कवा आलं ओ जावयबुवा
तुमची ...... बाळंतीन
गेली सोनाराच्या आळी
अरे अरे तू सोनार दादा
आखळी माखळी दे रे मला

आखळी माखळीचं काय काम?

माझी...... बाळंतीन

गेली शिंपयाच्या आळी

अरे अरे तू शिंपीदादा

अंगडं टोपडं दे रे मला

अंगडं टोपडयाचे काय काम?

माझी ...... बाळंतीन

खरं सांगा ओ जावयबापू

येडी झाली नां सासूबाई

तुमची...... बाळंतीन

गेली गवऱ्याच्या तिथं

चूली भानवसी खणिल्या

...... सरणावर घातली.

या कथागीतांच्या शेवटी कथानकाला अचानक कलाटणी मिळते. ऐकणाऱ्याच्या मनात कथानकात पुढे काय घडणार आहे याची पुसटची कल्पनाही नसते. कदाचित म्हणूनच अशाप्रकारचे कथानक हे उत्कंठावर्धक असते. ही कथागीते सूडभावनेच्यापोटी तयार केलेली दिसतात. त्यामध्ये कदाचित जवळच्या नाते संबंधातील दोन माणसेही असू शकतात. वरील गीतात एका सासूने सुनेचा सूड घेतला आहे. त्यामुळे सुरूवातीला ही गीतं ऐकण्यास मजेशीर वाटतात पण शेवटी शोकांतिका निर्माण होते. अशाच प्रकारे एक भाऊ आपल्या बहिणीला का व कसा मारतो याचे हे कथा गीत पहा -

मुली माहेराला लोकाच्या

आमची ...... सासरला

कर गं आई तहान-भूक लाडू गं

मी तर जातो ...... ला आणाया गं

पहिल्या वनाला लागला

ते एक वन वलांडिले

दुसऱ्या वनाला लागला

ते एक वन वलांडिले

तिसऱ्या वनाला लागाला

ते एक वन वलांडिले

तिथं गं भेटला गायखादादा

अरे अरे गायख्या दादा

एवढया म्हशी रे कुणाच्या?

...... च्या सासऱ्याच्या

ते एक वन वलांडिले

चौथ्या वनाला लागला

तिथं गं आलं

...... चा वाडा गं

...... ने लांबून पाहिला गं

झारी भरून पाण्याचा आणलं गं

दिली बांधवाच्या हातात गं

बांधव बाई चौरंगावर गेला गं

बांधव बाई नान्हीला धुवीला गं

येऊन बाई शासनांगी बसला गं

...... बाई पुससे लागली गं

का रं बंधू येणं तुझं झालय

सण वहिणी पंचमीचा आलायी

मी तर आलोय तुला घियाला

पुस तुझ्या लाडक्या सासऱ्याला गं

...... गेली सासऱ्या का जवळी
आ वो, आ वो मामंजीबा
बंधू आलाय निह्याला
धाडित्या काय माहेराला?
गुणाचे गं गुणवंती
मला काय पुसती तुझा जाणा
पुसं तुझ्या लाडक्या सासूला
...... गेली सासू का जवळी
आ वो, आ वो आत्याबाई
बंधू आलाय निह्याला
धाडित्या काय माहेराला?
गुणाचे गं गुणवंती
मला काय पुसती तुझा जाणा
पुसं तुझ्या थोरल्या भायाला गं
सोन्याचा काय नांगूर
रेशमाची पाग त्याला
भायानं नांगरच धरला होता गं
भायानं नांगरच धरला होता गं
हाका मारीते भावोजीला
बंधू आलाय निह्याला
धाडिता का माहेराला?
गुणाचे गं गुणवंती
मला काय पुसती तुझा जाणा
पुसं तुझ्या थोरल्या जावंला गं

जावंबाई भाकरी टाकीती गं
गेली...... जावच्या जवळी गं
हाक मारी बाईऽऽ बाईऽऽ
बंधू आलाय निद्याला
धाडित्या काय माहेराला?
गुणाचे गं गुणवंती
मला काय पुसती तुझा जाणा
पुसं तुझ्या पती परमेश्वराला
पती तिचा पलंगावर बसला गं
हळू हळू जवळ गेली
हाक मारी आवोऽऽ आवोऽऽ
बंधू आलाय निद्याला
धाडित्या काय माहेराला?
कपाटाची उघड तुझ्या कुलपा गं
नेस तुझा सावळा पितांबर गं
अंगी घाल वरमाईची चोळी गं
...... गेली न्हाहायला
...... न्हाहाली धुवली
नेसली बाई सावळा पितांबर
कपाळ भरून कुंकू लेली गं
...... पुढं भाऊ मागं
पहिल्या वनाला लागली
ते एक वन वलांडिले
दुसऱ्या वनाला लागला

ते एक वन वलांडिले

तिसऱ्या वनाला लागाला

ते एक वन वलांडिले

चौथ्या वनाला लागली

...... दुरून पाहिलं गं

झारी भरून पाण्याची आणली गं

...... न्हाहाली धुवली गं

दे गं आई वहिणीचा दाटा गं

नेस माझ्या लाडक्या तू लेकी गं

...... नेसली वहिणीचा दाटा गं

पंचारती तयार केली

...... गेली राऊळं पुजायला गं

बारिक बारिक पाऊस आला

भिजला कपाळाचा कुंकू गं

कुंकवाचा डाग लागती दाटयाला

राऊळ पुजून घरी आली

आगं आगं माझ्या आई

चांगल्या चांगल्या बांगडया भर गं

अगं अगं माझ्या लेकी

अशी काय म्हणती खोटयावाणी

सातजण भाऊ तुझे

लावीन तुझ्या सोबतीला एक गं

...... गेली पलंगावरी

सोडला फरफर दाटया घडी

नेसला बाई सावळा पितांबर गं
कपाळ भरून कुंकू लेली
भाऊ पुढे ...... मागे
ते एक वन वलांडिले
...... गेली दुसऱ्या वनी
भावाच्या कंबरेला सुरी
घातली ...... च्या उरी गं
फिटला बाई दाटयावरचा डागू गं.

अशाप्रकारच्या लोकगीतांची रचना नेमकी कशी होते? त्याची प्रेरणा कोठून मिळाली या प्रश्नाचे उत्तर मात्र ग्रिम आणि गुमरेही देऊ शकले नाहीत. त्यामुळे लोकसाहित्यविशारदांनी असे गृहीत धरले आहे की, लोकगीतांची निर्मिती करण्यासाठी लोक उत्सवविधीप्रसंगी एकत्र जमतात. त्यावेळी समूहातील घटकव्यक्ती एकाच मानसिक अवस्थेत असतात. यातूनच हे वरील प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे अशाप्रकारची गीतरचना ही गूढपद्धतीने होते असेच तूर्त म्हणावे लागेल.

# लोकगीतांतून व्यक्त होणारे नातेसंबंध

आदिवासी महादेव कोळी जमात ही समूहाने राहत असल्यामुळे नात्यासंबंध हा समाजजिवापाड जपत असतो. या समाजात आपल्या भावकीतील सोडून इतर बारा आडनावे गोतेभाऊ म्हणून समजली जातात. त्याला 'बारा बुडं' असेही म्हणतात. त्याचबरोबर एखादया महिलेने पहिला पती सोडला असेल किंवा पहिल्या नवऱ्याचा मृत्यू झाला असेल तर त्याची मुले आणि त्याच महिलेने दुसरा नवरा करून त्याच्यापासून जी अपत्य झाली असतील ती. अशा दोन घराण्यांतील मुलांमध्ये जे नातेसंबंध असते त्याला 'दूधभाऊ' असे म्हटले जाते. या समाजात नातेसंबध बिघडू नयेत म्हणून विशेष काळजी घेतली जाते. शब्दाला जागणारा हा समाज नात्याविषयी प्रचंड हळवा असतो. याचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या लोकगीतांतून येतो. लग्नगीतं असोत किंवा शारीरिक श्रमाची गीतं असोत एका विशिष्ट नात्याची गुंफण या गीतांतून झाल्याची दिसते.

कोणी अनोळखी व्यक्ती असेल तर येथील स्त्री त्याला दादा, बाबा, मामा, काका असे नाते जोडण्याचा प्रयत्न करते. आदिवासी समाज नातेवाईकांना मानणारा आहे. त्यामुळे दीर-भावजय, सवत-सवत, दोन विहिणी, दोन व्याही यांची कधीकधी गीतांतून चेष्टा मस्करी चालत असते. त्याचा उद्देश हाच की हे नातेसंबंध अधिक दृढ व्हावेत. अशीच एक आदिवासी स्त्री गुरे राखणाऱ्या माणसाला कशाप्रकारे नात्यात गोवते ते पहा-

खेळ मी खेळते गं खेळते वाटेत
तिकडून आली वाऱ्याची झुळूक गं वाऱ्याची झुळूक
गेली माझी सुपली गं सुपली वाऱ्याने
जाऊनी काय गुंतली गं जाळीच्या बेंदाडा
तिकडून आला एक गायखा दादा
अरे अरे गायख्या रे दादा
दे माझी सुपली रे काढून
होईल तुझ्या शेजारची रे शेजारची अस्तुरी
खेळ मी खेळते गं खेळते वाटेत...

मुलीचे लग्न झाल्यावर ती दुसऱ्या घरात जाते तेथे तिला नवीन, अनोळखी माणसं भेटतात या माणसांशीच तिला आपलेपणाची वागणूक दयावी लागते म्हणून लग्नामध्ये या मुलीची समजूत तेथील अनुभवी महिला काढतात -

हळदीनं भरलय पातळ

बायचं पातळ गं लग्नाचं.

दोन दिसांचा बापन्

बायचा सासरा गं जन्माचा.

दोन दिसांची आईन्

बायची सासू गं जन्माची...

माहेरी असताना आई, वडील, भाऊ, बहीण, चुलता यांचा लळा असलेल्या या मुलीला लग्नानंतर सासरच्या माणसांशी मिळते जुळते कसे घ्यावे लागते. याविषयी समाजातील एक अनुभवी महिला या मुलीला अशाप्रकारे समजावून सांगते. पुढील आयुष्यात सासू, सासऱ्यांचा आपल्या आई-वडिलांप्रमाणे सांभाळ कर अशी एकप्रकारची सूचनाच ती देत असते. त्याचबरोबर सासरी गेल्यावर मुलीने कसे वागावे, कसे बोलावे याचीही ती शिकवण देते.

आपल्या मुलीविषयी अति संवेदनशील असलेल्या आई-वडिलांना घरात लाडाने वाढलेली मुलगी लग्न झाल्यावर दुसऱ्याच्या घरी जाणार ही कल्पनाच सहन होत नाही. म्हणून लग्नाच्या दिवशी नवऱ्या मुलीला हळद लावताना येथील स्त्रिया सदरच्या मुलीला उद्देशून म्हणतात -

चंदनाच्या पाटावरी ...... नवरी लहान गं,

हळू हळू हळद लावा तिच्या बापाचे लाड गं.

हळू हळू हळद लावा तिच्या आईचे लाड गं...

सासर आणि माहेर याच्यातील हा फरक या गीताच्या माध्यमातून जाणवतो. माहेरी मुलीला किती जपले जाते, तिचे किती लाड पुरवले जातात याचे हे उत्तम उदाहरण आहे. हळद लावतानाही तिला इजा होऊ नयेत अशी तिच्या माहेरच्या माणसांची इच्छा असते. थोडक्यात सासरच्या माणसांना हा एकप्रकारचा

संकेतच असतो की ही मुलगी किती लाडात वाढलेली आहे. त्यामुळे यापुढे सासरी तिला कसे वागवावे या संबंधीचे हे सूचकदर्शक गीत आहे.

लग्न झाल्यावर आदिवासी मुलगी जेव्हा सासरी जाते तेव्हा तिथे तिला कितीही त्रास झाला तरी ती कुणाजवळही तक्रार करत नाही. किंबहुना तशी तिच्या मनाची तयारी लग्नापूर्वीच केलेली असते. या मुलीला सतत माहेरी जाण्याची मुभा नसते आणि जर कधी तिचा बाप तिला माहेरी नेण्यासाठी आला तर तिचा आनंद गगनात मावत नसतो. या आशयाचे खालील गीत आहे.

जिन्या डोंगर फोडू, जिन्या डोंगर फोडू
जिन्या डोंगराला येढे मारू, जिन्या डोंगराला येढे मारू
...... कोण गं आले ...... आले
जीवा काळजाचे बाबा आले, जीवा काळजाचे बाबा आले...

वडिलांच्या दृष्टीने त्यांची मुलगी जसा त्यांच्या काळजाचा तुकडा असते तसाच मुलीच्या काळजाचा तुकडा तिचे वडील असतात. थोडक्यात लग्न झालेल्या मुलीला माहेरची माणसे किती प्रिय असतात हेच या गीतातून दिसते.

आदिवासी भागात लग्नकार्यात मानपानावरून अनेकदा रूसवे फुगवे होतात. विशेषत: आहेराच्यावेळी महिलांना मिळणाऱ्या साडयांवरून जास्त रूसवे होतात. लग्नकार्यात वरमाईला आहेर हा तिच्या भावाची साडी असते. देवक आणण्यासाठी किंवा लग्नाच्या दिवशी या वरमाईच्या अंगावर आपल्या भावाने आणलेली साडीच असते आणि तिचा रंगही शक्यतो हिरवाच असतो. अशा या भागातील एक वरमाई मात्र लग्नकार्यात आपल्या जावेची मनधरणी कशी करते हे वाखाणण्याजोगे आहे.

या गं मांडवाच्या दारी,या गं मांडवाच्या दारी
जावा जावांचा रूसवा सखे गं, जावा जावांचा रूसवा.
माझ्या बंधूचे पातळ, माझ्या बंधूचे पातळ
जाऊ बाईला नेसवा सखे गं, जाऊ बाईला नेसवा...

येथे ही महिला विचार करते की लग्नकार्य काय एक दिवसाचे असते पण दोघी जावांना कायम एकत्र राहावे लागते त्यामुळे नाते संबंध नीट टिकवायचे असतील तर संकुचितवृत्तीन ठेवता आपल्या जावेची इच्छा पूर्ण केली पाहिजे. हा उदार दृष्टीकोन आदिवासी स्त्री येथे दाखवताना दिसते. परंपरा जतन करण्याचे कार्य प्रामुख्याने स्त्रियांकडून घडते. म्हणून उत्सव, विधीप्रसंगी प्रामुख्याने स्त्रियांचा सहभाग असतो. लग्नगीते किंवा धार्मिकगीते यांमध्ये अशाप्रकारच्या लोकगीतांना महत्त्व असते. कुटुंबातील नातेसंबंध, समाजातील स्त्री-पुरूषसंबंध इत्यादी गीतांतून स्त्रियांचे मन प्रकट होते. स्त्रियांच्या भावजीवनाची अभिव्यक्ती अशाप्रकारच्या लोकगीतांतून होते.

माहेरी आलेली स्त्री ही दोन दिवस थांबली तरी तिला आपल्या नात्यातील व्यक्तींची किती सेवासुश्रूषा करावी अन् किती नाही असे वाटते. लग्नापूर्वी माहेरी हसत खेळत दिवस काढल्यामुळे लग्नानंतर ती माहेरी आल्यावर पुन्हा तिला घरातील छोटी मोठी कामे करावीशी वाटतात. त्या अनुषंगाने खालील गीताची रचना केली आहे.

गाडी चालते, चालते खडाडते
गाडी कोणाची, कोणाची वाट पाहते?
गाडी ...... ची, ...... ची वाट पाहते.
...... खोलीत खोलीत काय करते?
...... बापाची बापाची कपडे धिवते...

वरील गीतातील स्त्री ही माहेरी आली आहे परंतु तिला सासरी नेण्यासाठी तिचा पती तिला नेण्यासाठी गाडी घेऊन आला आहे. तो तिची वाट पाहत आहे परंतु ही स्त्री आपल्या माहेरच्या माणसात गुरफटून गेली आहे. तिला आपल्या माहेरच्या माणसांचा विरह सहन होत नाही. म्हणून ती घरातील अनेक छोटी मोठी कामे करून सासरी जाणार आहे. आपल्या आईवडिलांना कामातून काही घटका विश्रांती मिळावी हाही तिचा उद्देश येथे दिसून येतो.

आपल्या भावाच्या मुलीवर बहिणीचा हक्क असतो अशी आदिवासी समाजात रीत आहे. ती आपल्या भावाला त्याच्या लग्नातच त्याच्या होणाऱ्या मुलीसाठी मागणं घालते. अर्थात या भावाचे लग्न नुकतेच झालेले असते ते उभयता गृहप्रवेश करतात त्यावेळी ही बहीण दार अडवते आणि त्याच्याकडून

पहिल्या मुलीची अपेक्षा करते. आदिवासी समाजात मुलीला मानाचे स्थान आहे. मुलगी झाली म्हणून कुणालाही वाईट वाटत नाही. तिचा सन्मान करतात. ही बहीण भावाकडे गीताच्या माध्यमातून कशा प्रकारे मागणी घालते ते पाहा -

दार धरूनी दार- वटी
दादा तुझ्या रे लेकीसाठी
दादा ल्योक रे झाला मोठा
होऊ दे गं माझ्या बाई
देईन सोनाराला गायी
घडील याळावाचे ज्वाड
करील नंदा जावा ग्वाड...

वहीण भावामधील हे संवाद एकमेकांच्या नात्यात एक प्रकारे दृढता निर्माण करतात. माझा मुलगा मोठा झाला आहे,तुम्ही दोघे प्रथम मुलीला जन्माला घाला अशी ही बहीण म्हणते. तर तिची इच्छा पूर्ण करण्याचे वचन हे दांपत्य देते. वरील गीत म्हणून झाल्यावर गीताचा पुढील भाग हा गद्यमय आहे. भाऊ आपल्या बहिणीला विचारतो - 'का गं बाय दार धरलाय?' त्यावर ती उत्तर देते - 'मला लेक पाहिजे.' त्यावर भाऊ आपल्या बायकोचे नाव घेऊन म्हणतो - '... बाय लेक मागते.' त्यावर त्याची पत्नी त्याला अतिशय समर्पक उत्तर देते. 'होईल आमच्या घरी, तेव्हा देईल तुमच्या दारी.' असे म्हटल्यावर दाराला जे कापड आडवे धरलेले असते ते काढले जाते. अशाप्रकारे हे नातेसंबंध अखंडित असावे हा येथील जमातीचा उद्देश असतो.

लग्न झाल्यावर मुलीला आपल्या सासरच्या माणसांना सांभाळावे लागते. ती आपला नवरा, दीर,जावा, सासू, सासरेएवढीच नाती सांभाळीत नाही तर गावातील प्रत्येक व्यक्ती ही तिची कोणी ना कोणी तरी नात्यातील असते. त्यांची ओळख करून देताना आदिवासी स्त्री म्हणते -

डोंगराच्या किनारीला एक सूर्य गं उगविला
सूर्य गं उगविला तेथे बहिरोबा जलमला

बहिरोबाच्या मंदिरात सभा भरलेय गं पोरांची

सभा भरलेय गं पोरांची

...... तुझ्याच गं दिरांची, ...... तुझ्याच गं दिरांची...

असे सासरे, सासू, नणंद यांचा नामोल्लेख करून संपूर्ण गावातील माणसं ही नवधूचे कोणी ना कोणी नातेवाईक असल्याचे येथे सुचित केले जाते.

नाते संवंध जपण्यासाठी स्त्रीला सासरच्या माणसांना आपलेसे करावे लागते. ती आपल्या सासू-सासऱ्यांना आई-वडिलांच्या रूपात पाहते. म्हणून माहेरच्या स्त्रिया नवीन लग्न झालेल्या या सासूरवाशीणीला विचारतात -

वळना वळना गाडी घुंगराची जरा वळना

...... तुला आईची आठवण का गं होईना?

आई मला सासू मिळाली हौसेदार गं...

परिस्थितीनुसार वागायला शिकविणारी आदिवासींची संस्कृती नातेसंबंधाला तडा जाऊ नये म्हणून विशेष काळजी घेते. भले सासू कितीही भांडखोर असेल तरीही आपल्या आईच्या समाधानासाठी ती सासरच्या माणसांशी मिळते जुळते घेण्याचा प्रयत्न करते किंबहुना ती आपल्या सासू सासऱ्यांना आपलेसे करते.

आपला प्रियकर दूर गावी असल्यानिमित्त प्रेयसीच्या मनाची द्विधा मन:स्थिती कशी होते हे खालील गीतातून व्यक्त झाले आहे.

घाई घाई पत्र लिहिले गं ...... एक नाही उत्तर दिले

कसे देऊ उत्तर तुला रे प्रिया बाबाचे बंधन मला...

नातेसंबंध फक्त आई-वडील, आई-मुलगी, भाऊ-बहीण यांचाच आदिवासी लेकगीतात उल्लेख होतो असे नाही तर प्रियकर-प्रेयसी यांच्यातील प्रेमभावना व्यक्त करणारे वरील गीत एक वेगळीच जाणीव निर्माण करते. या गीतातील प्रेयसीवर आई, वडील, भाऊ, बहीणयांचे बंधन आहे. यामुळे प्रियकराच्या प्रेमाला ती होकार देऊ शकत नाही. थोडक्यात तिला प्रेम तर करायचे पण कुटुंबाच्या मर्यादा असल्यामुळे ती नकार देते. येथे या मुलीची शालीनता तर दिसून येतेच त्याचवरोबर ती आपल्या नातेवाईकांचे, आई-वडिलांचे मनही दुखवू शकत नाही.

आदिवासी लोकगीतातून केवळ समजूतीच्या सुरात एकमेकांशी संवाद साधला जात नाही तर कधीकधी सासरची माणसं रितीने वागली नाही तर त्यांना सज्जड दम भरला जातो.

भाजी मेथीची रेंदायची, ...... कशी काय नांदयाची

तिच्या सासूला सांगायचं, तिला रितीने वागवायचं...

असे सासरा, बहीण, नणंद यांचा उल्लेख करून त्यांनी आमची मुलगी नीट वागवावी अशी अपेक्षा केली जाते. अर्थात हे गीत सासरच्या माणसांच्या विरोधात असले तरी माहेरी ही मुलगी लाडात वाढलेली आहे. तिला सासरी कुठलाच त्रास नको अशी समज दिली जाते.

आई-वडिलांच्या घरी लहानाची मोठी झालेली मुलगी जेव्हा लग्न होऊन पुन्हा माहेरी येते तेव्हाही ती आपल्या आई-वडिलांशी प्रामाणिक राहते. ज्यावेळी तिचा पती सासरी घेऊन जाण्यासाठी येतो त्यावेळी त्या दोघांमध्ये काय संवाद होतात ते पाहा -

...... तुला आलोय नियाला कर गं तयारी

तुझ्या वाटेला लय दरडी.

बाबा माझे नाही घरी,गेले शेतावरी

कशी करू मी तयारी...

नेण्यासाठी आलेला पती या मुलीला अनेकप्रकारे विनवतो की, वाटेत अनेक दरडी आहेत. आपल्याला जाण्यास खूप उशीर होईल पण ही मुलगी आपल्या आई-वडिलांच्या अनुपस्थित कोणताच निर्णय घेऊ शकत नाही. यातून या मुलीचा प्रामाणिक आणि आपल्या आई-वडिलांविषयी आपुलकी दिसून येते.

लग्नकार्य म्हणजे रूसवे-फुगवे आले. त्याला आदिवासी समाजही अपवाद नाही. जावा-भावांची समजूत काढून त्यांची मनधरणी केली जाते. खालील गीतात नवऱ्या मुलाचा चुलता आणि चुलती रूसली आहेत तेव्हा त्यांची समजूत कशी घातली जाते ते पाहा -

या गं मांडवाच्या दारी,या गं मांडवाच्या दारी

माझ्या बंधूचे पातळ, माझ्या बंधूचे पातळ

नेसवा थोरल्या जावा सखे गं,नेसवा थोरल्या जावा.

या गं मांडवाच्या दारी,या गं मांडवाच्या दारी

रूसला माझा भाया सखे गं, रूसला माझा भाया

पडते तुमच्या पाया, पडते तुमच्या पाया

चला देवकाला जाया सखे गं, चला देवकाला जाया.

अशाप्रकारे सर्वांचे समाधान करून सर्वत्र आनंदी वातावरण ठेवण्याचे काम लग्नकार्य मालकाचे असते. नातेसंबंध अबाधित असावे, कोणाच्याही भावना दुखावू नये अशी येथे अपेक्षा असते. थोडक्यात काय तर आदिवासी लोकगीतांमध्ये नातेसंबंधाला खूप महत्त्वाचे स्थान आहे.

भाऊ-बहिणीचे अतूट व पवित्र नाते असते. मराठीमध्ये अनेक लोकगीतांमधून त्याची प्रचिती आपल्याला येते. आदिवासी भागातही या नात्यावर विविध प्रसंगी गीतं म्हटली जातात. पचंमीच्या सणाला आपला भाऊ बहिणीला नेण्यासाठी येतो पण बहीण त्याचा घात कशी करते याचे वर्णन खालील गीतातून आले आहे. वास्तविक पाहता कोणतीही बहीण असे कृत्य करणार नाही परंतु हा भाऊ मानलेला असावा. त्याचबरोबर या भावाला पकडून देण्यासाठी तिला बक्षीस मिळालेली असावी म्हणून ती त्याच्या सोबत अशी वागलेली आहे. आदिवासी क्रांतिकारांचा इतिहास महान आहे. होन्या केंगला, सतू मराडे, राघोजी भांगरे, कोंडाजी नवले असे अनेक क्रांतिकारक आदिवासी महादेव कोळी समाजात होते. या क्रांतिकारकांपैकी कोण्या एकाची ही मानलेली बहीण असावी. कारण आदिवासी क्रांतिवीर हे स्त्रियांचा नेहमी आदर करीत असत. त्यामुळे एखादया स्त्रीने या क्रांतिकारकाला जेवण-पाणी दिले असेल त्यातूनच त्यांचे पुढे बहीण-भावाचे नाते जडले असावे. शेवटी पैशासाठी ही बहीण कशी फितूर होते ते पहा -

पंचमीच्या सणाला पत्र आलं बांधवाला

बंधूने घोडा शिणगारीला

बंधू बहिणीच्या गावाला

बहिणीनं भोजन तयार केलं

बंधू बसा भोजनाला! बंधू बसा भोजनाला!

पाण्याचं निमित्त करूनी बहीण गेली

शिपाया बोलवाया

येढा पडला घराला

धरा धरा म्हणती या चोराला

अर्धी काठी राज्य देतो तुला चोळी बांगडीला

बहिणी सोड सोड मजला

बहिणी सोड सोड मजला!

वरील गीत हे बहीण भावाचे नाते संबंधातील असले तरी ते वेगळया आशयाचे आहे. तरीही आदिवासी समाजात हे नाते किती पवित्र मानले जाते याचेही हे उत्तम उदाहरण आहे. आपल्या बहिणीसाठी हा वीर अर्धी काठी राज्य देण्यास तयार आहे. दुसऱ्या बाजूने विचार केल्यास बहीण भावाच्या नात्याला तडा जाईल असे कृत्य ही बहीण करते असे वाटते. परंतु आशयानुसार आपल्याला येथे अर्थ घेणे सोयीचे ठरेल. या गीताच्या विरूद्ध खालील गीत पाहा. संपूर्ण गीतातून भावाचे कौतुक करणारी ही बहीण प्रत्येक सणाला त्याची आठवण काढत आहे.

सणामधी सण, सण पंचमी न्हायाला

पंचमी न्हायाला,सण पंचमी न्हायाला

सजना बंधू माझा यावा बहिणी निह्याला

बहिणी निह्याला यावा बहिणी निह्याला

सणामधी सण, सण बैलपोळा

बैलपोळा,सण बैलपोळा

सजना बंधू माझा कर बहिणी गोळा

बहिणी गोळा,कर बहिणी गोळा

सणामधी सण, सण दसरा भेटाया

दसरा भेटाया,सण दसरा भेटाया

दसऱ्या दिशी बहीण भावाला भेटावा

भावाला भेटावा,बहीण भावाला भेटावा

सणामधी सण, सण पहिली दिवाळी

पहिली दिवाळी,सण पहिली दिवाळी
दिवाळीच्या दिशी बहीण भावाला ववाळी
भावाला ववाळी, बहीण भावाला ववाळी
सणामधी सण, सण सटी सकरात
सटी सकरात, सण सटी सकरात
साकराचं लाडू म्यातं तुपात मोईले
तुपात मोईले,म्यातं तुपात मोईले
सजना बंधू माझा सोयीर बीजला बाईलं
बीजला बाईलं, सोयीर बीजला बाईलं
साकराचं लाडू म्या तर केले फराळाला
माझ्या बांधवाच्या गाडया , जातील नेरळाला
सणामधी सण, सण शिमगा अटीचा
शिमगा अटीचा,सण शिमगा अटीचा
सजना बंधू माझा छंद घेतील गाठीचा

या गीतातून प्रत्येक सणाला या बहिणीला आपल्या भावाची आठवण होते. येथे बहीण भावाचे अतूट नात्याची अनोखी वीण विणली आहे. प्रत्येक सासुरवाशीन महिलेला सणाच्या दिवशी आपल्या माहेरच्या आठवणी सतावत असतात. बालपणापासून या ठिकाणी खेळली बागडलेली असते त्यामुळे आपल्या पाठच्या किंवा मोठया भावाची ती या सणांमध्ये आठवण काढते.

आदिवासी समूहात नवरीमुलीचे कन्यादान हे तिच्या मामाकडून केले जाते. लग्न लागल्यानंतर मामा आणि मामी कन्यादान करण्यासाठी बसतात. त्यावेळी नवरा व नवरीचे पाय धुतले जातात. त्या दोघांच्याही पाया पडून त्यांना गुळ भरवून त्यांचे तोंड गोड केले जाते व कन्यादान केले जाते. म्हणजेच त्याने आणलेल्यावस्तू दिल्या जातात. साधारणपणे या वस्तू पाच भांडयाच्या स्वरूपात असतात. आपल्या भाचीने सुखी संसार करावा यासाठी मामा व मामी त्यांच्या पायावर हळद -कुंकू वाहून कन्यादानाचे पुण्य पदरी पाडून घेतात. त्याप्रसंगी इतर महिला खालील गीत गातात -

आंजनीच्या झाडाखाली,आंजनीच्या झाडाखाली
ताटं आल्यात इकायीला,ताटं आल्यात इकायीला
...... बोले माझ्या मामा, ...... बोले माझ्या मामा
ताटा घ्या माझ्या कनेदाणाला,ताटा घ्या माझ्या कनेदाणाला
आंजनीच्या झाडाखाली,आंजनीच्या झाडाखाली
टाक्या आल्यात इकायाला,टाक्या आल्यात इकायाला
...... बोले माझ्या मामा, ...... बोले माझ्या मामा
टाक्या घ्या माझ्या कनेदाणाला, टाक्या घ्या माझ्या कनेदाणाला
आंजनीच्या झाडाखाली,आंजनीच्या झाडाखाली
हांडं आलेत इकायीला,हांडंआलेत इकायीला
...... बोले माझ्या मामा,...... बोले माझ्या मामा
हांडं घ्या माझ्या कनेदानाला, हांडं घ्या माझ्या कनेदानाला.

महादेव कोळी जमातीत मामा-भाचीचे एक अतूट नाते असते. म्हणूनच या समाजात या अर्थाने एक म्हण म्हटली जाते की, 'भाचीची केली काशी आणि बहिणीचा केला देव.' याचा अर्थ असा की भाचीलाही बहिणीप्रमाणे येथे वागणूक दिली जाते. म्हणून या समाजात लग्नप्रसंगी नवरा-नवरीसाठी मामा-मामीला खूप महत्त्व असते. वरील गीत गायल्या नंतर मामाने भांडयाच्या स्वरूपात कन्यादान केले तर उपरोधाने इतर महिला त्याला गीतातून सुनावतात -

हांडयाची दुड केली, मामा फुटून गेली
नाकातली नथ केली, मामा राहूनी गेली.

थोडक्यात मामाने आपल्या भाचीसाठी कन्यादानाला भांडी आणू नये तर एखादा दागिना आणावा अशी अपेक्षा या गीतातून व्यक्त केली जाते.

# आधुनिक स्वरूपातील लोकगीते

लोकसाहित्यातून समाजजीवनाचा आविष्कार होतो आणि समाजजीवनाला नकळत आकार देण्याचे कार्य लोकसाहित्याकडून घडत असते. समाजजीवनातील परिवर्तनानुसार लोकसाहित्यात देखील परिवर्तने होत असतात. माणसाच्या उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यात जसा जसा विकास होत गेला तस तसे त्याच्या मुळाशी असलेल्या संस्कृतीचाही विकास होत गेला. आदिवासी लोकगीतांच्या बाबतीतही असेच काहीसे घडले आहे.महानगरीय वातावरणाचा प्रभाव काहीअंशी आदिवासी संस्कृतीवर पडलेला आहे. मराठी व हिंदी चित्रपटातील गीते आदिवासी भागात पोहचल्यामुळे त्यांचा आधार घेऊन आदिवासी लोकगीतांची रचना झाल्याचे दिसते. अनेक चित्रपटांतील लोकप्रिय गीतांची चाल या आदिवासी लोकगीतांना लावली आहे. त्यामुळे या लोकगीतांचा कर्ताही आधुनिक विचारसरणीचा असावा असे वाटते. या गीतांची चाल फक्त आधुनिक गीतांची असली तरीही त्यातून व्यक्त होणारा आशय, विचार हा मूळ लोकगीतांचाच आहे.मनोरंजनासाठी आणि वेगळेपण सिद्धकरण्यासाठी अशाप्रकारच्या गीतांची निर्मिती झाल्याची दिसते. तरीही मूळ गीतांच्या बोलावर नेमके शब्द शोधून योग्य चालीत ते म्हणणे तसे अवघड काम आहे. ही निर्मिती खूप जुनी नाही हे सदरच्या गीतांवरून समजते. कारण काही चित्रपट हे साठीच्या दशकातील आहेत तर काही नव्वदीच्या. याचा अर्थ ही रचना आधुनिक स्वरूपाची आहे. १९५६ साली सर्वत्र गाजलेले हिंदी चित्रपटातील गीत ‘ले के पहला पहला प्यार, भर के ऑखो में खुमार...’ या गीताच्या चालीवर महादेव कोळी समाजात लग्नाच्यावेळी हे गीत गायले जात -

वटी भरली शिद्यानी,<br>
आई मी जाते सासरला<br>
कधी येणार गं आई,<br>
तू मला निह्याला...

वास्तविक पाहता या गीताच्या आशयात विविधता दिसून येत नाही. कारण प्रत्येक कडव्यात आई, वडील, भाऊ अशी नावे बदललेली आहेत. त्यामुळे केवळ एका चित्रपटाची चाल या दृष्टीनेच या गीताकडे पहावे लागेल. तरीही ऐकण्यास ही गीत अत्यंत सुमधुर असल्यामुळे लोकप्रिय झाले आहे.

अशाचप्रकारचे हिंदी चित्रपटातील हे गीत 'परदेसी आ, परदेसी आ ये सच है पिया, सब कहते है मैने तेरा दिल ले लिया...' या गीताच्या चालीवर आधुनिक स्वरूपाचे लग्नगीत पाहा -

सुटला वादळ वारा

हिप्पी सांभाळ पोरा

तुझ्या हिप्पीला कंगवा

कोणी रे लाविला?

...... गावाची रे

...... नावाची रे

तुझ्या हिप्पीला कंगवा

तिने रे लाविला...

वरील गीतातून एक महिला प्रश्न विचारते आणि तीच त्याचे उत्तर देते. पूर्वी तरूणांमध्ये केस वाढविण्याची फॅशन आली होती. चित्रपटाच्या नायकाची नक्कल करण्याच्या हेतूने केस वाढविले जात होते त्याला हिप्पी असे म्हणत. तरूण मुले आपल्या केसांतून वारंवार कंगवा फिरवत त्या अर्थाने या गीतातील नायिका ही वधू आहे आणि ती त्याच्या प्रेमात पडली आहे, तिने त्याच्या हिप्पीला कंगवा लावला हा त्या तरूणाच्या मार्दव्याचा भाग येतो अशा अर्थाने काहीशी रोमांचक निर्मिती येथे झाली आहे. या गीतातील पुढील कडवे मुलीवर रचले आहे.

सुटला वादळ वारा

पदर सांभाळ जरा

तुझ्या पदराला धक्का

कोणी गं लाविला?

...... गावाचा गं

...... नावाचा गं

तुझ्या पदराला धक्का

त्याने गं लाविला...

स्त्रियांसाठी पदर म्हणजे शील , प्रतिष्ठा समजली जाते. कुलवंत स्त्री डोईवरचा पदर त्यामुळेच ढळू देत नाही. म्हणूनच पदराला धक्का लावण्याचे धाडस या तरूण नायकाचे झाले आहे म्हणून या स्त्रिया तिच्या होणाऱ्या पतीला उद्देशून हे गीत गाताना दिसतात.

नव्वदच्या दशकात 'फुल और कॉंटे' हा हिंदी सिनेमा प्रसिद्धीस आला होता. सदरच्या चित्रपटातील गीतही खूप लोकप्रिय झाले होते. त्यातील 'धीरे धीरे प्यार को बढाना है...' या गीताच्या चालीवर पुढील गीताची रचना झाली आहे. अलीकडच्या काळातही अशाप्रकारच्या गीतांची रचना होणे हे खऱ्या अर्थाने लोकगीतांचे मोठेपण म्हणावे लागेल.

धीरे धीरे चाल ...... सासरला

पाणी का गं येते तुझ्या डोळयाला.
आई तुझी सुटली गं, सासू तुला भेटली गं
रडू नको अशी तू विचार कर जरा...

अशाप्रकारे आई, वडील, भाऊ, बहीणयांच्यातील दुरावा निर्माण झाल्याचे या गीतातून स्पष्ट होते. तसे पाहिले तर हे गीत विरह निर्माण करणारे गीत आहे परंतु मूळ गीत हे प्रणय गीत आहे. एखादया प्रणय गीताला विरहगीताचा बाज देणे हे कौशल्याचे काम आहे. त्यापद्धतीची शब्द योजना करून सदरच्या गीताला एका विशिष्ट उंचीवर नेले आहे. या गीतातील स्त्रीचे लग्न झाल्यामुळे तिची पावले सासरला जाताना जड झाली आहेत. अशावेळी इतर स्त्रिया तिची समजूत घालतात आणि आई-वडिलांच्या जागी यापुढे सासू-सासरे आहेत असा धीर देण्याचा प्रयत्न करतात.

सत्तरीच्या दशकामध्ये 'आली अंगावर' या दादा कोंडके यांच्या चित्रपटातील 'गेली कुठं घावंना, बोलल्या बिगर ऱ्हावंना, बुजली ही कानाची भोकं न् खाजवाकी...' हे मराठी चित्रपटातील गीत लोकप्रिय झाले होते. त्याच्या चालीवर अलीकडे एक लग्नगीत म्हटले जाते -

हळद लावली अंगाला, उभी केली भिंतीला
झालीया जीवाची लंका
ओ राया तुम्ही, लावा खोलीला पंखा.

बाप आहे धर्माचा, सासरा आहे जन्माचा

सासरा आहे जन्माचा ओ राया...

अशी आई, भाऊ, बहीण यांचा संबंध अनुक्रमे सासू, दीर, नणंद यांच्याशी जोडला जाऊन नवरी मुलीची समजूत घातली जाते. नवरी मुलीला हळद लावल्यावर खऱ्या अर्थाने तिच्या अंगाची काहिली होते. त्यात ती सासरी जाणार या भावनेने तिच्या जीवाची तगमग पाहून या गीताची निर्मिती झाली आहे. याच चालीवर दुसरे लग्नगीत म्हटले जाते. काही भागात या गीताचे धृपद फक्त बदलले आहे बाकी पुढील कडवी बदलली नाहीत. उदा.

रिक्षावाला आला गं,रिक्षा उभी केली गं

बसाया खुडची दिली गं

बाई तुला मागणं आलं...

येथे मुलीला मागणं आल्यापासूनच तिच्या लग्नाची तयारी सुरू आहे असा संकेत मिळतो. म्हणून तिला समजावण्यासाठी काही ठिकाणी अशापद्धतीने गीत गायले जाते.

नव्वदीच्या दशकामध्ये हिंदी चित्रपट 'तेजाब' प्रचंड गाजला. त्यातील 'एक दो तीन...' हे गीत सर्वांच्या ओठावर होते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना हे गीत आवडत असल्यामुळे आदिवासी भागात लग्नाच्यावेळी याच चालीवर म्हटले जाणारे हे गीत पाहा -

कर चल गं तयारी ...... आलाय निह्याला

सासरला जाताना पाणी येतय गं डोळयाला

पुसूनी घे पदराला ...... चालली सासरला...

कधी कधी या गीताचे पहिले कडवे तंतोतंत जुळलेले असते परंतु नंतरची चाल काही अंशी फसलेली दिसते. त्यामुळे अकारण शब्दांची ओढातान करावी लागते. अशाप्रकारची लोकगीते ही केवळ चित्रपटांच्या चालीवरच आहेत असे नाही तर कोळीगीते, अल्बम, लावणी यांच्या चालीवरही पहावयास मिळतात. या लोकगीतांची प्रमुख वैशिष्टय अशी की, या गीतांमधून विरह, दु:ख, संवेदनशीलता दिसून येते. उदा.किती जीवाला राखायचं राखलं...' ही ना.धो. महानोर यांचे गीत (लावणी) लता मंगेशकर यांनी गायली आहे.ते अत्यंत विरहाने लग्नामध्ये कशाप्रकारे गायले जाते ते पाहा -

किती जीवाला राखायाचं राखलं

बाबातुम्ही जाळयात पाखरू टाकलं.

हळदी कुंकवाची पाच बोटं लावली

बाबा तुम्ही सासरची वाट मला दावली...

एका लावणीगीताचे रूपांतर विरह गीतात करण्याची कला या गीतरचनेमध्ये दिसून आली आहे. या गीतातील स्त्री आपल्या वडिलांना दोषी ठरवते. त्यांनीच तिला सासरला पाठवले आहे असा समज ती करून घेते. पण वडील आपले कर्तव्य बजावत असल्याने आपल्या मुलीचा संसार सुखी व्हावा असे त्यांना मनोमन वाटत असते. तसेच आईलाही ती अशाच पद्धतीने बोल देते. अनेक वर्षे सांभाळल्यानंतर लग्न झाल्यावर मुलीला सासरची वाट दाखवली अर्थात पुढील आयुष्याची सुरूवात सासरी करायची आहे हा सल्ला गीतातून दिलेला आहे.

आधुनिक स्वरूपाच्या या गीतातून समाजाचे मनोरंजन तर होते या शिवाय पारंपरिक लोकगीतांना छेद देण्याचे काम या प्रकारची गीते करत असतात. १९८९ सालात सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांचा अल्बम लोकप्रिय झाला. त्यातील 'सुन मेरी अमिना दिदी...' हे गीत प्रचंड गाजले. त्याच्या चालीवर आदिवासी महिलांनीही लग्नगीत रचले ते असे -

शिरी कपाळी बाशींगवाला

पतीराया निघ्याला आला

गळयात टाकूनी शाल रे , जाते मी नांदायला.

आई-बापाच्या नावासाठी

माझा संसार झाला सुरू रे ,जाते मी नांदायला...

मूळ गीत हे खास नृत्य आणि मनोरंजनासाठी तयार केले आहे. परंतु वरील गीत हे एक नववधू आपल्या पती सोबत सासरी निघाली आहे. लग्नासाठी नवरा आला म्हणजे तो मला घेऊन जाणार आणि यापुढे माझा संसार सुरू होणार हे आपल्या सखीला सांगते. थोडक्यात मूळ गीत आणि त्याच्या चालीवर रचलेले गीत यात भावनिकदृष्टया खूप मोठा फरक दिसतो.

आदिवासी महिलांनी सर्वच लोकप्रिय गीताच्या चालीवर आधुनिक गीतांची रचना केल्याची दिसते. त्यात कोळीगीतांचाही समावेश होतो. पुढील गीताची रचना कोळीगीताला अनुसरून आहे.

...... तुझ्या हळदी मामा आले, ...... तुझ्या हळदी मामा आले
मामा आले ...... नावाचे या ...... गावाचे.
दोन आले ...... गावाचे, दोन आले ...... गावाचे.
दोन आले ...... नावाचे या ...... गावाचे.

केवळ नाव, आडनाव, गाव यांच्यावर केलेली रचना रसिकांच्या पसंतीस पडते. सदरचे गीत व्यक्तिगत पातळीवर नाव घेतल्यामुळे त्याच्यात आपलेपणाची भावना निर्माण होते. आपले नाव गाण्यात आले हेच त्या व्यक्तीला भूषणावह वाटते. त्यामुळे हे गीत जास्तीत जास्त नावे घेऊन म्हटले जाते.

एकोणीसशे साठच्या दशकात 'सुशीला' या सुप्रसिद्ध मराठी चित्रपटातील लावणी 'कुण्या गावाचं आलं पाखरू' या लावणीने मराठी मनावर अधिराज्य गाजविले. या गीताच्या चालीवरच आदिवासी स्त्रियांनी लग्नगीताची निर्मिती केली -

कोण्या गावचा आला नवरदेव
कोण्या गावचा आला नवरदेव
बसलाय मंडपात, खुदुखुदु हासतोय गालात
तुझ्या सासऱ्यानी दिल्यालं घडयाळ
घे पाच पंचात
नको राग धरू तू मनात
कोण्या गावचा आला नवरदेव
कोण्या गावचा आला नवरदेव
बसलाय मंडपात, खुदुखुदु हासतोय गालात
तुझ्या सासऱ्याने दिलेली चेईन
घे पाच पंचात
नको राग धरू तू मनात

आदिवासी समाजात लग्नात हुंडा दिला जात नाही परंतु एखादया सासऱ्याने आपल्या जावयाला स्वेच्छेने एखादा दागिना देऊ केल्यास तो मंडपात जमलेल्या समस्त पाहुण्यांच्या साक्षीने दिला जातो. अर्थात ह्या वस्तु जास्त मौल्यवान नसून घडयाळ, रडिओ, अंगठी, चेन अशा स्वरूपाच्या असतात.

लोकगीतांच्या निर्मितीचा काळ हा अनिश्चित असतो असे म्हटले जाते. पिढयान् पिढयापासून एखादे गीत पुढे आलेले असते. आदिवासी भागातही अशी गीते अनेक आहेत. पण आधुनिक स्वरूपाच्या गीतांची रचना मात्र साधारणपणे केव्हा झाली असेल हे सांगणे सोपे आहे. कारण ज्या मूळ गीतांवरून ही गीत रचना केली आहे त्याचा काळ आपल्याला निश्चितच माहीत आहे. त्यामुळे या गीतांची निर्मिती ही अलीकडच्या काळातील आहे हे सिद्ध होते. उदा. 'वाट माझी बघतोय रिक्षावाला' या प्रसिद्ध गीताच्या चालीवर महादेव कोळी जमातीत खालील लग्नगीत म्हटले जाते.

...... तू फसलीन् मंडपात बसली
माहेर विसरली गं...... तू माहेर विसरली...

हे गीत साधारणपणे एखादीमुलगी आई-वडिलांच्या इच्छेविरूद्ध लग्न करत असेल तर म्हटले जाते. कारण एक कर्तव्य म्हणून तुझे आई-बाबा तुझे लग्न लावून देतात पण तू इतर मुलींच्याप्रमाणे आनंदाने माहेरी येऊ शकणार नाही. त्यामुळे हे गीत अपवादानेच म्हटले जाते. तरीही या गीताची रचना अगदी अलीकडची असल्याची आपल्या लक्षात येते कारण मूळ गीताची रचनाच एकविसाव्या शतकातील आहे. त्यामुळे या गीताला येथे विशेष महत्त्व आहे.

# लोकगीतातील स्त्री-संवेदना

सर्वसाधारणपणे नागर समाजात आदिवासींबद्दल भीतीयुक्त व औत्सुक्याच्या भावनेने पाहिले जाते. रानावनात राहणारे व तसेच जीवन जगणारे, स्त्रीयांचे जबरदस्तीने अपहरण करून त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, किंबहुना नरभक्षणाचीही खंत न बाळगणारे तसेच जादूटोणा करणारे, उघडे नागडे लोक म्हणजे आदिवासी. असा एक गैरसमज लोकांमध्ये निर्माण झाला आहे. आदिवासी स्त्रीबद्दल तर कमालीचे गैरसमज निर्माण झाले आहेत. पण वास्तवात आदिवासी हा ही एक मानवच आहे. त्यालाही इतर माणसाप्रमाणे भावभावना असतात हे विसरून चालणार नाही. आदिवासींच्या संस्कृतीचा सखोल अभ्यास केला तर स्वत:ला पुढारलेल्या म्हणवून घेणाऱ्या समाजापेक्षाही कितीतरी श्रेष्ठ दर्जाचे विचार आणि आचार आदिवासी समाजात पहावयास मिळतात. अनेक संशोधनातून हे सिद्धही झाले आहे.

इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी स्त्री ही मनाने कणखर असतेच त्याचबरोबर ती कमालीची संवेदनशीलही असते. परिस्थितीशी मिळते जुळते घेण्याची कला तिला अवगत झालेली असते. कठीण प्रसंगाला धीराने सामोरे जाणे, सहनशील वृत्ती आणि आशावादी या गुणवैशिष्टयांमुळे आदिवासी समाजाची ओळख समाजाला होते. आदिवासी समाज हा शोषित असला तरी स्वाभिमानी आहे. या समाजात स्त्रीचा सन्मान केला जातो. स्त्री आणि पुरूष दोघेही बरोबरीने काम करतात. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारी ही दोघांचीही असते. आदिवासी स्त्री ही मुक्तपणे जीवन जगते. नृत्य, गायन या कलेची ती भोक्ती असल्यामुळे दिवसभर कष्ट करून ती दमून-भागून आली तरी रात्री ती सण-समारंभात बेधुंद होऊन नाच गाणं करते.

लग्नगीतं, श्रमगीतं, विधीगीतं यांमध्ये आदिवासी स्त्री समरसून सहभाग घेते. त्यावेळी ती स्वत:चे रूप त्यात पाहत असते किंबहूना ते गीत तिच्या भावावस्थेतूनच निर्माण झाले आहे असे वाटते. विशेषत: लग्नगीतांतून तिच्या संवेदनशील मनाचीआपल्याला प्रचिती येते.

लिंबू कापीले लिंबू कडू लागले
बाय लिंबू कापीले लिंबू कडू लागले
आता काय रडतो ...... च्या बापा
ज्याची होती त्याने जिंकून नेली

तुझीच माया फुकट वाया गेली...

लहानपणापासून ज्या मुलीला सांभाळले ती सासरी गेल्यावर वडिलांची अवस्था अत्यंत हळवी होते. पुढे आई, भाऊ, बहीण यांच्यावर हे गीत भाष्य करते. जेव्हा एखादी गोष्ट आपली राहत नाही ती परंपरा व रूढींच्या अधिन होते तेव्हा माणूस या सर्वांपुढे हार पत्करतो. वरील गीतात जिंकणारा हा वर पक्ष आहे कारण लग्नानंतर पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये मुलीला मुलाकडे जावे लागते त्यामुळे वधूच्या घरी दु:ख तर वराच्या घरी आनंदाचे वातावरण असते. त्यामुळे या गीताची समर्पकता ही स्त्रियांच्यादृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. मुलीच्या लग्नाची चाहूल लागल्यापासूनच कुटुंबात संमिश्र भावना निर्माण होते. मुलगी सासरी जाते, तिचे नव्याने आयुष्य सुरू होते याचे समाधान असते, तर या घरात लहानाची मोठी झालेली मुलगी आज दूर निघून जाणार ही अगतिकता मुलीच्या घरच्या माणसांना सहन होत नाही. खालील गीतातून मुलीचा साखरपूडा झाल्यापासून तिच्या कुटुंबातील माणसांमध्ये विरहाची भावना निर्माण होते या आशयाचे गीत खालील प्रमाणे -

हाती भरला ग हिरवा चुडा

कधी झाला गं साखरपुडा

...... निघाली सासरला,

बाप रडतो खळखळा

नको रडू रे माझ्या बापा,

आज जाईल उदया येईल...

वरील गीतातून मुलगी आपल्या बापाची समजूत काढत आहे. ती म्हणते, 'आज जाईल, उदया येईल' परंतु तुम्ही रडू नका. वास्तविक पाहता लग्न झालेली मुलगी ही एका दिवसासाठी जात नसते पण तिची भावस्थिती पाहता ती त्यांच्या मनाची समजूत घालते. कदाचित लहानपणी एखादया गोष्टीचा हट्ट करताना अशीच तिच्या बाबांनी तिची समजूत घातली असेल. पण येथील समजूत खूप संवेदनशील आहे.

लग्न झाल्यावर मुलीला आपल्या माहेची आठवण होते आणि आपल्या माहेरच्या माणसांना ती सासरी सुखी असल्याचा निरोप एका पाखराकडे देते.

उड पाखरा मार भरारी

जवळ येशील का?

सासरचा निरोप माहेरी माझ्या

जाऊन धाडशील का?

बाबांना सांगावे लेक तुमची

सुखी आहे काळजी करू नये

एवढा सासरचा निरोप माहेरी माझ्या

जाऊन सांगशील का?

सासरी आलेल्या या मुलीला माहीत आहे की माझे आई, वडील, भाऊ, बहीण माझी काळजी करीत असतील. माहेरचा माणूस तर तिला भेटत नाही म्हणून ती एका पाखराला विनंती करते आणि सुखी असल्याचा निरोप धाडते. येथे पाखरू हे एक प्रतिकात्मक रूप गीतामध्ये आले आहे. वास्तविक पाहता तिचे मन त्या पाखरापेक्षाही अत्यंत जलद गतीने माहेरी पोहचलेले असते. श्रेष्ठ वाङ्मयाच्या दृष्टीने स्त्री-गीताचा विचार करता अशाप्रकारच्या स्त्री-गीतात अनेक वाङ्मयीन गुण आढळतात. स्त्री-जीवनाच्या विशेषांच्या दृष्टीनेही स्त्री-गीताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्री-मनातील भावविश्वाचे दर्शन जसे त्यांच्या गीतांतून घडते तसेच पारंपरिक जीवनपद्धतींचेही दर्शन त्यांच्या गीतांतून घडते. त्यामुळे वाङ्मयाच्या आणि जीवनाच्या दृष्टीने स्त्री-गीते महत्त्वाची आहेत असे प्रतिपादन डॉ. शरद व्यवहारे यांनी केले आहे.

आदिवासी समाजातील लग्न म्हणजे गाणी म्हणण्याची पर्वणीच असते. कुठल्याही संगीताशिवाय म्हणल्या जाणाऱ्या गीतातून स्त्रीमनाचे भावहिंदोळे व्यक्त होतात. उदा.

करवंदीचे करवंद काळे गं, करवंद काळे गं

करवंदीचे फूल पांढरे.

...... तुला वाढविली गं, वाढविली गं

केळीच्या कोंबावानी.

समुद्र लाटा मारी गं, लाटा मारी गं

बापाचं हृदय भरी...

या गीतातून स्त्रीचा मान-सन्मान व माहेरची वात्सल्याची भावना दिसून येते. लाडात वाढलेल्या मुलीची सासरला पाठवणी केल्यानंतर वडिलांचे हृदय द्रवते, आईच्या डोळयातून पाणी येते, भावाला बहिणीचे प्रेम दुरावते या अर्थाने भूतकाळातील बालसुलभ आठवणींचा मागोवा या गीतातून घेतल्याचे दिसते. जीवन जगत असताना जे अनुभवले, जे भावले, जे वाटयाला आले आणि आंतरिक उमाळयातून जे व्यक्त झाले ते व्यक्त झाल्यामुळे जे स्वाभाविक समाधान मिळाले असे काहीसे स्वरूप या स्त्रीगीतांतून सांगता येते.

लग्नकार्यात प्रामुख्याने स्त्रियांवरच जास्तीत जास्त संवेदनशील गीते रचली असल्यामुळे एक स्त्री दुसऱ्या स्त्रीचे दु:ख जाणते. सासरी जाणाऱ्या मुलीची समजूत काढते. त्यावेळी अर्थातच या दोघींचेही डोळे पाण्याने भरलेले असतात पण एक मानसिक आधार देण्याच्या उद्देशाने गीतातून तिला समजावले जाते.

तांब्याची तार ठेसनामधी
पोरी का रडते मनामधी, पोरी का रडते मनामधी
सासरा आहे बापावानी
तुला वागवील गं लेकीवानी, तुला वागवील गं लेकीवानी...

येथे सासर आणि माहेर यांच्यात दुरावा निर्माण होत असला तरी नातेसंवधातील साम्यगुण दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी आई ती आईच आणि सासू ती सासूच असते हे या मुलीला माहीत आहे. त्यामुळे मनाची तयारी करून ती सासरी आनंदाने जाते. तेथे गेल्यावर ती एक नवे विश्व निर्माण करण्याचा प्रयत्न करते. सासरा, सासू, दीर, नणंद यांना ती आपलेसे करू पाहते. या अर्थाचे एक गीत लग्नात म्हटले जाते. अर्थात हे गीत सासू,सासऱ्याच्या समर्थनार्थ योजिले आहे.

वळणा वळणा गाडी घुंगराची जरा वळणा
...... तुला आईची आठवण का गं होईना?
आई मला सासू मिळाली हौसेदार ना...

लग्न झाल्यावर तू इतकी का बदललीस? या प्रश्नावर ही मुलगी आपल्या सासरच्या माणसांची तुलना माहेरच्या माणसांशी करते. त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा करते. लग्नामुळे दोन कुटुंब, दोन मनं एकत्र येत

असली तरी या दिवशी एकीकडे हसू तर दुसरीकडे आसू अशी अवस्था असते. म्हणून आदिवासी स्त्रिया गाणं म्हणतात -

शुभमंगल सावधान आज होणार गं, होणार गं

आई बोले लेक माझी आज जाणार, जाणार.

सासू बोले सून माझी आज येणार, येणार...

या गीतातून एका नात्याची जागा दुसऱ्या नात्याने घेतली आहे. उदा. बाबाच्या ऐवजी सासरा, आई ऐवजी सासू, भावा ऐवजी दीर आणि बहिणी ऐवजी नणंद.

महादेव कोळी समाजात लग्नाच्या एक दिवस आधी हळदीचा कार्यक्रम होतो. नवरा आणि नवरी मुलीच्या घरी स्वतंत्रपणे हा कार्यक्रम होतो. त्यावेळी अंगणात तांदळाचा चौक घातला जातो आणि त्याच्यावर त्यांना सन्मानपूर्वक बसविले जाते आणि गाणं म्हटलं जाते -

अंगणी भरलाय मोत्याचा चौक, बाय

अंगणी भरलाय मोत्याचा चौक.

त्यावर बसलेय ...... नवरी बाय

एवढे सोळांजे कोणी गं तुझे केले? बाय

एवढे सोळांजे माझ्या बापाने केले.

पैशाचा खेळ खेळाया दिला बाय...

वरील गीतात तांदळांना मोत्याची उपमा दिली आहे. त्यामुळेहा विधी किती महत्त्वाचा आहे याची कल्पना येते. लहानपणापासून लाडात वाढलेल्या मुलीला हळद लागते तेव्हा आपल्या सख्या अत्यंत भावूक होऊन नवरीला विचारतात, 'एवढे सोळांजे (लाड) तुझे कोणी केले आहेत? की तू मोत्याच्या चौकावर बसू शकली आहेस. त्यावर ती आपल्या कुटुंबातील व्यक्तींची नावे घेते. हे गीत केवळ मुलींसाठीच म्हटले जाते असे नाही तर मुलाकडेही म्हटले जाते. कारण मुलाचे लग्न झाल्यावर त्याच्यावरही कौटुंबिक जबाबदारी येणार आहे म्हणून आता पर्यंतच्या लाडाविषयी या गीतातून वर्णन आले आहे.

मुलीला हळद लागली म्हणजे नकळत तिच्या नव्या आयुष्याची सुरूवात झाली असे म्हटले जाते. याचा अर्थ तिच्यावरील जबाबदाऱ्या वाढल्या, नातेसंबंध वाढले. हे नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी पुढील गीत गायले जाते -

हळदीने भरलयं पातळ

बायचं पातळ गं लग्नाचे
दोन दिसाचा बाप अन्
बायचा सासरा गं जन्माचा...

मुलीला एकदा हळद लागली म्हणजे तिच्या मनातील भावतरंग अत्यंत संवेदनशील होतात. त्यात भरीस भर म्हणजे अशाप्रकारचे गीत गायल्याने वातावरण करूण रसाने भारावून जाते. वरील गीतात पहिल्या दोन चरणांची पुनरावृत्ती होताना दिसते. तसे पाहिले तर लग्नगीतांमध्ये प्रत्येकवेळी ध्रुवपदाची पुनरावृत्ती होत असते. त्याशिवाय त्या गीताला लय प्राप्त होत नाही. एवढेच नव्हे तर पहिल्या चरणातील सर्व शब्द तेच ठेवून फक्त वस्तूंची किंवा व्यक्तंची नावे बदलून ते चरण म्हटले जाते. अशाप्रकारची पुनरावृत्ती हा लोकगीताचा एक विशेष म्हणावे लागेल.

जसजशी लग्नघटिका जवळ येते तसे नवरी मुलीच्या घरातील वातावरण अधिक गंभीर होत जाते. स्त्रियांची संवेदना ही अधिक गहिरी असते. त्या भावनेतूनच ती गीत गात असते. या संदर्भात मधुकर वाकोडे असे म्हणतात की, मधाच्या पोळयातून आपोआप सहृदाचे थेंब ठिबकावे, मृगाच्या सरी येऊन गेल्यावर ओल्या मातीचे पापुद्रे बाजूला सारून कोंबाने हलकेच वर यावे, पहाट वाऱ्याच्या स्पर्शाने पाहता पाहता कळीचे फुल व्हावे आणि कृतज्ञतापूर्वक जोडलेल्या हातांनी आईची कूस उसवून अगदी सहजगत्या बाळाने जन्माला यावे तद्‌वतच व जनसामान्याच्या हृदयातून आपसूक लोकगीत उमलते, कणसाप्रमाणे टरारून वर येते. लग्नप्रसंगातील काही संवेदनशील गीतांची निर्मितीच अशाप्रकारची झाल्याने नकळत स्त्रियांची मने द्रवतात. उदा.

दारी लगीन आज आनंद
बापाच्या डोळयात पाणी
तुझ्या लग्नाची, तुझ्या लग्नाची

या गीतामध्ये गाणाऱ्या स्त्रिया अत्यंत भावूक होऊन गीत गातात. त्यामुळे जरी मंगलमय प्रसंग असला, सर्वत्र आनंदी आनंद असले तरी मुलीच्या आई-वडिलाचे हृदय भरून येते. मुळातच स्त्री ही अत्यंत संवेदनशील आणि भावनिक असल्यामुले एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या लग्नामध्ये समरसून मनोभावे गीत गाते. ती सासर, माहेर अशा दोन्ही ठिकाणांचा उल्लेख करते. नकळत ती एकप्रकारे तुलना करण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे विरहाची भावना निर्माण होते. ही स्त्री कधीतिच्या सासरचे गोडवे गाते तर कधी तिला परिस्थितीशी मिळते जुळते घेण्यास सांगते.

वाट डोंगरची गाडी घुंगराची

...... तुला निह्याला आली गाडी घुंगराची

बापाच्या कुशीमध्ये नाही तुला थारा

...... तुझ्या नेत्रावाटे पाण्याच्या धारा...

आपल्या मैत्रिणीची या स्त्रियांना काळजी असल्यामुळे लग्न झाल्यावर तिला सासरी जाण्याची घाई करण्यास सांगतात. आदिवासी समाज हा डोंगरात वास्तव्य करीत असल्यामुळे तेथील वाट बिकट आहे. तरीही नव्या नवरीला घुंगराची गाडी नेण्यासाठी आली आहे. या मुलीला आपल्या आई -वडिलांच्या सहवासातून दूर जावेसे वाटत नाही. म्हणून या स्त्रिया म्हणतात की, ‘बापाच्या कुशीमध्ये तुला थारा नाही. आता तू दुसऱ्याची झाली आहे.

लग्नानंतर जेव्हा ती सासरी जाण्यास निघते त्यावेळी वाटेत डोंगर दऱ्या ओलांडून जावे लागते. मुळात जंगल रहिवासी असलेल्या आदिवासींना जंगल हे प्रिय असते. किंबहुना त्यांचे आयुष्य हे जंगलात गेलेले असते. यावेळी स्त्रिया प्रातिनिधिक स्वरूपात या मुलीच्या भावना व्यक्त करतात.

एवढया मोठया जंगलात, एवढया मोठया जंगलात

कशी राहू मी पांडुरंगा.

माझ्या शेजारी देऊळ बांधा...

माहेरच्या माणसांपासून दुरावल्यामुळे या वेळी तिला पांडुरंग जवळचा वाटतो. म्हणून ती देवाचा धावा करताना त्याचे मंदिर आपल्या जवळच असावे असे तिला वाटते.

एकतेच लग्न झालेल्या मुलीला आपल्या सासरी करमत नाही. अशाच एका संध्याकाळी माहेरच्या आठवणी आल्यामुळे तिच्या डोळयात पाणी येते आणि मग तिच्या मैत्रिणी तिची समजूत घालताना म्हणतात -

सांच्या पहारा बसूनी मागच्या दारा

...... नको रडू दिलेय मोठया घरा.

तुझा बाप रडतो खळखळा

...... लाडकी चालली सासरला...

थोडक्यात स्त्रीसंवेदना या सासरी असो की माहेरी, नात्यांमध्ये स्त्रिया अधिक एकरूप होताना दिसतात. मानवी जीवन हे मूळातच समाजशील असल्यामुळे समाजातील सुख-दु:खाच्या भावना स्त्री मनावर जास्त प्रमाणात उमटताना दिसतात.

स्त्रीमन हे मुळातच हळवं असतं. तिला आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर चिंता वाटत असते. बालवयात आईवडिलांच्या बंधनात वाढावे लागते. तारूण्यात नवऱ्याच्या बंधनात राहावे लागते तर म्हातारपणात मुलाच्या सांगण्याप्रमाणे वागावे लागते. थोडक्यात स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व नाहीच. अलीकडे काळ बदललाय हे निश्चित पण ज्यावेळी लोकगीतांची रचना झाली त्यावेळी स्त्री ही सदैव काळजी करणारी आणि सर्वांच्या हिताचा विचार करणारी असे काहीसे रूप लोकगीतांतून पहावयास मिळते. कोणत्याही मुलीला आपल्या लग्नाची चिंता जास्त सतावत असते. त्याचबरोबर मुलीच्या आई लाही आपल्या मुलीचे चांगले व्हावे असे नेहमी वाटत असते अशाच प्रकारचे एक गीत स्त्रीसंवेना जागृत करणारे आहे.

सरवान सरला बाई भादवा निघाला

भादव्या महिन्याच्या बाई पाच का मुली गं

वाढाया एकत्र बाय भराभरा मोठया गं

चौघीची लगीन बाई आनंदानं झाली

पाचव्या मुलीला बाई इचार पडला

पुसती आई का त्या बापाला जाऊन

माझ्या का संगतीच्या, का मुलीच्या लगना
आई गं मी उपवर लगनाला आली
सर्व्यांना मुलंबाळं कशी आनंदानं झाली
माझा का परपंच आई कव्हा होणार

म्हणून आई बापानं लगीन ठरविलं
लगीन होऊन का वर्षे चालली
मुलीला मुलंबाळं का नाई होतयं
म्हणून आई काई बापाला पुसते
आई का बाबा म्या कोनाला पुसावे
तुझ्या काय नशिबी बाई विघनं असंल गं
जाऊन शंकर देवासी का पुसावे
मुलीने जाऊन का शंकर देवाला पुसावे
शंकर देवाने का अभिषेक मांडिले.

वरील गीतातील मुलीला आपल्या लग्नाची चिंता सतावत आहे. त्याबरोबरच तिच्या आईलाही आपल्या मुलीच्या लग्नाची काळजी लागली आहे. चार बहिणींचं चांगलं झालं त्यामुळे याही मुलीचे चांगले व्हावे असे या आईला वाटते. पुढे उशीराने का होईना या मुलीचे लग्न होते पण मुलंबाळं होत नाहीत त्यामुळे या दोघींनाही खूप काळजी वाटते. त्यासाठी त्या देवाचा धाव करतात तसेच आपल्या वडिलांकडे आपली शोकांतिका व्यक्त करतात. अशी काळजी सर्व कुटुंबालाच लागलेली असल्यामुळे या गीतातील स्त्री ही खूपच संवेदनशील झालेली दिसते.

# निष्कर्ष

आदिवासी महादेव कोळी जमातीची लोकगीते आणि स्त्रीजीवनाचा अनुबंध या विषयाचे संशोधन करताना खालील निष्कर्ष दिसून आले.

१. आदिवासी समाज जगत असलेल्या जीवनाचा आविष्कार त्यांच्या लोकगीतातून घडताना दिसतो.

२. त्यांच्या लोकपरंपरा,रूढी, जीवनपद्धती ते आपल्या गीतातून व्यक्त करतात. त्यासाठी ते प्रामुख्याने आपल्या बोलीचा वापर करताना दिसतात. महादेव कोळी समाजाची बोली ही 'मावळी' व 'डांगाणी' आहे. या बोलीतून तेथील स्त्रियांनी लोकगीतांची रचना केली आहे.

३. मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित असलेली ही लोकगीते एका पिढीचा वारसा दुसऱ्या पिढीकडे सोपवताना दिसतात. परंतु हे होत असताना कालौघाने या गीतांमध्ये चाल आणि सादरीकरणामध्ये परिवर्तन होत असल्याचे दिसून येते.

४. या लोकगीतांचा सूक्ष्म अभ्यास केला असता. आदिवासी स्त्रीला केंद्रस्थानी घेतल्यास सामान्य स्त्रीच्या वाटयाला आलेली अवस्था, भावछटा आणि जीवनविशेष हे त्यांच्यापेक्षा वेगळया स्वरूपात या गीतांमधून आदिवासी स्त्रीच्या वाटयाला आल्याचे दिसते.

५. अत्यंत हलाखीत जीवन जगणारी ही आदिवासी स्त्री कधी आनंदाने जीवन जगताना दिसते तर कधी कमालीची संवेदनशील होताना दिसते.

६. आदिवासी लोकगीतांमध्ये लहान लहान पदबंधतसेच धृपदे, छोटी छोटी कडवी असल्यामुळे दोन-तीन ओळींतूनच गीताचा सारांश आपल्या लक्षात येतो. काही ठिकाणी प्रतिमा, प्रतिकांचा वापर केल्यामुळे प्रतिमासृष्टी निर्माण होण्यास मदत झाली आहे. परंतु कधी कधी यमकांच्या हव्यासापोटी गीताचा मूळ आशय बदललेला दिसतो.

७. आदिवासी लोकगीतांतून प्रामुख्याने भावनाविष्कार करावयाचा असल्यामुळे आदिवासी स्त्री गीताच्या माध्यमातून कधी कथात्मक, म्हणी, उखाणे यांचा वापर ओघानेच आला आहे. आपल्या बोलीच्या माध्यमातून व्यक्त होत असलेल्या भावना अधिक परिणामकारक वाटतात. पर्यायाने शब्दांची प्राचीन रूपे प्राचीन भाषा स्वरूप व जुन्या धार्मिक ग्रंथातील दाखले या गीतांमध्ये आढळून येतात.

८. आदिवासी लोकगीतांमध्ये यमकाचा वापर सर्रास होताना दिसून येतो. परंतु ही एक अपरिहार्यता आहे. कारण गीताला ताल, लय, ठेका, गेयता निर्माण होण्यासाठी ते आवश्यक आहे.

९. अनेक लोकगीते ही नृत्ये आणि टाळयांच्या ठेक्यावर म्हटली जात असल्यामुळे गीत रचना करताना चपखल शब्द निवडून गीतांची निर्मिती केल्याचे दिसते.

१० .विशेषत:लग्नगीतांमध्ये कौटुंबिक जिव्हाळयाचे वर्णन येत असल्यामुळे कुटुंबातील व्यक्तिंचे वर्णनपर कडवे गायले जाते. अशी गीते ऐकण्यास मधुर वाटत असली तरी रचनेची पुनरावृत्ती होत असते.

११ . आदिवासी लोकगीतांची परंपरा फारपूर्वीपासून चालत आल्यामुळे त्यातून तत्कालीन तसेच समाजात चालत आलेल्या पूर्वीच्या रूढी, परंपरा, संकेत, चालीरीती, अंधश्रद्धा तसेच लोकभ्रम दिसून येतो.

१२ . त्यांच्या गीतांची निर्मिती ही प्रामुख्याने निसर्गात होत असल्यामुळे आपोआपच गीतांमध्ये निसर्गातीलघटकांचे वर्णन आले आहे.

१३ . आदिवासी लोकगीतात नातेसंबंधाबरोबरच मिश्कील विनोद, उपरोध, बिनधास्तपणा, कमालीचे दु:ख,आनंद, सवाल-जबाब, आधुनिकतेची जोड या साऱ्या भावभावनांचे मिश्रण आले आहे.

१४ . वैविध्यपूर्ण नटलेल्या या गीतामधून कधीकधी मोडतोड जरी होत असली तरी त्यातील भावभावना या अंत:करणाचा ठाव घेतात.

१५ . आदिवासी स्त्रियांचे देव हे निसर्गातील दगड, झाड, चंद्र, सूर्य, पशू, पक्षी हे असून त्यांची त्या मनोभावे पूजा करतात.

# संदर्भ सूची


१. मुनघाटे प्रमोद, 'आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या,' प्रतिमा प्रकाशन, पुणे.३०. प्रथम आवृत्ती - २००७.

२. हिवाळे अलका, 'आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन,' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती - २००२.

३. व्यवहारे शरद, 'मराठी स्त्री गीते,' प्रतिमा प्रकाशन, पुणे.३०, प्रथम आवृत्ती -१९९१.

४. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप,' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पाचवी आवृत्ती-२००९.

५.कुलकर्णी सुलक्षणा, बोबडे सुहासकुमार (सं.) 'भावहिंदोळे स्त्रीमनाचे,' युगश्री प्रकाशन, कराड, प्रथमआवृत्ती - १९९९.

६. वाघमारे अमोल, 'मावळी बोली व महादेव कोळी समाजजीवन,' प्रफुल्लता प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती - २०१५

७. भवारी कृष्णा (सं.) धिंदळे सी.डी.'आदिवासी साहित्य आणि साहित्यिक,' चेतक बुक्स प्रकाशन, पुणे-३०, प्रथम आवृत्ती - २०१४

८. जोशी महादेवशास्त्री, 'गाजती दैवत,' ज्ञानराज प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती - १९५९.

९. व्यवहारे शरद, 'लोकवाङ्मय रूप-स्वरूप,' प्रथम आवृत्ती - १९९१.

१०. भोसले द.ता. 'लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष,' पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती -२००४

११. वाकोडे मधुकर, 'तीन वाङ्मयीन प्रवाह,' (प्रा.स.वा.पाटील गौरव ग्रंथ) अकोट.

१२. मोरजे गंगाधर, 'लोकसाहित्य: बदलते संदर्भ, बदलती रूपे,' पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती -१९९७

१३. बल्लाळ आनंद, 'लोकदैवत,' - सं. बाळासाहेब चव्हाण. प्रथम आवृत्ती - २०१३.

१४. गावीत माहेश्वरी, 'बीजभाषण,' आदिवासी समाज साहित्य, संस्कृती आणि मानसशास्त्रीय अनुबंध. -२०१४.

१५.मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप,' गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, चौथी आवृत्ती-२०००